मार्च २०२३/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य




## विकासाचे पंचामृत

अर्थसंकल्प : २०२३-२४

# शिवजन्मोत्सव सोहळा



शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यटनमंत्री मंगल प्रभात लोढा, खासदार श्रीमंत छत्रपती संभाजीराजे, आमदार प्रवीण दरेकर, अतुल बेनके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. अंकित गोयल, अपर जिल्हाधिकारी अजय मोरे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव-पाटील आदी उपस्थित होते. या वेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बाळ शिवाजींना पाळण्यात घालण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ राज्याचे नव्हे, तर देशाचे, संपूर्ण जगाचे आदर्श असून त्यांनी उभारलेले गडकोट, किल्ले हे आपला ऐतिहासिक वारसा असल्याने ते जतन करण्याचे काम राज्य शासनाकडून करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळी येऊन दर्शन घेणे रोमांचक अनुभव आहे. छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या महाराष्ट्रात आपला जन्म झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अलौकिक कार्याची आठवण प्रत्येकाच्या मनात सतत राहावी. राज्य शासन शिवाजी महाराजांच्या विचारानुसार सर्वसामान्य, गोरगरीब आदी सर्व घटकांसाठी काम करत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

वर्ष ७४ वे | अंक ६ | मार्च २०२३

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

# लोकराज्य


- मुख्य संपादक — जयश्री भोज
- प्रबंध संपादक — हेमराज बागुल, डॉ. राहुल तिडके
- संपादक — अनिल आलूरकर
- सहसंपादक — अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई.


माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

## अंतरंग

### ६ विकासाचे चक्र गतिमान

२०२३-२४ या अर्थसंकल्पाचा आधार आहे पंचामृत. ज्याप्रमाणे पंचामृतातील पाच तत्त्वे आरोग्याला सुदृढ करतात, त्याप्रमाणे अर्थसंकल्पातील हे पंचामृत महाराष्ट्राच्या आरोग्याला बळकट बनवेल, असा मला विश्वास वाटतो. शेतकऱ्यांचे कल्याण, महिला, आदिवासी, मागासवर्ग, ओबीसींसह सर्व समाजघटकांचा विकास, पायाभूत सुविधा विकास, रोजगार निर्मिती, पर्यावरणपूरक विकास असे हे पंचामृत आहे आणि यामुळे निश्चितपणे महाराष्ट्राच्या विकासाचे चक्र गतिमान होणार आहे.

### ८ विकासाचे सूत्र : पंचामृत

राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्याबरोबरच भविष्याचा वेध घेणारा २०२३-२४चा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पातील तरतुदी करताना शेतकरी, कष्टकरी, महिला, तरुण, वंचित व उपेक्षित घटकांना केंद्रस्थानी ठेवून कृषी, महिला, शिक्षण, आरोग्य आदी महत्त्वूर्ण क्षेत्रांसाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. नागरिकांच्या ४० हजार सूचनांचा विचार करून तयार करण्यात आलेला हा पहिला जनभागीदारीतील अर्थसंकल्प आहे.


| | |
|---|---|
| विकासाचे चक्र गतिमान | ६ |
| विकासाचे सूत्र : पंचामृत | ८–२६ |
| महिलांचे आरोग्य व शिक्षण | २७ |
| महिला सक्षमीकरणाचा प्रवास | ३० |
| पारंपरिक वाणांचे संवर्धक | ३२ |
| प्रतिभावान टेबल टेनिसपटू | ३४ |
| महिलांचा सर्वांगीण विकास | ३६ |
| सातत्यपूर्ण अभ्यासाने यश | ३८ |
| कौशल्याबरोबर रोजगार | ४० |
| पंचमहाभूत लोकोत्सव | ४३ |
| हिंदवी स्वराज्य महोत्सव | ४५ |
| पाऊल पडते पुढे | ४७–५५ |
| मंत्रिमंडळात ठरले! | ५६ |

**मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती संजय वि. गंगापुरवाला यांनी रमेश बैस यांना महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची शपथ दिली. श्री. बैस हे २० वे राज्यपाल असून, त्यांनी मराठीमधून पदाची शपथ घेतली.**

# रमेश बैस महाराष्ट्राचे २०वे राज्यपाल



राजभवनातील दरबार हॉलमध्ये झालेल्या या समारंभास राज्यपालांच्या पत्नी रामबाई बैस, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, पर्यटनमंत्री मंगल प्रभात लोढा, लोकायुक्त विद्यासागर कानडे, राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष न्या. (नि.) के. के. तातेड, लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे सचिव, वरिष्ठ पोलीस अधिकारी व निमंत्रित नागरिक उपस्थित होते.

शपथविधीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यपालांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. सुरुवातीला मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी राज्यपालांच्या नियुक्तीबाबत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढलेल्या अधिसूचनेचे वाचन केले. राष्ट्रगीताने शपथविधी सोहळ्याची सुरुवात व सांगता झाली. शपथविधी सोहळ्यानंतर भारतीय नौदलातर्फे राज्यपालांना मानवंदना देण्यात आली.

## राज्यपाल रमेश बैस यांचा परिचय

राज्यपाल रमेश बैस हे पूर्वीचे मध्यप्रदेश व सध्याच्या छत्तीसगड राज्याच्या तसेच राष्ट्रीय राजकारणातील एक आदरणीय नाव आहे. संसदीय राजकारण, समाजकारण तसेच संघटनकार्याचा तब्बल पाच दशकांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या श्री. बैस यांनी सार्वजनिक जीवनात नगरसेवकपदापासून केंद्रीय राज्यमंत्री व राज्यपालपदापर्यंत विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडलेल्या आहेत.

दिनांक २ ऑगस्ट १९४७ रोजी रायपूर (छत्तीसगड) येथे जन्मलेले श्री. बैस यांचे शिक्षण रायपूर येथे झाले. सन १९७८ साली ते पहिल्यांदा रायपूर महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आले. सन १९८० ते १९८५ या कालावधीत ते मध्य प्रदेश विधानपरिषदेचे सदस्य होते. या काळात त्यांनी मध्यप्रदेश विधान मंडळाच्या अंदाजपत्रक समितीचे तसेच त्यानंतर ग्रंथालय समितीचे सदस्य म्हणून काम केले. सन १९८२ ते १९८८ या कालावधीत ते मध्यप्रदेश भारतीय जनता पक्षाचे प्रदेशमंत्रीदेखील होते.

सन १९८९ साली श्री. बैस रायपूर येथून पहिल्यांदा लोकसभेवर निवडून आले. त्यानंतर तब्बल सहा वेळा, म्हणजे एकूण सात वेळा लोकसभेवर निवडून आले आहेत. सन १९९८ साली प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात श्री. बैस यांची पोलाद व खाण मंत्रालयात राज्यमंत्री म्हणून नियुक्ती झाली. सन १९९९ ते २००४ या कालावधीत त्यांनी रसायने व खते व त्यानंतर माहिती व प्रसारण खात्याचे राज्यमंत्री म्हणून काम पहिले.

सन २००३ साली श्री. बैस यांना केंद्रीय खाण मंत्रालयामध्ये राज्यमंत्रीपदाचा स्वतंत्र कार्यभार देण्यात आला व त्यानंतर काही काळ ते केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयात राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) होते. आपल्या प्रदीर्घ संसदीय जीवनात श्री. बैस यांनी पेट्रोलियम व नैसर्गिक वायुविषयक संसदीय समिती, लोकलेखा समिती, ऊर्जा मंत्रालय सल्लागार समिती, कोळसा आणि खाण मंत्रालयाची हिंदी सल्लागार समिती, नियम समिती आदी समित्यांचे सदस्य म्हणूनही कामकाज पाहिलेले आहे.

सन २००९ ते २०१४ या काळात श्री. बैस हे भारतीय जनता पक्षाचे लोकसभेतील मुख्य प्रतोद होते. सन २०१४ ते २०१९ या काळात १६व्या लोकसभेचे सदस्य असताना ते सामाजिक न्याय व सक्षमीकरण विषयावरील संसदीय स्थायी समितीचे अध्यक्ष होते. श्री बैस यांनी दिव्यांग व्यक्ती तसेच तृतीयपंथी (ट्रान्सजेंडर) व्यक्ती अधिकार सुरक्षा विधेयकासंदर्भात व्यापक संशोधन व अध्ययन केले आहे. सन २०१९ साली श्री. बैस यांची राज्यपालपदावर नियुक्ती करण्यात आली. दिनांक २९ जुलै २०१९ ते १३ जुलै २०२१ या काळात ते त्रिपुराचे राज्यपाल होते. त्यानंतर दिनांक १४ जुलै २०२१ रोजी त्यांची झारखंडच्या राज्यपालपदी बदली करण्यात आली.

नवनियुक्त राज्यपाल श्री. बैस यांना समाजसेवेची आवड असून त्यांनी अनेकदा आरोग्य शिबिरे, नेत्र तपासणी शिबिरे, तसेच ग्रामीण भागांमध्ये क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले आहे. श्री. बैस यांनी छत्तीसगड धनुर्विद्या ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष म्हणूनदेखील काम केले आहे. मध्यप्रदेश बीज व कृषी विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणूनदेखील त्यांनी काम केले आहे.

# ‘पंचामृत’ अर्थसंकल्प

विधिमंडळात नुकताच सादर करण्यात आलेला राज्याचा २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प हा महत्त्वाचा विषय घेऊन ‘लोकराज्य’चा विशेषांक आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. ५ लाख ४७ हजार ४५० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी, महिला आदिवासी मागासवर्ग, भरीव भांडवली पायाभूत सुविधांचा विकास, सक्षम, कुशल, रोजगारक्षम युवा आणि पर्यावरणपूरक विकास या पंचामृतांवर आधारित हा अर्थसंकल्प आहे.

देशाच्या अमृतकाळातील पंचामृतावर आधारित या अर्थसंकल्पात ‘शाश्वत शेती समृद्ध शेतकरी’ या घटकासाठी २९ हजार १६३ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. महिला आदिवासी ओबीसी या सर्व घटकांच्या सर्वसमावेशक विकासासाठी ४३ हजार ३६ कोटी रुपयांची भरीव तरतूद केली आहे. तसेच भरीव भांडवली गुंतवणुकीतून पायाभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी ५३ हजार ५८ कोटी ५५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा आणि समतोल न्याय देणारा हा अर्थसंकल्प आहे.



शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी अर्थसंकल्पात विशेष भर देण्यात आला आहे. ‘नमो शेतकरी महासन्मान निधी’ या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना ६ हजार ऐवजी १२ हजार अनुदान मिळणार आहे. या योजनेचा लाभ १ कोटी १५ लाख शेतकरी कुटुंबाला होणार आहे. राज्य शासन शेतकऱ्यांचा पीक विम्याचा हप्ता भरणार असल्याने शेतकऱ्यांना केवळ १ रुपयात पीक विमा सुविधा मिळणार आहे. यासाठी ३,३१२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शेतीला साहाय्य करणाऱ्या ‘मागेल त्याला शेततळे’ या योजनेचा विस्तार करण्यासाठी राज्य शासनाने १ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

सक्षम, कुशल-रोजगारक्षम युवा यांसाठी कार्यक्रम खर्चाकरिता अर्थसंकल्पात एकूण ११ हजार ६५८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पंचम अमृत पर्यावरणपूरक विकास यासाठी अर्थसंकल्पात एकूण १३ हजार ४३७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेकाचे हे ३५० वे वर्ष आहे. शिवराज्याभिषेक महोत्सवासाठी ३५० कोटी रुपयांची तरतूद केली असून, शिवकालीन किल्ल्यांच्या संवर्धनासाठी ३०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच आंबेगाव, ता. हवेली, जि. पुणे येथे छत्रपती शिवाजी महाराज संकल्पना उद्यान उभारण्यासाठी ५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात बार्टी, सारथी, महाज्योती आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळ यासाठी भरीव अनुदान देण्यात आले आहे.

राष्ट्राची प्रगती महिला सक्षमीकरणातून केली जाते. हे सूत्र लक्षात घेऊन चौथ्या सर्वसमावेशक महिला धोरणाची अर्थसंकल्पात घोषणा करण्यात आली आहे. त्यासाठी चौथे महिला सक्षमीकरण धोरण लवकरच करण्यात येणार आहे. महिलांचा सन्मान वाढवण्यासाठी ‘लेक लाडकी’ ही नवीन योजना सुरू करण्यात आली आहे. पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबातील मुलींच्या जन्मानंतर ५ हजार, चौथीत ४ हजार, सहावीत ६ हजार, आठवीत ८ हजार रुपये, तर १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर ७५ हजार रुपये रोख देण्यात येतील, अशी तरतूद केली आहे. तसेच आशा सेविका आणि मदतनीस यांच्या मानधनातही वाढ केली आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बससेवेच्या तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्यात आली आहे.

‘माता सुरक्षित, तर घर सुरक्षित’ या अभियानात ४ कोटी महिला, मुलींची आरोग्य तपासणी औषधोपचार केले जाणार आहेत. स्वाधार आणि उज्ज्वला या दोन योजनांचे एकत्रिकरण करून केंद्राच्या मदतीने शक्तीसदन ही नवीन योजना राज्य सरकारमार्फत राबवण्यात येणार आहे. अशा अनेक महत्त्वपूर्ण योजनांचा ऊहापोह अर्थसंकल्पात करताना शासनाने शेतकरी कष्टकरी, महिला, तरुण, वंचित व उपेक्षित घटकांना केंद्रस्थानी ठेवले आहे. सर्व क्षेत्रांसाठी पुरेशा तरतुदी ठेवल्या आहेत.

मार्च २०२३ च्या अंकात राज्याच्या अर्थसंकल्पाचे अर्थपूर्ण विवेचन करण्यात आले आहे. त्याबरोबरच महिलांचे आरोग्य आणि शिक्षण, महिलांचा सर्वांगीण विकास यांविषयीचे लेख तसेच महत्त्वाच्या घडामोडी, मंत्रिमंडळात ठरले, या सदरांचाही समावेश करण्यात आला आहे. हा अंक आपणास नक्की आवडेल, असा विश्वास आहे.

**जयश्री भोज**
(मुख्य संपादक)

**२०२३-२४ या अर्थसंकल्पाचा आधार आहे पंचामृत. ज्याप्रमाणे पंचामृतातील पाच तत्त्वे आरोग्याला सुदृढ करतात, त्याप्रमाणे अर्थसंकल्पातील हे पंचामृत महाराष्ट्राच्या आरोग्याला बळकट बनवेल, असा मला विश्वास वाटतो. शेतकऱ्यांचे कल्याण, महिला, आदिवासी, मागासवर्ग, ओबीसींसह सर्व समाजघटकांचा विकास, पायाभूत सुविधा विकास, रोजगार निर्मिती, पर्यावरणपूरक विकास असे हे पंचामृत आहे आणि यामुळे निश्चितपणे महाराष्ट्राच्या विकासाचे चक्र गतिमान होणार आहे.**

# विकासाचे चक्र गतिमान

**एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री

राज्याच्या अर्थसंकल्पाकडे नेहमीच सगळ्यांचे लक्ष असते. यामध्ये काय काय घोषणा होणार आहेत, कोणते नवीन कार्यक्रम दिले जाणार आहेत, किती निधीची तरतूद होणार आहे याविषयीची उत्सुकता नेहमीच असते. मात्र यावेळेस सर्वांची उत्सुकता निराळी होती. याचे कारण म्हणजे नऊ महिन्यांपूर्वी महाराष्ट्राच्या सत्तेवर आलेले युतीचे सरकार. हे सरकार केवळ शिवसेना किंवा भाजपचे नाही, तर लोकांचे आपले सरकार आहे, अशी भावना जनमानसात असल्याने या सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पाकडे सर्वांचे लक्ष असणे स्वाभाविक होते. हा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर राज्यभरातून सर्वसामान्य जनता, माध्यमे, अर्थतज्ज्ञ यांनी दिलेल्या प्रतिक्रिया आणि व्यक्त केलेले समाधान पाहिले तर निश्चितपणे आम्ही त्यांच्या अपेक्षांना पुरे पडलो, असे मला म्हणावेसे वाटते.



मी तर म्हणेन की, या अर्थसंकल्पामुळे गेल्या दोन अडीच वर्षांतील राज्याच्या प्रगतीवर आलेले जे मळभ आहे ते दूर होण्यासाठी मोठी मदत होणार आहे. महाराष्ट्राला देशात एक उंची मिळणार आहे. यातील लेक लाडकी योजना, महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत, शेतकऱ्यांना सन्माननिधी अशा काही सामाजिक घोषणा आणि कार्यक्रम तर देशात उदाहरण म्हणून दिले जाऊ शकतील. माझे सहकारी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांनी ज्या पद्धतीने हा अर्थसंकल्प तयार केला आहे, यामागे त्यांचा गाढा अनुभव दिसतो आणि म्हणूनच मला असे वाटते की, गेल्या १० वर्षांत असा चांगला अर्थसंकल्प सादर झालेला नसेल.

या अर्थसंकल्पाचा आधार आहे पंचामृत. ज्याप्रमाणे पंचामृतातील पाच तत्त्वे आरोग्याला सुदृढ करतात, त्याप्रमाणे अर्थसंकल्पातील हे पंचामृत महाराष्ट्राच्या आरोग्याला बळकट बनवेल, असा मला विश्वास वाटतो. शेतकऱ्यांचे कल्याण, महिला, आदिवासी, मागासवर्ग, ओबीसींसह सर्व समाजघटकांचा विकास, पायाभूत सुविधा विकास, रोजगार निर्मिती, पर्यावरणपूरक विकास असे हे पंचामृत आहे आणि यामुळे निश्चितपणे महाराष्ट्राच्या विकासाचे चक्र गतिमान होणार आहे.

## शेतीसाठी भरीव तरतूद

नमो शेतकरी महासन्मान निधीचा दीड कोटी शेतकऱ्यांना लाभ होणार असून महाकृषी विकास अभियान योजनेमुळे राज्यात क्रांती होणार आहे. केवळ एक रुपयात पीक विमा घेता येणार असल्याने

शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. मागेल त्याला शेततळेचा विस्तार वाढवणे असो किंवा विदर्भ, मराठवाड्यातील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना अन्नधान्याऐवजी रोख रक्कम देणे असो, या अर्थसंकल्पात शेतीसाठी केलेली तरतूद निश्चितच भरीव आहे.

## महिला सक्षमीकरण

चौथ्या सर्वसमावेशक महिला धोरणाची अर्थसंकल्पात घोषणा करण्यात आली आहे. याशिवाय नोकरदार महिलांसाठी केंद्राच्या मदतीने ५० वसतिगृहे, निराधार व निराश्रित महिलांसाठी नवीन ५० शक्तिसदन, एसटी बस प्रवासात सरसकट ५० टक्के सूट, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविकांच्या मानधनात भरीव वाढ, महिला खरेदीदाराला स्टॅम्प ड्युटीमध्ये एक टक्का सवलत दिल्याने; तसेच लेक लाडकी योजना पिवळ्या आणि केशरी रेशनकार्डधारक कुटुंबातील मुलींना लागू केल्याने महिला सक्षमीकरण होणार आहे.

## सर्वसामान्यांना दिलासा

अर्थसंकल्पात दुर्लक्षित घटकांनासुद्धा न्याय देण्यात आला आहे. धनगर समाजाला १ हजार कोटी, ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय वयोश्री योजनेचा लाभ देणे, ज्येष्ठांसाठी प्रत्येक पालिका क्षेत्रात विरंगुळा केंद्र, महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेत उपचाराची मर्यादा ५ लाखांपर्यंत वाढवणे, निराधारांना अर्थसाहाय्य वाढवणे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. प्रकल्पबाधित मासेमारांना नुकसानभरपाईसाठी धोरण राबवण्याचा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. विविध असंघटित कामगार, विविध दुर्लक्षित समाजांसाठी महामंडळे स्थापल्यामुळे ते मुख्य प्रवाहात येतील. आदिवासी आश्रमशाळांना आदर्श बनवण्याचा निर्णय ही महत्त्वाचा आहे.

## हक्काचा निवारा

या वर्षी १० लाख घरांचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आखण्यात येत असून इतर मागासवर्गीयांसाठी ३ वर्षांत १० लाख घरांची मोदी आवास घरकुल योजना सुरू केल्याने राज्यात मोठ्या प्रमाणावर घरांचे बांधकाम होऊन हक्काचा निवारा मिळेल.

## कौशल्य विकास

राज्यात महामार्गांचा विस्तार, नवीन रस्ते, मेट्रो प्रकल्प, बसस्थानकांचे आधुनिकीकरण, विमानतळांचा विकास यामुळे राज्यात बदल दिसून यायला सुरुवात होईल. उद्योगांना कुशल मनुष्यबळासाठी १० उत्कृष्टता केंद्रे, आयटीआयचे आधुनिकीकरण, ७५ हजार



शासकीय पद भरती, स्टार्टअपसाठी नवी मुंबईत कळंबोली येथे निवासी प्रशिक्षण संशोधन संस्था; तसेच राज्यात सहा प्रमुख शहरांत सर्क्युलर इकॉनॉमी पार्क उभारणे, ५०० ग्रामपंचायतींमध्ये कौशल्य विकास कार्यक्रम, ५०० आयटीआयची दर्जावाढ, ७५ आयटीआयचे आधुनिकीकरण यासारख्या योजनांमुळे विशेषतः तरुणांना लाभ होईल आणि त्यांच्या करिअरला मदत होईल.

## स्मारकांना वाढीव निधी

मुंबईच्या सुशोभिकरणासाठी १७२९ कोटींचा खर्च अर्थसंकल्पात केल्याने मुंबईचे रूप बदलेल. इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक त्याचप्रमाणे राज्यातील इतरही स्मारकांना वाढीव निधी देऊन गती देण्यात येत आहे.

## पर्यावरणपूरक विकास

श्रीक्षेत्र रिद्धपूर येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या स्मृत्यर्थ आष्टी, वर्धा येथे स्मारक, धार्मिक क्षेत्रांचा विकास यामुळे महाराष्ट्राचे वैभव वाढेल. राज्याच्या पर्यटन आराखड्यामुळे पर्यटनालादेखील चालना मिळणार आहे. विकास करताना तो पर्यावरणपूरक असेल याची देखील काळजी घेण्यात आली आहे. २० हजार ग्रामपंचायतीत सौर ऊर्जा प्रकल्प सुरू होतील. हरित हायड्रोजन, हरित अमोनिया, सौर, पवन ऊर्जा क्षेत्रात ७५ हजार कोटींची गुंतवणूक आम्हाला अपेक्षित आहे. याशिवाय प्रत्येक जिल्ह्यात धार्मिक व औषधी वृक्षांची अमृत वन उद्यानांची निर्मिती केली जाईल.

समाजातील सगळ्या घटकांवर विकासाच्या रंगांची उधळण करणारा हा अर्थसंकल्प घामाला दाम, कष्टाला मान, विकासाचे चौफेर भान देणारा असून तो शेतकऱ्यांच्या डोळ्यातील पाणी पुसणारा आहे. मला खात्री आहे, राज्याला निश्चितपणे एक ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेकडे नेण्यासाठी हा अर्थसंकल्प मार्ग सुकर करेल.

**शब्दांकन : अनिरुद्ध अष्टपुत्रे,**
मा. मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

**राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्याबरोबरच भविष्याचा वेध घेणारा २०२३-२४चा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पातील तरतुदी करताना शेतकरी, कष्टकरी, महिला, तरुण, वंचित व उपेक्षित घटकांना केंद्रस्थानी ठेवून कृषी, महिला, शिक्षण, आरोग्य आदी महत्त्वपूर्ण क्षेत्रांसाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे. नागरिकांच्या ४० हजार सूचनांचा विचार करून तयार करण्यात आलेला हा पहिला जनभागीदारीतील अर्थसंकल्प आहे.**

# विकासाचे सूत्र : पंचामृत

**देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री

अमृतकाळातील हा पहिला अर्थसंकल्प १) शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी, २) महिला, आदिवासी, मागासवर्ग, ओबीसींसह सर्व समाजघटकांचा सर्वसमावेशक विकास, ३) भरीव भांडवली गुंतवणुकीतून पायाभूत सुविधा विकास, ४) रोजगारनिर्मिती : सक्षम, कुशल, रोजगारक्षम युवा, ५) पर्यावरणपूरक विकास या 'पंचामृत' ध्येयावर आधारित आहे. या माध्यमातून आपण विकसनशीलतेकडून विकसित राज्य - पर्यायाने विकसित राष्ट्राकडे वाटचाल करणार आहोत.



अवघ्या जगाला लोककल्याणकारी राज्याची प्रेरणा देणारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेकाचे हे ३५० वे वर्ष आहे. संत निवृत्तीनाथांचे ७५० वे जयंती वर्ष. ज्यांनी भारताला केवळ संविधानच दिले नाही, तर अर्थकारणावर सुद्धा मार्गदर्शन केले त्या महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या 'द प्रॉब्लेम ऑफ द रूपी' या पुस्तकाचे शताब्दी वर्ष या औचित्यावर तसेच जगद्गुरू तुकोबारायांच्या वैकुंठगमनाचा दिवस अर्थात तुकाराम बीज दिनी स्वातंत्र्याच्या अमृतकाळात हा 'पंचामृत' अर्थसंकल्प लोकशाहीच्या सर्वोच्च व्यासपीठावर सादर करण्याची वित्तमंत्री म्हणून मला मिळालेली संधी माझ्यासाठी अद्वितीय आहे.

कोणतेही राज्य पायाभूत सुविधांच्या विकासाशिवाय पुढे जाऊ शकत नाही. राज्याच्या विकासाला गती देण्यासाठी पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देण्यात आली असून त्यातून उद्योगांना आकर्षित करण्यात आले आहे. यातूनच रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट साध्य होणार आहे.
*पिकवावे धन । ज्याची आस करी जन ।।*
या तत्त्वाला अनुसरून राज्याचा अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे.

## शिवराज्याभिषेक महोत्सव

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवशकानुसार शिवराज्याभिषेकाचे हे ३५० वे वर्ष आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वप्नातील सुराज्याची निर्मिती करण्यासाठी शासनाची पुढील वाटचाल असेल. २ ते ९ जून २०२३ या कालावधीमध्ये शिवराज्याभिषेक महोत्सव आयोजित करण्यास ३५० कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध करण्यात येईल.

## छत्रपती शिवाजी महाराज संकल्पना उद्यान

आंबेगाव ता. हवेली जि. पुणे येथे छत्रपती शिवाजी महाराज संकल्पना उद्यान उभारण्यासाठी ५० कोटी रुपये निधी देण्यात येत आहे. याच धर्तीवर मुंबई, अमरावती, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथे दृक्श्राव्य माध्यम

सुविधेसह सार्वजनिक उद्याने विकसित करण्यात येतील. या उद्यानांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जीवनगाथा प्रदर्शित करण्यात येईल. त्यासाठी २५० कोटी रुपये निधी देण्यात येईल.

### शिवनेरी संग्रहालय व किल्ल्यांचे संवर्धन

छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान किल्ले शिवनेरीवर महाराजांच्या जीवनचरित्रावर संग्रहालय उभारण्यात येईल. शिवकालीन किल्ल्यांच्या संवर्धनासाठी ३०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.



### आर्थिक सल्लागार परिषद

भारत विकसित राष्ट्र व्हावे, हा मा. प्रधानमंत्रीमहोदयांचा निर्धार असून, त्यादृष्टीने २०२७ पर्यंत भारताच्या अर्थव्यवस्थेचे आकारमान, पाच ट्रिलियन डॉलर व्हावे, हे त्यांचे उद्दिष्ट आहे. त्यात १ ट्रिलियन डॉलरचा वाटा महाराष्ट्राचा असावा, हा आमचा संकल्प आहे. यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेची स्थापना करून त्यात उद्योग क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींचा समावेश करण्यात आला आहे.

राज्याच्या जलद आणि सर्वसमावेशी विकासासाठी नीति आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र) ही संस्था स्थापन करण्यात आली आहे.

### केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी तरतूद

केंद्र सरकारच्या यंदाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील विविध प्रकल्पांसाठी ३६ हजार कोटींहून अधिकची तरतूद झाली. मी मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने मन:पूर्वक आभार मानतो. अमृतकाळातील राज्याचा हा पहिला अर्थसंकल्प ५ ध्येयांवर आधारित अर्थात पंचामृत असा आहे. ते पुढीलप्रमाणे...

## शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी

जगद्गुरू तुकाराम महाराज म्हणतात, *एका बीजा केला नास । मग भोगिले कणींस ।।* एक बीज पेरले की त्यातून असंख्य कणसं तयार होतातच. आज मात्र हवामानबदल, अवकाळी आणि अवर्षण अशा असंख्य समस्यांनी अन्नदाता ग्रासला आहे. शाश्वत शेतीसाठी अनेक उपाय होत असले तरी त्याला हक्काच्या मदतीची हमी आवश्यक आहे. कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचीच आमची भूमिका आहे. या वर्षी अडचणीत असलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत केली जाईल.

### नमो शेतकरी महासन्मान निधी

अन्नदाता बळीराजाच्या उत्पन्नवाढीसाठी मा. प्रधानमंत्र्यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी नमो शेतकरी महासन्मान निधी ही योजना मी जाहीर करतो. या योजनेत केंद्र सरकारच्या प्रतिवर्ष, प्रतिशेतकरी ६ हजार रुपयांत राज्य सरकार आणखी ६ हजार रुपयांची भर घालेल. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना १२ हजार रुपये प्रतिवर्षी मिळतील. याचा लाभ १.१५ कोटी शेतकरी कुटुंबांना होईल, यासाठी २०२३-२४ मध्ये ६,९०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

### एक रुपयात पीक विमा

केंद्र सरकारच्या २०१६ च्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेत विमाहप्त्याच्या २ टक्के रक्कम शेतकऱ्याने भरण्याची तरतूद आहे. आता हा भारसुद्धा शेतकऱ्यावर न ठेवता त्यांच्या हिश्श्याचा विमाहप्ता राज्य सरकार भरेल. शेतकऱ्यांना केवळ १ रुपया भरून प्रधानमंत्री पीक विम्याच्या पोर्टलवर नोंदणी करता येईल. या योजनेसाठी वार्षिक ३ हजार ३१२ कोटी रुपये तरतूद राज्य शासनाकडून करण्यात येईल.



### प्रोत्साहनपर लाभ

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत, गेल्या दोन अर्थसंकल्पात जाहीर झालेल्या, पण न दिलेल्या नियमित पीककर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात आला आहे. १५ फेब्रुवारी २०२३ पर्यंत १२.८४ लाख पात्र खातेधारकांच्या बँक खात्यात ४ हजार ६८३ कोटी रुपये थेट देण्यात आले.



### महाकृषिविकास योजना

शेतीच्या शाश्वत विकासासाठी सर्वसमावेशकता अत्यंत गरजेची आहे. म्हणूनच महाकृषिविकास अभियान योजना मी जाहीर करतो. यात पीक, फळपीक या मूलभूत घटकांच्या उत्पादनापासून ते मूल्यवर्धनापर्यंतची प्रक्रिया तसेच तालुका, जिल्हानिहाय शेतकरी गट, समूहांसाठी एकात्मिक पीक आधारित प्रकल्प आराखडा तयार केला जाईल. यातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ होईल. आगामी ५ वर्षांत या योजनेसाठी ३ हजार कोटी रुपये उपलब्ध करून दिले जातील.

### छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना

आमच्या सरकारने सन २०१७ साली छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना सुरू केली होती. मधल्या काळात अनेक लाभार्थ्यांना या योजनेचे लाभ देण्यात आले नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज

शेतकरी सन्मान योजनेच्या उर्वरित पात्र शेतकऱ्यांना त्यांचे लाभ देण्यात येतील.

### धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन

धान विक्रीवर प्रतिक्विंटल बोनस देण्याची पद्धत प्रचलित आहे. आता नवीन योजनेद्वारे धानाची विक्री न तपासता ७/१२ नोंदीवरील लागवडीच्या क्षेत्रप्रमाणात



धान उत्पादक शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२२-२३ साठी डीबीटीद्वारे दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रतिहेक्टरी १५ हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे.

### 'मागेल त्याला शेततळे' योजनेचा विस्तार

जून २०१५ मध्ये सुरू केलेल्या 'मागेल त्याला शेततळे' योजनेचा विस्तार करण्यात येत असून, आता मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळे, शेततळ्याचे



अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणीयंत्रे आणि कॉटन श्रेडर हे घटक उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. या विविध योजनांकरिता २०२३-२४ मध्ये १ हजार कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

### कोकणासाठी काजू बोंडूवर प्रक्रिया केंद्र

सुमारे २०० कोटी रुपयांच्या भागभांडवलासह कोकणासाठी काजू बोर्डाची निर्मिती करण्यात आली आहे. साध्या काजू बोंडूपेक्षा प्रक्रिया केलेल्या काजू बोंडूची किंमत ७ पटीने अधिक आहे. उत्पन्न वाढीसाठी कोकणात काजू बोंडू प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्यात येतील.

काजूच्या लागवडीपासून प्रक्रिया आणि विक्रीपर्यंत शेतकऱ्यांना साहाय्य करण्यासाठी काजू फळ विकास योजना संपूर्ण कोकण, कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड व आजरा या तालुक्यांत राबवण्यात येईल. आगामी ५ वर्षांत या योजनेकरिता १ हजार ३२५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल.

### सानुग्रह अनुदान योजना

अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना विमाछत्र देण्यासाठी विमा कंपन्यांमार्फत गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना राबवण्यात येते. मात्र, विमा दावे प्राप्त करण्यासाठी शेतकऱ्यांना पाठपुरावा करावा लागतो. शेतकऱ्यांचा त्रास दूर करण्यासाठी आता राज्य सरकार गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबवेल आणि या सुधारित योजनेत अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबास २ लाख रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान दिले जाईल.

### नैसर्गिक, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन

नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देताना आगामी ३ वर्षांत राज्यातील २५ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आणण्यात येईल. १,००० जैवनिविष्ठा स्रोत केंद्रे स्थापन करून डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनची व्याप्ती वाढवण्यात येईल. यासाठी तीन वर्षांत १ हजार कोटी रुपये निधी दिला जाईल.

### महाराष्ट्र श्री अन्न अभियान

संयुक्त राष्ट्र संघाने २०२३ हे 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून घोषित केले आहे. आम्ही 'महाराष्ट्र श्री अन्न अभियान' सुरू केले आहे. त्यासाठी २०० कोटी रुपये तरतूद प्रस्तावित आहे. श्री अन्नाच्या उत्पादन वाढीसाठी तंत्रज्ञानाचा प्रसार, पीक प्रात्यक्षिके, यांत्रिकीकरण प्रक्रिया, मूल्यसाखळी विकास आणि प्रचार प्रसिद्धी यांचा अंतर्भाव आहे. सोलापूर येथे श्री अन्न उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यात येईल.

### आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र

कृषी व संलग्न क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे उपयोजन व प्रसार करण्यासाठी नागपूर येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करण्यात येईल. या केंद्रासाठी २२७ कोटी ४६ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

### संत्रा प्रक्रिया केंद्र

नागपूर, काटोल व कळमेश्वर जि. नागपूर, मोर्शी जि. अमरावती तथा बुलडाणा जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारण्यात येतील. यासाठी २० कोटी रुपये निधी उपलब्ध करण्यात येईल.



### शिधापत्रिकाधारकांना थेट रोख रक्कम

विदर्भ आणि मराठवाड्यातील १४ विपत्तिग्रस्त जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना आता अन्नधान्याऐवजी रोख रक्कम थेट त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात देण्यात येईल. ती प्रतिवर्ष, प्रतिव्यक्ती १८०० रुपये इतकी असेल.

### नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानासाठी गेल्या हंगामात शेतकऱ्यांना एसडीआरएफच्या दुप्पट दराने मदत देण्यात आली. बाधित शेतकऱ्यांना ७ हजार ९३

कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला. यापूर्वी निकषात नसणाऱ्या सततच्या पावसासाठी मदत मिळत नसे पण; आता ती वर्गवारी करून शेतपीक नुकसानीसाठी ठरावीक निकषाने मदत देण्यात येईल. एसडीआरएफमधून द्यावयाच्या मदतीचे वाढीव दर राज्यात १ नोव्हेंबर २०२२ पासून लागू करण्यात आले आहेत.

## ई-पंचनामा

नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे वेळेत व्हावेत, पंचनाम्यांबद्दल शेतकऱ्यांच्या तक्रारी येऊ नयेत यासाठी मानवी हस्तक्षेप टाळून, माहिती तंत्रज्ञानाची मदत घेऊन मोबाईलद्वारे ई-पंचनामा करण्यात येईल. शेतकऱ्यांना पारदर्शक पद्धतीने व तातडीने मदत मिळावी, याकरिता सर्वेक्षणासाठी उपग्रहाची व ड्रोनची मदत घेऊन संगणकीय प्रणाली वापरली जाईल.



## शेतकरी भवन

कृषी उत्पन्न बाजार समिती असलेल्या ठिकाणी शेतकरी बांधवांना मुक्कामासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन बांधण्यात येतील. तसेच त्यांच्या जेवणाच्या सोयीसाठी शिवभोजन थाळी उपलब्ध करून देण्यात येईल.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता कृषी विभागास ३ हजार ३३९ कोटी रुपये, मदत व पुनर्वसन विभागास ५८४ कोटी रुपये, सहकार व पणन विभागास १ हजार १०६ कोटी रुपये, फलोत्पादन विभागास ६४८ कोटी रुपये, अन्न व नागरी पुरवठा विभागास ४८१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

## गोसेवा आयोग स्थापन

देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन व संरक्षण व्हावे म्हणून देशी गोवंशाच्या संवर्धनासाठी भ्रूण बाह्यफलन व प्रत्यारोपणाच्या सुविधेत वाढ करण्यात येईल. तसेच अस्तित्वातील कायद्याची योग्य अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना करण्यात येईल. आयोगाकडून गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना आणि गोमय मूल्यवर्धन योजना ही नवीन योजना राबवण्यात येईल.

## दुग्ध विकास प्रकल्प

विदर्भ व मराठवाड्यातील ११ जिल्ह्यांमध्ये दुग्ध विकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्यासाठी २०२३-२४ या वर्षात १६० कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित आहे. तसेच अहमदनगर जिल्ह्यात नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यात येईल.

## मेंढी व शेळी सहकार विकास महामंडळाची स्थापना

राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेअंतर्गत मेंढी पालनासाठी अनुदान देण्यात येते. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी भरीव निधी देण्यात येईल. राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून राज्यातील धनगर व तत्सम जमातीतील लाभार्थ्यांना मेंढी, शेळी पालनाकरिता १० हजार कोटी रुपयांचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र मेंढी व शेळी सहकार विकास महामंडळाची स्थापना करण्यात येईल. या महामंडळाचे मुख्यालय अहमदनगर येथे राहील.

धनगर समाजाच्या उन्नतीकरिता शासनाने सन २०१९ मध्ये आदिवासी उपयोजनेच्या धर्तीवर वेगवेगळ्या २२ योजना राबवण्याचा एक हजार कोटी रुपये किमतीचा कार्यक्रम हाती घेतला होता. हा कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी आवश्यक तो निधी सर्वसाधारण योजनेतून उपलब्ध करून देण्यात येईल. या योजनांचे संनियंत्रण मंत्रिमंडळाने प्राधिकृत केलेली शक्तीप्रदत्त समिती करील.

## प्रकल्पबाधित मच्छिमारांसाठी धोरण

प्रकल्पबाधित मच्छिमारांना नुकसानभरपाई देण्यासाठी सर्वसमावेशक धोरण करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. प्रकल्पामुळे विस्थापित तसेच तात्पुरत्या प्रभावित मच्छिमार कुटुंबांच्या कल्याणासाठी प्रकल्पाच्या २ टक्के किंवा कमाल ५० कोटी रुपये रकमेचा मत्स्यविकास कोष स्थापन करण्यात येईल.

## मच्छिमारांना डिझेल अनुदान

मच्छिमारांना डिझेल अनुदानासाठी यांत्रिक नौकेच्या कमाल १२० अश्वशक्तीच्या इंजिनाची मर्यादा होती. ही मर्यादा शासनाने काढून टाकली असून, त्यामुळे ८५ हजार अधिकच्या मच्छिमार बांधवांना आता या योजनेचा लाभ मिळेल. अनुदानाचा वर्षानुवर्षे असणारा अनुशेष या वर्षी पूर्णत: दूर करण्यात येईल, त्यासाठी २६९ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.



केंद्र शासनाच्या मदतीने या वर्षापासून पारंपरिक मासेमारी करणाऱ्या मच्छिमार बांधवांसाठी ५ लाख रुपये विमा छत्राची योजना सुरू करण्यात येईल.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागास ५०८ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

## पडीक जमिनीतून भूधारकांना उत्पन्न

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत खासगी पडीक जमीन ऊर्जा कंपन्यांना भाडेपट्ट्याने उपलब्ध करून देताना त्या वर्षाच्या निर्धारित केलेल्या किमतीच्या ६ टक्के किंवा प्रतिवर्ष ७५ हजार रुपये प्रतिहेक्टर यापैकी जी रक्कम जास्त असेल, त्या दराने वार्षिक भाडेपट्टा शेतकऱ्यांना देण्यात येईल.

## शेतीसाठी दिवसा वीज

शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा होण्यासाठी आगामी ३ वर्षात ३० टक्के कृषी वीजवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात येणार असून सुमारे ९.५० लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल. तसेच प्रधानमंत्री कुसुम योजनेतून पुढील वर्षात १.५० लाख सौर कृषिपंप लावण्यात येतील. प्रलंबित असलेल्या ८६ हजार ७३ कृषिपंप अर्जदारांना वीज जोडण्या तत्काळ देण्यात येतील.



उपसा जलसिंचन योजनेतील शेतकऱ्यांना वीजदरात सवलतीची मुदत मार्च २०२३ पर्यंत होती, या सवलतीस मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येईल.

विद्युत ट्रान्सफॉर्मर्स नादुरुस्त असल्यामुळे अनेक शेतकरी बांधवांना पाणी असूनही योग्य वेळेत पिकांना संरक्षित सिंचन मिळत नाही. परिणामी उत्पन्नात घट होते. नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर्स तत्काळ बदलण्यासाठी निरंतर वीज योजना सुरू करण्यात येईल.

## नदीजोड प्रकल्प

उत्तर कोकणातील नार-पार, अंबिका, औरंगा, दमणगंगा, वैतरणा व उल्हास नद्यांच्या उपखोऱ्यातील वाहून जाणारे पाणी,मुंबई शहर आणि गोदावरी खोऱ्यातील तूट दूर करण्यासाठी नदीजोड प्रकल्प राज्य शासनाच्या निधीतून हाती घेण्यात येतील. या प्रकल्पाचा फायदा मराठवाड्यासहित उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर आणि जळगाव या जिल्ह्यांना होईल.



वैनगंगा खोऱ्यातील पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी वैनगंगा-नळगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्पातून विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलडाणा व वाशिम या जिल्ह्यांतील अवर्षणप्रवण क्षेत्रात वळवण्यात येईल. याबाबतच्या सर्व आवश्यक मान्यता देऊन, प्रकल्पासाठी विशेष निधीची उभारणी करून लवकरात लवकर कामे सुरू करण्यात येतील.

## तापी महापुनर्भरण प्रकल्प

तापी खोऱ्यातील नैसर्गिक भूमिगत विस्तीर्ण पाणीसाठ्याची पातळी दिवसेंदिवस खालावत चालली आहे.

पश्चिम विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्राच्या सिंचनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या तापी महापुनर्भरण प्रकल्पाच्या मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल.

## कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्प

धाराशिव व बीड जिल्ह्यातील १३३ गावांना कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाचा लाभ होणार आहे. या प्रकल्पासाठी ११ हजार ६२६ कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

## सिंचन प्रकल्प

राज्यात प्रगतिपथावरील २६८ सिंचन प्रकल्पांपैकी सन २०२३-२४ मध्ये ३९ प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. आमच्या शासनाने मागील सहा महिन्यांत २७ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतील मंजूर २७ प्रकल्पांपैकी ९ प्रकल्प आतापर्यंत पूर्ण झाले असून, सन २०२३-२४ मध्ये ६ प्रकल्प पूर्ण करण्यात येतील. बळीराजा जलसंजीवनी योजनेतील मंजूर ९१ प्रकल्पांपैकी सन २०२३-२४ मध्ये २४ प्रकल्प पूर्ण करण्यात येतील. गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पास सन २०२३-२४ मध्ये १ हजार ५०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल. हा प्रकल्प जून २०२४ पर्यंत पूर्ण करण्यात येईल. कोकणामध्ये सिंचनाच्या सोयीसुविधा निर्माण करण्याकरिता एक विशेष कृती कार्यक्रम हाती घेण्यात येईल. तसेच खारभूमी बंधाऱ्यांच्या कामांना गती दिली जाईल.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता जलसंपदा, लाभक्षेत्र विकास व खारभूमी विभागास १५ हजार ६६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

## मराठवाडा वॉटर ग्रीड

मराठवाड्याच्या दुष्काळमुक्तीसाठी सिंचन, पिण्याच्या पाण्याच्या सततच्या समस्येवर मात करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर, वैजापूर व पैठण तालुक्यांना जायकवाडी धरणातून,



बीड व लातूर जिल्ह्यांकरिता जायकवाडी, माजलगाव, उर्ध्वमनार या धरणातून, धाराशिव जिल्ह्यासाठी उजनी, सिना कोळेगाव, निम्नतेरणा धरणातून प्रथम, द्वितीय व तृतीय वॉटर ग्रीड निर्माण

करण्याची कार्यवाही सुरू आहे. ‘हर घर जल’ योजनेंतर्गत मराठवाडा वॉटर ग्रिडचा प्रस्ताव केंद्रशासनाच्या मान्यतेकरिता पाठवलेला आहे.

### जलजीवन मिशन

जलजीवन मिशन अंतर्गत सन २०२३-२४ मध्ये १७ लाख ७२ हजार कुटुंबांना नळजोडणी देण्याचे प्रस्तावित असून याकरिता सुमारे २० हजार कोटी रुपये निधी उपलब्ध करण्यात येईल.



### जलशाश्वत व स्वच्छ शहरे

राज्यातील सर्व शहरे जलशाश्वत करण्यासाठी सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानातून पाणीपुरवठा प्रकल्प हाती घेण्यात येतील. स्वच्छ महाराष्ट्र अभियानातून १ हजार ६५६ एमएलडी क्षमतेचे मलनिस्सारण प्रकल्प, १० हजार किलोमीटर मलजल वाहिनी, ४ कोटी ५५ लाख मेट्रिक टन साठवलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे प्रकल्प हाती घेण्यात येतील. २२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना १२४ यांत्रिक रस्ता सफाई वाहने उपलब्ध करून देण्यात येतील. ग्रामीण भागातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनांतर्गत १५ हजार १४६ गावांमधील कामे पूर्ण करण्यात येतील.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता पाणीपुरवठा व स्वच्छता विभागास ३ हजार ५४५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

### जलयुक्त शिवार अभियान २.०

यावर्षी अल-निनोच्या परिणामामुळे मान्सूनचा पाऊस सरासरीपेक्षा कमी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे पावसाच्या प्रत्येक थेंबातून जलसंवर्धन अत्यावश्यक आहे. २०१५ ते २०१९ या काळात २२ हजार ५०० गावांत जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात आले. २० हजार ५४४ गावे जलस्वयंपूर्ण होऊन २७ लाख सहस्र घनमीटर पाणीसाठा क्षमता निर्माण झाली. ३९ लाख हेक्टर शेतीला संरक्षित सिंचन सुविधा मिळाली. अफाट लोकप्रिय आणि यशस्वी अशी ही योजना गेल्या काळात बंद करण्यात आली. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आता पुन्हा जलयुक्त शिवार योजना २.० प्रारंभ करून ती ५ हजार गावांमध्ये राबवण्यात येईल.

### गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार

२०१७ मध्ये प्रारंभ करण्यात आलेल्या गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार योजनेत ८ हजार ५०० जलसाठ्यांमधून ७ कोटी घनमीटर गाळ काढण्यात आला. १२ हजार



५०० हून अधिक गावांत, ६६ हजारपेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या शेतात तो टाकण्यात आला. यामुळे शेतीच्या उत्पादकतेत वाढ आणि धरणांच्या साठवण क्षमतेत भरीव वाढ असे दुहेरी उद्देश सफल झाले. जलसाठ्यांमध्ये अजून ४४ कोटी घनमीटर गाळ असल्याचा अंदाज आहे. या योजनेस पुढील तीन वर्ष मुदतवाढ देण्यात येईल.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता मृद् व जलसंधारण विभागास ३ हजार ८८६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. प्रथम अमृत-शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी यासाठी कार्यक्रम खर्चाकरिता एकूण २९ हजार १६३ कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करण्यात येत आहे.**

## महिला, आदिवासी, मागासवर्ग, ओबीसींसह सर्व समाजघटकांचा सर्वसमावेशक विकास

राष्ट्राची प्रगती ही महिला सक्षमीकरणाच्या आधारे ठरविली जाते, त्यासाठी आम्ही चौथे सर्वसमावेशक महिला धोरण घोषित करणार आहोत. जगद्गुरू तुकाराम महाराज म्हणतात, लाडकी लेक *मी संतांची । मजवरी कृपा बहुतांची ।।*

### लेक लाडकी

मुलींच्या सक्षमीकरणासाठी ‘लेक लाडकी’ ही नवीन योजना सुरू करण्यात येईल. पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबातील मुलींच्या जन्मानंतर ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत ४ हजार रुपये, सहावीत ६ हजार रुपये, अकरावीत ८ हजार रुपये अनुदान दिले जाईल. लाभार्थी मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर तिला ७५ हजार रुपये रोख देण्यात येतील.

महिलांना राज्य परिवहन महामंडळाच्या बस प्रवासात तिकीट दरात सरसकट ५० टक्के सवलत देण्यात येईल. महिला खरेदीदाराला निवासी घटकाच्या खरेदीसाठी मुद्रांक शुल्कामध्ये एक टक्का सवलत देण्यात आली आहे. सध्याच्या अटीनुसार १५ वर्षांपर्यंत महिलेला पुरुष खरेदीदारास निवासी घटकाची विक्री करता येत नाही. सदर अट शिथिल करण्यात येईल. तसेच महिलांना अन्य करांत सवलतीची घोषणा

भाग-२ मध्ये करणार आहे.

### ग्रामीण महिला सक्षमीकरण

बचतगटांच्या माध्यमातून ३७ लाख ग्रामीण महिलांना उपजीविकेची साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. बचतगटाच्या माध्यमातून लातूर जिल्ह्यामध्ये



बांबू क्लस्टर व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कोल्हापुरी चप्पल क्लस्टर विकसित करण्यात येईल. केंद्र शासनाने अर्थसंकल्पात घोषित केल्याप्रमाणे मुंबई येथे युनिटी मॉलची स्थापना करण्यात येईल.

### आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तकाच्या मानधनात वाढ

राज्यात सुमारे ८१ हजार आशा स्वयंसेविका व साडेतीन हजार गट प्रवर्तक कार्यरत आहेत. आशा स्वयंसेविकांचे



सध्याचे मानधन ३ हजार ५०० रुपये आहे, तर गट प्रवर्तकाचे मानधन ४ हजार ७०० रुपये आहे. या मासिक मानधनात प्रत्येकी १ हजार ५०० रुपये एवढी वाढ करण्यात येईल.

### अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ

अंगणवाडी सेविकांचे मानधन ८ हजार ३२५ रुपयांवरून १० हजार रुपये, मिनी अंगणवाडी सेविकांचे मानधन ५ हजार ९७५ रुपयांवरून ७ हजार २०० रुपये आणि अंगणवाडी मदतनीसांचे मानधन ४ हजार ४२५ रुपयांवरून ५ हजार ५०० रुपये करण्यात येईल.

### महिलांसाठी योजना

- महिलांच्या सुरक्षित व सुविधाजनक प्रवास व पर्यटनासाठी महिला केंद्रित पर्यटन धोरण तयार करण्यात येईल.
- देशाच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीशील बदलामुळे शहरी भागात नोकरीकरिता अनेक महिला त्यांचे घर सोडून राहत आहेत. अशा नोकरी करणाऱ्या महिलांसाठी केंद्र शासनाच्या मदतीने नवीन ५० वसतिगृहे सुरू करण्यात येतील.
- सध्या राबवण्यात येत असलेल्या अडचणीत सापडलेल्या महिलांसाठी, लैंगिक शोषणापासून मुक्त केलेल्या महिलांसाठी, कौटुंबिक समस्याग्रस्त महिलांसाठी, स्वाधार व उज्ज्वला योजना एकत्रित करून केंद्र शासनाच्या मदतीने शक्ती सदन ही नवीन योजना सुरू करण्यात येईल. या योजनेमध्ये पीडित महिलांना आश्रय, विधी सेवा, आरोग्य सेवा, समुपदेशन इत्यादी सेवा देण्यात येतील. या योजनेंतर्गत नवीन ५० शक्ती सदन सुरू करण्यात येतील.
- महिलांच्या आरोग्यासाठी 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' अभियानांतर्गत ४ कोटी महिला व मुलींची आरोग्य तपासणी व औषधोपचार करण्यात येतील.
- राज्यातील अंगणवाडी, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांची रिक्त असलेली सुमारे २० हजार पदे भरण्यात येतील.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता महिला व बाल विकास विभागास २ हजार ८४३ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

### आरोग्य सुविधा

मी आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची घोषणा करतो. महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेत उपचाराची मर्यादा वार्षिक १.५० लाखांवरून ५ लाख रुपये करण्यात येईल. नवीन २०० रुग्णालयांचा या योजनेत समावेश करण्यात येईल. तसेच मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रियांच्या दरात २.५० लाखांहून ४ लाख रुपये इतकी वाढ करण्यात येईल.

### आपला दवाखाना

मुंबईत हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या नावे 'आपला दवाखाना' उपक्रमाला प्रचंड प्रतिसाद लाभल्यानंतर



आता ही योजना संपूर्ण महाराष्ट्रात सुरू करण्यात येत आहे. संपूर्ण राज्यात ७०० दवाखाने सुरू करून त्यात विनामूल्य वैद्यकीय चाचण्या, चिकित्सा व उपचार करण्यात येतील.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सार्वजनिक आरोग्य विभागास ३ हजार ५०१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

### विशेष साहाय्य योजनेतील अर्थसाहाय्यात वाढ

आमचे सरकार कायम अंत्योदयाचा विचार करणारे आहे. त्यामुळेच संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेतील पात्र लाभार्थ्यांच्या अर्थसाहाय्यात



१००० वरून १५०० रुपये इतकी वाढ करण्यात येत आहे. यासाठी २ हजार ४०० कोटी रुपये अतिरिक्त तरतूद करण्यात येईल. हे मानधन प्रतिमाह पहिल्याच आठवड्यात नियमितपणे प्रदान करण्यात येईल.

### ज्येष्ठांसाठी...

- ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रत्येक महानगरपालिका क्षेत्रात विरंगुळा केंद्रे स्थापित करण्यात येतील.
- ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय वयोश्री योजनेचा राज्य शासनाकडून विस्तार करून वयोवृद्धांसाठी वैद्यकीय उपकरणे व अन्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, त्यामुळे लाभार्थींच्या संख्येत वाढ होईल.

### आनंदाचा शिधा

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमाखालील लाभार्थी कुटुंबांना दीपावलीनिमित्त फक्त १०० रुपयांत प्रत्येकी एक किलो रवा, चणाडाळ, साखर आणि एक लिटर खाद्यतेल असा शिधा देण्यात आला. आता गुढीपाडवा - डॉ. बाबासाहेब आंबेडकर



जयंतीनिमित्त १ कोटी ६३ लाखांहून अधिक कुटुंबांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात येईल. याकरिता ४७३ कोटी रुपये खर्च येईल.

सर्व समाजघटकांना सोबत घेऊनच आमची कायम वाटचाल राहिली आहे. जगद्‌गुरू तुकाराम महाराज यांनीही तेच तत्त्व सांगितले आणि त्यांच्याच शब्दात सांगायचे तर सकळांसी येथे आहे अधिकार हेच आमच्या सरकारचे ब्रीद आहे.

### महामंडळांच्या भागभांडवली अनुदानात वाढ

वेगवेगळ्या समाजघटकांच्या उन्नतीसाठी स्थापन झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, श्यामराव पेजे आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, महिला आर्थिक विकास महामंडळ, संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ या महामंडळांसाठी पुरेशी तरतूद करण्यात येत आहे.

### महामंडळाची स्थापना

लिंगायत समाजातील तरुण, सुशिक्षित बेरोजगार आणि नवउद्योजकांना स्वयंउद्योगासाठी अर्थसाहाय्य देण्याकरिता जगद्‌ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ, गुरव समाजासाठी संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ, रामोशी समाजासाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, वडार समाजासाठी पैलवान कै. मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ यांची महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळांतर्गत स्थापना करण्यात येईल. ही महामंडळे विविध कल्याणकारी योजना राबवतील. त्यासाठी प्रत्येकी ५० कोटी रुपये अधिकृत भागभांडवल उपलब्ध करून देण्यात येईल.

छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्थेचे (सारथी) नाशिक येथे विभागीय कार्यालय, सुसज्ज अभ्यासिका तसेच मुलांचे व मुलींचे वसतिगृह सुरू करण्याकरिता ५० कोटी रुपये निधी देण्यात येईल.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सामाजिक न्याय व विशेष साहाय्य आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागास अनुक्रमे १६ हजार ४९४ कोटी रुपये आणि ३ हजार ९९६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

### दिव्यांग कल्याण विभागाची स्थापना

आमच्या शासनाने १५ डिसेंबर २०२२ रोजी स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग निर्माण केला आहे. या विभागाकडून दिव्यांगांचे शिक्षण, पुनर्वसन, रोजगार, स्वयंरोजगार यासंबंधी कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येईल.



२५० शासकीय आदिवासी आश्रमशाळांना आदर्श आश्रमशाळा म्हणून दर्जोन्नत करण्यात येईल. अनुसूचित जमातीच्या पी.एच.डी. करणाऱ्या १०० विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी अधिछात्रवृत्ती योजना राबवण्यात येईल. अल्पसंख्याक महिलांच्या आर्थिक विकासासाठी १५ जिल्ह्यांमध्ये सुमारे ३ हजार बचतगटाची निर्मिती करण्यात येईल, बचतगटातील महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येईल. अल्पसंख्याक समुदायातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत २५ हजार रुपयांवरून ५० हजार रुपये वाढ करण्यात आली आहे.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता दिव्यांग कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग आणि अल्पसंख्याक विकास विभागास अनुक्रमे १ हजार ४१६ कोटी रुपये, १२ हजार ६५५ कोटी रुपये आणि ७४३ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

## ग्रामीण गृहनिर्माण

सर्वांसाठी घरे ही मा. प्रधानमंत्री महोदयांची अतिशय महत्त्वाकांक्षी योजना आहे. राज्यातही ग्रामीण भागात १० लाख घरांचा कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत या वर्षी ४ लाख घरे बांधून पूर्ण करण्यात येतील. यातील २.५ लाख अर्थात ६० टक्के घरे ही अनुसूचित जाती आणि जमातींच्या लाभार्थ्यांसाठी, तर १.५ लाख घरकुले ही इतर प्रवर्गासाठी असतील.

रमाई आवास योजनेत १८०० कोटी रुपये निधी देऊन १.५ लाख घरकुलांची बांधणी करण्यात येईल आणि यातील किमान २५ हजार घरे ही मातंग समाजासाठी असतील. शबरी, पारधी व आदिम आवास योजनेत १२०० कोटी रुपये खर्च करून १ लाख घरे बांधण्यात येतील.

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेत विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी २५ हजार तसेच धनगर समाजातील लाभार्थ्यांसाठी २५ हजार घरे बांधण्यात येतील. यासाठी ६०० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

## मोदी आवास घरकुल योजना

इतर मागासवर्गीय लाभार्थ्यांसाठी येत्या तीन वर्षात १० लाख घरे बांधण्यासाठी नवीन मोदी आवास घरकुल योजना सुरू करण्यात येईल. या योजनेसाठी येत्या ३ वर्षांत १२ हजार कोटी रुपये उपलब्ध करून



देण्यात येतील. यापैकी ३ लाख घरे ३ हजार ६०० कोटी रुपये खर्च करून २०२३-२४ या पहिल्या वर्षांत पूर्ण करण्यात येतील.

## असंघटित कामगार कल्याण मंडळ

असंघटित क्षेत्रातील ३ कोटींहून अधिक कामगारांना सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्यात येईल.



राज्यातील ऑटोरिक्षा, टॅक्सीचालक व मालकांसाठी कल्याणकारी योजना राबवण्याकरिता महाराष्ट्र राज्य ऑटोरिक्षा व टॅक्सी चालक-मालक कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्यात येईल.

माती कारागिरीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन रोजगार निर्मितीस चालना देण्याकरिता आमच्या शासनाने सन २०१८ मध्ये संत शिरोमणी गोरोबा काका महाराष्ट्र मातीकला मंडळाची स्थापना केली आहे. याकरिता सन २०२३-२४ मध्ये २५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता गृहनिर्माण विभागास १ हजार २३२ कोटी आणि कामगार विभागास १५६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. द्वितीय अमृत-महिला, आदिवासी, मागासवर्ग, ओबीसींसह सर्व समाजघटकांचा सर्वसमावेशक विकास यासाठी कार्यक्रम खर्चाकरीता एकूण ४३ हजार ३६ कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करण्यात येत आहे.**

# भरीव भांडवली गुंतवणुकीतून पायाभूत सुविधा विकास

देश जेव्हा ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे झेप घेतोय, तेव्हा महाराष्ट्राने सुद्धा त्यात १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचा वाटा उचलण्याचे ठरवले आहे. २०२८-२९ पर्यंत स्थूल देशांतर्गत उत्पन्नात १४.२ टक्क्यांवरून २० टक्के झेप घेण्यासाठी पायाभूत सुविधा निर्मितीवर आमचा भर आहे. यातूनच राज्याचा समग्र विकास साध्य होणार आहे.

## समृद्धी महामार्ग

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे ८८ टक्के काम पूर्ण झाले आहे. यातील नागपूर ते शिर्डी या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण मा. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते डिसेंबर २०२२ मध्ये



झाले. फेब्रुवारी २०२३ पर्यंत १० लाख वाहनांनी या मार्गाचा वापर केला आहे. आता या महामार्गाचा विस्तार करून सिंदखेडराजा नोड ते शेगावपर्यंत चौपदरी महामार्ग बांधण्यात येईल.

## शक्तिपीठ महामार्ग

वर्धा जिल्ह्यातील पवनार ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पात्रादेवी असा नागपूर-गोवा शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग अर्थात महाराष्ट्र शक्तिपीठ महामार्गाचा तांत्रिक आणि वित्तीय सुसाध्यता अहवाल तयार होतो आहे. ७६० कि.मी.च्या या महामार्गामुळे माहुर, तुळजापूर, कोल्हापूर, अंबेजोगाई ही शक्तिपीठे जोडली जाणार आहेत. औंढा

नागनाथ, परळी वैजनाथ ही दोन ज्योतीर्लिंगे, नांदेड येथील तख्त सचखंड श्रीहजूर साहिब गुरुद्वारा, महाराष्ट्राचे आराध्यदैवत विठ्ठल रुखमाईचे पंढरपूर तसेच कारंजा लाड, अक्कलकोट, गाणगापूर, नरसोबाची वाडी, औदुंबर ही तीर्थस्थळेही जोडली जातील. हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव अशा सहा जिल्ह्यातून जाणारा हा महामार्ग मराठवाड्यातील अर्थकारणाला भक्कम पाठबळ देईल. वर्धा, यवतमाळ, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या विकासाला मोठी चालना मिळेल. या प्रकल्पावर ८६ हजार ३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

### विकासाचे महामार्ग

पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने सुमारे २७ हजार कोटी रुपये खर्चून पुणे रिंगरोडचे काम सुरू आहे. सन २०२२-२३ मध्ये १००० कोटी रुपये दिले आहेत. येत्या वर्षी भूसंपादनासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.



मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खोपोली ते खंडाळा या घाट लांबीतील मिसिंग लिंकच्या बांधकामासाठी ६ हजार ६९५ कोटी रुपये सुधारित किमतीस मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पाचे ६० टक्के काम पूर्ण झाले आहे.

विरार ते अलिबाग ही १२६ किलोमीटर लांबीची बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका ही अनेक राष्ट्रीय महामार्ग, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट, मुंबई पोरबंदर प्रकल्प, दिल्ली-मुंबई राखीव मालवाहतूक मार्गिका आणि रेवस बंदराला जोडणारी महत्त्वाची मार्गिका आहे. यामध्ये बस जलद वाहतूक, मेट्रो रेल्वे, पाणीपुरवठा वाहिनी, वायुवाहिनी, सांडपाणी वाहिनी या सर्व बाबींचा समावेश आहे. प्रकल्पाचा अपेक्षित खर्च ४० हजार कोटी असून सविस्तर प्रकल्प अहवाल व वित्तीय आराखडा तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.

रायगड जिल्ह्यातील रेवस ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेड्डी या सागरी महामार्गाचे काम सुरू असून प्रकल्पाचा एकूण खर्च ९ हजार ५७३ कोटी रुपये आहे.

### रस्ते विकास

आशियाई विकास बँक प्रकल्प टप्पा २ मध्ये सुमारे ४ हजार कोटी रुपयांतून ४६८ कि.मी. लांबीची कामे आणि हायब्रीड न्यूईटी भाग २ अंतर्गत ९० हजार कोटी रुपयांतून ७ हजार ५०० किलोमीटरच्या रस्ते विकासाची कामे हाती घेतली जातील.

२०२३-२४ या वर्षात रस्ते आणि पूल यासाठी १४ हजार २२५ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित असून यातून सुमारे १० हजार १२५ कि.मी. लांबीची रस्ते सुधारणा व १ हजार २०३ पूल व मोऱ्यांची कामे पूर्ण केली जातील.

### एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली

मुंबई -पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर राबवण्यात येत असलेल्या एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणालीच्या धर्तीवर मुंबई-कोल्हापूर, ठाणे-धुळे, नाशिक-पुणे, सोलापूर-बीड, नागपूर-चंद्रपूर, नागपूर-अमरावती, घोडबंदर-अचाड, अहमदनगर-पुणे आणि अकोला-वाशिम या महामार्गावर ही प्रणाली राबवण्यात येईल.

### ग्रामीण रस्ते

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग या रस्त्यांची ३ हजार कोटी रुपये किमतीची ४ हजार ५०० किलोमीटर लांबीच्या रस्ते सुधारणांची कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हाती घेण्यात येतील.



### ग्राम सडक योजना

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना टप्पा ३ अंतर्गत महाराष्ट्र राज्यासाठी सुमारे साडेसहा हजार किलोमीटर लांबीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी साडेपाच हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे प्रगतिपथावर आहेत. मुख्यमंत्री ग्रामसडक



योजनेत रस्ते टिकाऊ व्हावे यासाठी हे रस्ते बांधताना सिमेंट काँक्रिट तसेच नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. मातोश्री ग्रामसमृद्धी पांदण शेत रस्ते योजनेत सुधारणा करून नवीन योजना सुरू करण्यात येईल.

### पायाभूत सुविधा विकास महामंडळ

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाची स्थापना करून विशेष मोहिमेद्वारे दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्रे, शाळा, अंगणवाड्यांची बांधकामे प्राधान्याने करण्यात येतील.

### वाड्या-वस्त्या रस्त्याने जोडणे

सर्व आदिवासी पाडे बारमाही रस्त्यांना जोडण्यासाठी नवीन बिरसा मुंडा जोडरस्ते योजना, सर्व बंजारा तांड्यांसाठी नवीन संत सेवालाल महाराज जोडरस्ते योजना तसेच सर्व धनगर वाड्या-वस्त्यांसाठी यशवंतराव होळकर जोडरस्ते योजना सुरू करण्यात येतील. या योजनांसाठी एकंदरीत ४ हजार कोटी रुपये तरतूद करण्यात येईल.

### सीमावर्ती भागातील गावांच्या विकासासाठी कार्यक्रम

राज्यातील सीमावर्ती भागातील गावांमध्ये रस्ते, वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य व ग्राम विकासाच्या विविध योजना राबवण्याचा सर्वंकष कार्यक्रम तयार करण्यात येईल.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागास १९ हजार ४९१ कोटी,ग्राम विकास व पंचायत राज विभागास ८ हजार ४९० कोटी आणि नियोजन व रोजगार हमी योजना विभागास १० हजार २९७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

### राज्यातील मेट्रो प्रकल्प

- नागपूर मेट्रोच्या पहिल्या टप्प्यात ४० कि.मी.चा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. दुसऱ्या टप्प्यातील विस्तारीकरणाला केंद्र सरकारने मान्यता दिली असून, एकूण ४३.८० कि.मी. लांबीच्या प्रकल्पाचे काम ६ हजार ७०८ कोटी रुपये खर्च करून २०२३-२४ मध्ये हाती घेण्यात येईल.



- पुण्यातील हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो रेल्वे या २३.३ किलोमीटर लांबीच्या प्रकल्पाची अंदाजित किंमत ८ हजार ३१३ कोटी रुपये असून, काम प्रगतीत आहे.
- नवीन मेट्रो प्रकल्पही हाती घेण्याचे प्रस्तावित असून ठाणे शहराचा वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्प, नाशिक मेट्रो निओ प्रकल्प, पुणे मेट्रोच्या पिंपरी-चिंचवड ते निगडी कॉरिडॉर आणि स्वारगेट ते कात्रज मेट्रो प्रकल्प केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठवले आहेत. केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पांची कामे हाती घेण्यात येतील.

### रेल्वे प्रकल्प

- केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी यापूर्वी कधीही झाली नाही, एवढी १३ हजार ५३९ कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. याबद्दल मी मा. प्रधानमंत्री महोदयांचे राज्यातील जनतेच्या वतीने आभार मानतो.



- राज्याच्या ग्रामीण विशेषत: अविकसित भागात रेल्वेप्रकल्प गतीने पूर्ण करण्याचा शासनाचा मानस असून, यापूर्वी बंद करण्यात आलेला ५० टक्के राज्यहिस्सा देण्याचे धोरण या शासनाने स्वीकारले आहे. अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ, वर्धा-यवतमाळ-नांदेड, वडसा-देसाईगंज-गडचिरोली, नागपूर-नागभीड या मार्गांची कामे विविध टप्प्यात असून केंद्र सरकारने कल्याण-मुरबाड या नवीन रेल्वेमार्गाला मान्यता दिली आहे.
- नाशिक-पुणे या सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाला निधी उपलब्ध करून देण्यात येईल.
- सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या ८४ किलोमीटरच्या नवीन ब्रॉडगेज मार्गासाठी राज्य हिस्सा ४५२ कोटी रुपये देण्यात येतील.
- नांदेड - बिदर, फलटण - पंढरपूर, खामगाव - जालना तसेच वरोरा - चिमूर - कांपा या ४ नवीन रेल्वेमार्गांसाठी सुद्धा ५० टक्के राज्यहिस्सा शासन प्रदान करेल.
- राज्यात सुमारे २५०० रेल्वे फाटके आहेत. सेतूबंधन कार्यक्रमांतर्गत उड्डाणपूल, भुयारी मार्ग बांधण्यात येतील. सध्या १०० कामे होत असून मे २०२३ पर्यंत २५ उड्डाणपूल सुरू होतील. २०२३-२४ मध्ये आणखी २५ उड्डाणपूल पूर्ण करण्यात येतील.

### बसस्थानकांची सुधारणा

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या १०० बसस्थानकांच्या आधुनिकीकरण, दर्जावाढ व पुनर्बांधणीसाठी सुमारे ४०० कोटी रुपये रकमेची कामे हाती घेण्यात येतील.



### विमानतळे

- शिर्डी विमानतळ येथे ५२७ कोटी रुपये खर्चून नवीन प्रवासी टर्मिनल उभारण्यात येईल.
- छत्रपती संभाजीनगर विमानतळाच्या भूसंपादनासाठी ७३४ कोटी रुपये निधी देण्यात येईल.
- नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विस्तार व पुरंदर येथील नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नियोजन सुरू आहे.
- नागपुरातील मिहान प्रकल्पासाठी १०० कोटी रुपये निधी देण्यात येईल. अमरावतीतील बेलोरा आणि अकोल्यातील शिवणी येथील विमानतळांच्या विकासाची कामे हाती घेण्यात येत आहेत.



### मुंबईतील विविध पायाभूत प्रकल्प

- महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दादर, मुंबई येथील स्मारकाचे काम एप्रिल २०२५ पर्यंत पूर्ण करण्यात येईल. या कामासाठी ३४९ कोटी रुपये निधी शासनाने उपलब्ध करून दिला असून उर्वरित ७४१ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.
- शिवाजी पार्क दादर येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच्या पहिल्या टप्प्याचे काम मे २०२३ अखेर पूर्णत्वास जाईल. यासाठी राज्य शासनाकडून ३५१ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येतील.
- मुंबई, एमएमआर आणि ठाणे परिसरातील प्रवाशांच्या सुविधेला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. त्यामुळे ३३७ कि.मी. लांबीचे मेट्रो जाळे विकसित करण्यात येत असून, ४६ कि.मी.चा मार्ग वाहतुकीस खुला झाला आहे. २०२३-२४ या वर्षात आणखी ५० कि.मी. मार्ग खुला होईल.



मुंबईतील हाती घेण्यात येत असलेले नवीन मेट्रो प्रकल्प असे : मुंबई मेट्रो मार्ग १०- गायमुख ते शिवाजी चौक, मिरा रोड ; एकूण लांबी ९.२ किलोमीटर, अंदाजित किंमत ४ हजार ४७६ कोटी रुपये,; मुंबई मेट्रो मार्ग-११ वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एकूण लांबी १२.७७ किलोमीटर, अंदाजित किंमत ८ हजार ७३९ कोटी रुपये,; मेट्रो मार्ग १२ कल्याण ते तळोजा, लांबी २०.७५ किलोमीटर प्रकल्पाचा अंदाजित खर्च ५ हजार ८६५ कोटी रुपये, हे प्रकल्प लवकरच पूर्ण करण्यात येतील.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागास १ हजार ९२० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

- मुंबईच्या सुशोभिकरणासाठी १ हजार ७२९ कोटी अंदाजित खर्चाची नागरी सेवासुविधा सुधारणेची ८२० कामे हाती घेतली आहेत, १२१ कामे पूर्ण झाली असून, उर्वरित कामे प्रगतिपथावर आहेत.
- मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणामार्फत पारसिक हिल्स बोगदा, मिरा-भाईंदरला पाणीपुरवठा, मुंबई पारबंदर प्रकल्पांचे काम आणि विविध उड्डाणपुलांची कामे या वर्षी पूर्णत्वास येतील.
- मुंबई सभोवताली जलवाहतुकीसाठी ठाणे व वसई खाडी एकमेकांना जोडण्याचे ४२४ कोटी रुपये किमतीचे काम हाती घेण्यात येत आहे. गेट वे ऑफ इंडिया जवळ रेडिओ क्लब नजीक प्रवासी जलवाहतुकीसाठी जेट्टी व संबंधित सुविधा उभारण्याच्या १६२.२० कोटी रुपये किमतीच्या



प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे दक्षिण मुंबईहून कल्याण, डोंबिवली, ठाणे, वसई खाडी, नवी मुंबई अशी जलमार्गाने प्रवासी वाहतूक शक्य होईल.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता नगरविकास विभागास ९ हजार ७२५ कोटी, परिवहन व बंदरे विभागास ३ हजार ७४६ कोटी आणि सामान्य प्रशासन विभागास १ हजार ३१० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. तृतीय अमृत-भरीव भांडवली गुंतवणुकीतून पायाभूत सुविधा विकास यासाठी कार्यक्रम खर्चाकरीता एकूण ५३ हजार ५८ कोटी ५५ लाख रुपयाची तरतूद उपलब्ध करण्यात येत आहे.**

## रोजगार निर्मिती: सक्षम, कुशल-रोजगारक्षम युवा

### लॉजिस्टिक धोरण

महाराष्ट्राचे नवीन लॉजिस्टिक धोरण तयार करण्यात येत आहे. भारताचे मध्यवर्ती केंद्र असलेल्या व दळणवळणाच्या दृष्टीने संपूर्ण भारतातील वाहतुकीचे मध्यवर्ती ठिकाण असणाऱ्या नागपूर येथे १ हजार एकर जमिनीवर लॉजिस्टिक हब तयार करण्याचा शासनाचा मानस आहे.

### सर्क्युलर इकॉनॉमी पार्क

केंद्र शासनाच्या रिड्युस, रियुज, रिसायकल या तत्त्वावर आधारित सर्क्युलर इकॉनॉमी पॉलिसीला अपेक्षित उद्योग उभे राहावेत, यासाठी विशिष्ट क्षेत्र तयार करून राज्यात नागपूर, मुंबई महानगर प्रदेश, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक व रत्नागिरी या सहा ठिकाणी सर्क्युलर इकॉनॉमी पार्क उभारण्याचा शासनाचा मानस आहे.

### वस्त्रोद्योग, खनिकर्म धोरण

वस्त्रोद्योग व खनिकर्म क्षेत्राला चालना देण्यासाठी सन २०२३-२४ मध्ये शासन नवीन धोरण जाहीर करील.

### गुंतवणूक व रोजगार निर्मिती

औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी स्थानिक पातळीवर तसेच दावोस येथे १ लाख ५० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचे गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले आहेत. २०२३-२४ या आर्थिक वर्षात १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त थेट परकीय गुंतवणूक प्राप्त होईल, ज्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल.

### प्रशिक्षण व संशोधन संस्था

स्टार्टअप्स सुरू करण्याकरिता आवश्यक प्रशिक्षणासाठी कळंबोली, नवी मुंबई येथे निवासी प्रशिक्षण व संशोधन संस्था उभारण्याचा शासनाचा मानस आहे.

### रत्ने व दागिने याबाबतचे धोरण

राज्य शासनाकडून जेम्स अ‍ॅण्ड ज्वेलरी संदर्भात नवीन धोरण तयार करण्यात येत आहे. नवी मुंबई येथे भव्य जेम्स व ज्वेलरी पार्क उभारण्यात येत आहे. प्रयोगशाळेत तयार होणारे हिरे, रत्ने व आभूषणांच्या उद्योगांना विशेष प्रोत्साहन देण्यात येईल.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता उद्योग विभागास ९३४ कोटी आणि वस्त्रोद्योग विभागास ७०८ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

### मधाचे गाव

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने मधाचे गाव ही नावीन्यपूर्ण संकल्पना विकसित केली आहे. मांघर, ता. महाबळेश्वर हे गाव मधाचे गाव म्हणून प्रसिद्ध झाले आहे. गावातील लोकांना कायमचा रोजगार मिळाला असून मधमाशी संवर्धन झाले आहे. हा उपक्रम राज्यातील इतर जिल्ह्यातही राबवण्यात येईल.




जगद्गुरु तुकाराम महाराज म्हणतात, *असाध्य ते साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ॥* आजच्या आधुनिक काळात कौशल्यविकास हा रोजगाराचा आत्मा आहे.

### कौशल्यविकासासाठी

- डिसेंबर २०२२ अखेर ३१७ रोजगार मेळाव्यांतून २९ हजार ८७० उमेदवारांची निवड झाली. राजभवन येथे आयोजित कार्यक्रमात १ लाख २५ हजार उमेदवारांना रोजगार देण्यासाठी उद्योजकांशी सामंजस्य करार करण्यात आले.



- प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेत ४ लाख ८५ हजारांहून अधिक तरुणांनी प्रशिक्षण पूर्ण केले. २ लाख ८१ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना गटशेती व्यावसायिकांच्या नोकरीसाठी प्रशिक्षित-प्रमाणित केले. यातूनच ३०० शेतकरी उत्पादक गटांची स्थापना झाली.
- गावांकडून शहरांकडे होणारे स्थलांतर थांबावे यासाठी स्थानिक पातळीवरील रोजगार व स्वयंरोजगाराकरिता ५०० ग्रामपंचायतींमध्ये कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करण्यात येईल.
- लहान मुलांमध्ये कौशल्य शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून महानगरपालिका व जिल्हा परिषद शाळांमध्ये कौशल्य प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येतील. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून मुंबईतील २०० शाळांमध्ये प्रशिक्षणाची सुरुवात करण्यात येईल.



- कौशल्यवर्धनाद्वारे युवकांना रोजगारक्षम बनवण्याकरिता पुढील तीन वर्षांत २ हजार ३०७ कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक करून राज्यातील ५०० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दर्जावाढ करण्यात येईल. तसेच ७५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे आधुनिकीकरण करण्यासाठी ६१० कोटी रुपयांचा प्रकल्प राबवण्यात येईल.
- १ नोव्हेंबर २०२२ रोजी महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठात बीबीए इन रिटेल मॅनेजमेंट, एमबीए इन इनोव्हेशन अँड न्यू व्हेंचर, सायबर सुरक्षा यांसारखे शैक्षणिक कार्यक्रम सुरू आहेत.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विकास विभागास ७३८ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

### शिक्षण क्षेत्रातील एकूण गुंतवणूक

शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग, दिव्यांग कल्याण विभाग, महिला व बालविकास विभाग तसेच इतर मागास व बहुजन कल्याण विभागांच्या माध्यमातून अंगणवाडी ते उच्च शिक्षणासाठी १ लाख ८६६ कोटी रुपये गुंतवणूक करण्यात आली आहे. शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन या गुंतवणुकीत वाढ करून सन २०२३-२४ मध्ये १ लाख ११ हजार

२८५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे.

## शिक्षण क्षेत्रासाठी...

- भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून शासनाच्या नियंत्रणाखालील आस्थापनांमध्ये रिक्त असलेली ७५ हजार पदे भरण्याची मोहीम आमच्या शासनाने हाती घेतली आहे.
- शिष्यवृत्तीच्या रकमेत पाचवी ते सातवी इयत्तांकरिता १ हजार रुपयांवरून ५ हजार रुपये आणि ८ वी ते १० वी इयत्तांकरिता १ हजार ५०० रुपयांवरून ७ हजार ५०० रुपये प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी वाढ करण्यात येईल.



- राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या इयत्ता आठवीपर्यंतच्या सर्व प्रवर्गांच्या विद्यार्थ्यांना शासनाकडून गणवेश वितरण करण्यात येईल.
- प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षण सेवकांना ६ हजार रुपयांवरून १६ हजार रुपये, माध्यमिक शिक्षण सेवकांना ८ हजार रुपयांवरून १८ हजार रुपये आणि उच्च माध्यमिक शिक्षण सेवकांना ९ हजार रुपयांवरून २० हजार रुपये मानधन वाढ देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.
- शासनाकडून खासगी अनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदानावर आणण्याची प्रक्रिया सुरू आहे. या वर्षी अंशतः अनुदानित शाळांना अनुदान देण्यासाठी १ हजार १६० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार पीएमश्री शाळा या योजनेचा आरंभ करण्यात आला आहे. ८१६ शाळांना पीएमश्री शाळा म्हणून विकसित करण्यासाठी पुढील पाच वर्षात १ हजार ५३४ कोटी रुपये निधी उपलब्ध करण्यात येईल.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता शालेय शिक्षण विभागास २ हजार ७०७ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

## उत्कृष्टता केंद्र

उद्योगांना आवश्यक व तंत्रप्रशिक्षित मनुष्यबळाची निर्मिती, उद्योगांशी प्रभावी समन्वय व नवीन संशोधन यातून रोजगार निर्मितीसाठी दहा उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्याचे प्रस्तावित आहेत.

## नामांकित संस्थांसाठी विशेष अनुदान

राज्यातील नामांकित शिक्षण संस्थांना विशेष अनुदान देण्यासाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ५०० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येतील. या संस्था पुढीलप्रमाणे आहेत. महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ नागपूर, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर



व संशोधन संस्था पुणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पुणे, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ याशिवाय लक्ष्मी नारायण इन्स्टिट्युट ऑफ टेक्नोलॉजी, नागपूर या संस्थांना अभिमत विद्यापीठाचा दर्जा देऊन विशेष अनुदान देण्यात येईल.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची बांधकामे

राज्यात १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची बांधकामे करण्यात येणार असून त्यात सातारा, अलिबाग, सिंधुदुर्ग,



धाराशिव, परभणी, अमरावती, भंडारा, जळगाव, रत्नागिरी, गडचिरोली, वर्धा, बुलडाणा, पालघर आणि ठाणे जिल्ह्यांतील अंबरनाथचा समावेश आहे.

## नवीन व्यसनमुक्ती केंद्रे

मानसिक अस्वास्थ्य आणि व्यसनाधीनतेची वाढती समस्या लक्षात घेता, जालना, भिवंडी, पुणे आणि नागपूर येथे नवीन व्यसनमुक्ती केंद्रे कार्यान्वित करण्यात येतील. ठाणे आणि कोल्हापुरात ८५० कोटी रुपये खर्चून अत्याधुनिक मनोरुग्णालये प्रस्तावित आहेत.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास २ हजार ३५५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

## पर्यटनसाठी...

- प्रत्येक जिल्ह्यातील किमान ५०० युवकांना जलपर्यटन, कृषी पर्यटन,

कॅराव्हॅन पर्यटन, साहसी पर्यटन, शाश्वत पर्यटन तसेच आदरातिथ्य क्षेत्रात प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम करण्यात येईल.



- पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यानाचा नागपूर येथील फुटाळा तलावाच्या धर्तीवर विकास करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.
- पर्यटकांची चांगली निवास व्यवस्था व्हावी म्हणून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वतीने दहा पर्यटनस्थळांवर टेंट सिटी उभारण्यात येतील.
- पर्यटनास चालना देण्यासाठी राज्याचा वार्षिक महोत्सव आराखडा तयार केला आहे. जव्हारचा भगवान बिरसा मुंडा महोत्सव, नांदेड येथील वीर बाल दिवस महोत्सव, शिवनेरीवरील शिवजन्मोत्सव अशा विविध महोत्सवांचा त्यात समावेश आहे.

### क्रीडा क्षेत्रासाठी..

- खेळाडूंची कामगिरी उंचावण्यासाठी मिशन लक्षवेध राबवण्यात येईल. बालेवाडी, पुणे येथे स्पोर्ट्स सायन्स सेंटर विकसित करण्यात येईल.



- पुण्यात क्रीडा विद्यापीठ कार्यान्वित झाले. आता छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वाळुंज येथे ५० कोटी रुपये देऊन नवीन क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्यात येईल. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती या क्रीडा क्षेत्रातील नामांकित संस्थेस अभिमत क्रीडा विद्यापीठाचा दर्जा देऊन अनुदान देण्यात येईल.
- विभागीय क्रीडा संकुल, नागपूर येथील कामांसाठी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करण्यात येईल.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता क्रीडा विभागास ४९१ कोटी आणि पर्यटन विभागास १ हजार ८०५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. चतुर्थ अमृत-रोजगार निर्मिती : सक्षम,कुशल-रोजगारक्षक युवा यासाठी कार्यक्रम खर्चाकरिता एकूण ११ हजार ६५८ कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करण्यात येत आहे.**

## पर्यावरणपूरक विकास

### हरित गुंतवणूक

राज्याचे नेट झिरो उत्सर्जन साध्य करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील. राज्याचा मुख्यतः हरित ऊर्जा क्षेत्रावर भर असून त्याकरिता सौर, जल व पवन ऊर्जा या क्षेत्रामध्ये गुंतवणुकीचे ३० हजार कोटींचे सामंजस्य करार करण्यात आलेले आहेत. हरित हायड्रोजन, हरित अमोनिया, सौर व पवन ऊर्जा या क्षेत्रात ७५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे.

### ग्रीन बॉन्ड

हवामान बदलांच्या समस्यांचा मुकाबला करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रीन बॉन्ड मधून १६ हजार कोटी रुपये उभारण्याचे ठरविले आहे. राज्यासाठी सन २०२४ पर्यंत ५ हजार कोटी रुपये ग्रीन बॉन्ड मधून उभारण्यात येतील. त्यामधून नवीकरणीय ऊर्जा, हरित इमारती, हरित हायड्रोजन, इलेक्ट्रिक मोबिलिटी व चार्जिंग सुविधा इत्यादी उपक्रम हाती घेण्यात येतील. राज्यातील ग्रामपंचायतींचे पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी २० हजार ग्रामपंचायतीत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येतील. भुसावळ येथे ५०० किलो वॅट सौर ऊर्जेचा वापर करून २० घनमीटर प्रतितास हरित हायड्रोजन निर्मिती करण्यात येईल.

### समुद्रीतृण व शेवाळ शेती

समुद्रीतृण आणि शेवाळयुक्त समृद्धी महाराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्याला लाभली आहे. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी, सांडपाणी प्रक्रिया, जैवइंधन, औद्योगिक वापरात या शेवाळाची उपयुक्तता लक्षात घेता, शेवाळ शेतीला प्रोत्साहन देण्यात येईल, त्यासाठी अभ्यासगट स्थापन करण्यात येईल.

### अपारंपरिक ऊर्जा

जायकवाडी येथील नाथसागर जलाशयात तरंगत्या सौर ऊर्जा पॅनलद्वारे ऊर्जानिर्मिती करण्यात येईल.



### वाहन निर्लेखन धोरण

शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व सार्वजनिक उपक्रमांच्या मालकीचे १५ किंवा त्यापेक्षा जास्त वर्ष जुनी वाहने निष्कासित करण्यात येत आहेत. खासगी वाहनांना ८ व १५ वर्षांच्या आत स्वेच्छेने निष्कासित केल्यास नवीन वाहन खरेदीसाठी कर सवलत देण्यात येईल.

### हरित परिवहन

राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात ५ हजार १५० इलेक्ट्रिक बसेसचा समावेश करण्यात येईल, तसेच चार्जिंग स्टेशनचे



जाळे उभारण्यात येईल. ५ हजार डिझेल बसेसचे द्रवरूप नैसर्गिक वायू इंधनावरील वाहनांमध्ये रूपांतर करण्यात येईल.

### पर्यावरण सेवा योजना

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये पर्यावरण सेवा योजना १२ जिल्ह्यांमधील ५० शाळांमध्ये सुरू आहे. या योजनेची व्याप्ती वाढवून येत्या ५ वर्षांत ७ हजार ५०० शाळांमध्ये ही योजना राबवण्यात येईल.

### तलाव संवर्धन व अमृत सरोवर योजना

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी पर्वाचे औचित्य साधून सरोवर संवर्धन योजनेंतर्गत नव्याने ७५ तलावांचे पर्यावरणपूरक



संवर्धनाचे काम हाती घेण्यात येईल. तसेच अमृत सरोवर निर्मितीची योजना १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत पूर्णत्वास नेण्यात येईल.

### अमृत वन उद्यान, बेल उद्यान, पंचायतन

प्रत्येक शहरात धार्मिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण व औषधी वृक्षांची अमृत वन उद्याने निर्माण करण्यात येतील. ग्रामीण भागात पर्यावरणपूरक कडूनिंब, वड, उंबर, देशी आंबा व बेल या पाच वृक्षांच्या लागवडीतून पंचायतन निर्माण करण्यात येईल. धार्मिक स्थळांच्या परिसरात देवराई तयार करण्यात येतील.

### हाय-टेक रोपवाटिका

औषधी, शोभिवंत व व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाच्या वृक्ष प्रजातींच्या प्रमाणित रोपांच्या निर्मितीसाठी ५० हायटेक रोपवाटिकांची स्थापना करण्यात येईल.

### आफ्रिकन सफारी

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा प्राणी संग्रहालयात आफ्रिकन सफारी व पक्षी उद्यान येत्या वर्षी सुरू करण्यात येईल. शिवनेरी ता.जुन्नर जि.पुणे येथे बिबट सफारी सुरू करण्यात येईल.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता वन विभागास २ हजार २९४ कोटी,पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास २२४ कोटी आणि ऊर्जा विभागास १० हजार ९१९ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. पंचम अमृत- पर्यावरणपूरक विकास - यासाठी एकूण १३ हजार ४३७ कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करण्यात येत आहे.**

### न्यायसाहाय्यक विद्यापीठ - मोबाईल युनिट

गुन्ह्यांचा शास्त्रीय तपास आणि अपराधसिद्धतेत वाढीसाठी न्यायसाहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयास बळकट करण्यात येईल. न्यायवैद्यक विज्ञान महाविद्यालयाची स्थापना करण्यात येईल. राज्यात ४५ ठिकाणी अत्याधुनिक न्यायसाहाय्यक मोबाईल युनिट्स देण्यात येतील.

### मुंबई शहर सीसीटीव्ही-२, सायबर सुरक्षा

मुंबईतील सुरक्षितता आणि गुन्हेगारीला आळा यासाठी सीसीटीव्हीचा टप्पा-२ हाती घेण्यात येईल. वाढत्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प कार्यान्वित करण्यात येईल.

### नवीन कारागृह, बालसुधारगृह

कारागृहांवरील वाढता ताण कमी करण्यासाठी अत्याधुनिक अशी दोन नवीन कारागृहे बांधण्यात येतील. तसेच मुंबई



येथील देवनार-मानखुर्द येथे ५०० मुला-मुलींसाठी सर्व सुविधायुक्त बालसुधारगृह उभारण्यात येईल.

### जमीन मोजणीकरिता आधुनिक यंत्रणा

सर्व भूकरमापकांना आधुनिक रोव्हर यंत्रणा पुरवण्यात येईल. मोजणीची प्रक्रिया ऑनलाइन केली जाईल व मोजणी ९० दिवसांत पूर्ण करण्यात येईल.

### बिनशेती परवाना

नियोजन प्राधिकरणाकडून परवानगीच्या प्रक्रियेमध्येच बिनशेती रूपांतरण कर भरण्याची सोय राहील. स्वतंत्र अर्ज न करता, बांधकाम परवानगीसोबतच बिनशेतीची सनद आपोआप निर्गमित होईल.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता गृह विभागास २ हजार १८७ कोटी आणि महसूल विभागास ४३४ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

## कोतवालाच्या मानधनात वाढ

सध्या सेवा कालावधीनुसार कोतवालांना ७ हजार ५०० रुपये ते १५ हजार रुपये दरमहा मानधन देण्यात येते. सर्व १२ हजार ७९३ कोतवालांना यापुढे १५ हजार रुपये मानधन देण्यात येईल.

## तीर्थक्षेत्र विकास व स्मारके

- वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी येथील श्री संत सेवालाल महाराज यांचे स्मारक हे बंजारा समाजाचे तीर्थक्षेत्र आहे. पोहरादेवी व उमरी तीर्थक्षेत्राच्या सुमारे ५०० कोटी रुपये रकमेच्या विकास आराखड्यातील कामे पुरेसा निधी उपलब्ध करून पूर्ण करण्यात येतील.
- सह्याद्री पर्वतात स्थित, थेट शिवशंकरांशी संबंधित असलेल्या भीमा नदीच्या तीरी, अत्यंत प्राचीन आणि जागृत असलेल्या तसेच शिवपुराणात वर्णिलेल्या पुणे जिल्ह्यातील भीमाशंकर



ज्योतिर्लिंगासह त्र्यंबकेश्वर जि. नाशिक, घृष्णेश्वर जि. छत्रपती संभाजीनगर, औंढा नागनाथ जि. हिंगोली आणि वैजनाथ जि. बीड या महाराष्ट्रातील पाचही ज्योतीर्लिंग तीर्थक्षेत्र व परिसर विकासाची कामे हाती घेण्यात येतील. तसेच राज्यातील प्राचीन मंदिरांच्या जतन व संवर्धनाची कामे हाती घेण्यात येतील. यासाठी ३०० कोटी रुपये तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.
- श्री क्षेत्र ज्योतिबा परिसर संवर्धन प्राधिकरण स्थापन करून त्यासाठी ५० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल.
- श्री संत गाडगेबाबा यांचे गाडगेनगर येथील समाधी स्थळ तसेच कर्मभूमी असलेले ऋणमोचन तीर्थक्षेत्रासाठी २५ कोटी रुपये निधी देण्यात येईल.
- हे वर्ष श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी जन्मोत्सवाचे वर्ष आहे. महाराष्ट्रामध्ये महानुभाव पंथाच्या दृष्टीने महत्त्वाच्या रिद्धपूर, काटोल, भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, नांदेड, पांचाळेश्वर, पैठण इत्यादी देवस्थानांच्या ठिकाणी विकास करण्यासाठी भरीव तरतूद करण्यात येईल.

## श्रीसंत नामदेव महाराज कीर्तनकार सन्मान योजना

वारकरी संप्रदायाने एक संपन्न वारसा महाराष्ट्राला दिला आहे. अनेक कीर्तनकार, प्रवचनकार, निरूपणकार हे आध्यात्मिक शिकवण तर देतातच. पण, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षणादी क्षेत्रात मौलिक कामगिरी करून राष्ट्रचारित्र्य घडवत आहेत. राष्ट्रनिर्माणातील या सर्व सच्च्या पाईकांसाठी श्रीसंत नामदेव महाराज कीर्तनकार सन्मान योजना राबवण्यात येईल.

## स्मारकांसाठी...

- प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराजांच्या अमरावती जिल्ह्यातील स्मारकासाठी निधी उपलब्ध करण्यात येईल.
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रेरणेने १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात बलिदान दिलेल्या स्वातंत्र्यसैनिकांची स्मृती भावी पिढीला सदैव प्रेरणा देत राहावी, यासाठी आष्टी, जि.वर्धा येथे भव्य व साजेसे स्फूर्तिस्थळ उभारण्यात येईल.
- महात्मा गांधींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केल्यानंतर त्याला प्रतिसाद म्हणून विदर्भात जंगल सत्याग्रह करण्यात आला होता. महाराष्ट्रातील तीन ठिकाणी जंगल सत्याग्रह स्मारके उभारण्यात येतील.
- संत ज्ञानेश्वर माऊली व संत तुकोबाराय यांच्या पालखीसोबतच संत सोपान देव, संत निवृत्तीनाथ व संत मुक्ताई यांच्या निर्मलवारीकरिता २० कोटी रुपये निधी देण्यात येईल.
- बीड जिल्ह्यातील गहिनीनाथ गडाच्या संवर्धन व विकासासाठी २५ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात येईल.
- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील म्हैसमाळ, वेरूळ, खुलताबाद, सुलीभंजन विकास आराखड्यास आवश्यक निधी देण्यात येईल.
- स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ मौजे तुळापूर ता. हवेली व समाधी स्थळ वढु (बु.) ता. शिरुर, जिल्हा पुणे येथील स्मारकाच्या सुमारे २७० कोटी रुपये



किमतीच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करून महाराजांच्या पराक्रमाला साजेसे स्मारक निर्माण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
- भारतातील पहिली मुलींची शाळा पुणे शहरातील गंजपेठ येथील भिडेवाडा येथे सुरू झाली. या जागेवर ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले राष्ट्रीय स्मारक निर्माण करण्यासाठी ५० कोटी रुपये निधी देण्यात येईल.
- लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे जन्मस्थळ वाटेगाव ता. वाळवा जि. सांगली येथील स्मारकासाठी २५ कोटी रुपये निधी देण्यात येईल.
- स्व. रा.सु.गवई यांच्या अमरावती येथील स्मारकाकरिता २५ कोटी रुपये निधी देण्यात येईल.
- महाराष्ट्रातील ख्यातकीर्त विचारवंत, साक्षेपी समीक्षक कै. नरहर कुरुंदकर यांच्या नांदेड येथील स्मारकास आवश्यक निधी देण्यात येईल.

- कोकरुड, ता. शिराळा,जि. सांगली येथे स्वर्गीय शिवाजीराव देशमुख यांचे स्मारक उभारण्यासाठी २० कोटी रुपयांचा निधी देण्यात येईल.
- श्री संत जगनाडे महाराजांच्या जीवनाचा परिचय नवीन पिढीला व्हावा म्हणून नागपूर येथे श्री संत जगनाडे महाराज आर्ट गॅलरी उभारण्यासाठी ६ कोटी रुपये निधी देण्यात येईल. तसेच सुदुंबरे, ता. मावळ, जि. पुणे येथील त्यांच्या समाधीस्थळाच्या विकासासाठी २५ कोटी रुपये निधी देण्यात येईल.

## मराठी भाषा, नाट्यगृहे, चित्रनगरीचा विकास

- श्रीक्षेत्र रिद्धपूर, जि. अमरावती ही महानुभाव पंथांचीच नव्हे, तर मराठी वाङ्मयाचीसुद्धा काशी आहे. या भूमीमध्ये मराठीतील पहिला हस्तलिखित आद्यग्रंथ-लीळाचरित्र चक्रधर स्वामींनी लिहिला. रिद्धपूर, जि.अमरावती येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यात येईल.
- विश्वकोश कार्यालयासाठी वाई, जिल्हा सातारा येथे आणि मराठी भाषा भवन, उप केंद्र, ऐरोली येथे इमारतींचे बांधकाम करण्यात येईल. मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी मराठी भाषा युवक मंडळे स्थापन करण्यात येतील.
- सांगली येथे नवीन नाट्यगृहाच्या बांधकामासाठी २५ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येतील. राज्यातील सर्व नाट्यगृहांच्या देखभाल दुरुस्तीसाठी ५० कोटी रुपये राखून ठेवण्यात येतील.
- दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगाव, मुंबई व कोल्हापूर चित्रनगरीमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचा आधुनिक सोयी-सुविधायुक्त स्टुडिओ, लॅबची निर्मिती करण्यासाठी ११५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.



- कलाकार व कलाप्रकार यांची अद्ययावत माहिती, लुप्त होत चाललेल्या कला प्रकारांचे जतन व संवर्धन यासाठी महाराष्ट्र कलाकार कल्याण मंडळाची स्थापना करण्यात येईल.
- नागपूर येथील विदर्भ साहित्य संघाच्या शताब्दीनिमित्त १० कोटी रुपये निधी देण्यात येईल.
- मराठवाडा मुक्ती संग्राम अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्याकरिता पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.
- स्व. शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधी ५० कोटी रुपये करण्यात येईल.

**सन २०२३-२४ या वर्षासाठी कार्यक्रम खर्चाकरिता वित्त विभागास १९० कोटी, सांस्कृतिक कार्य विभागास १ हजार ८५ कोटी, मराठी भाषा विभागास ६५ कोटी, विधि व न्याय विभागास ६९४ कोटी, माहिती, तंत्रज्ञान व माहिती जनसंपर्क विभागास १ हजार ३४२ कोटी तसेच महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालयास ५०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.**

## सुधारित अंदाजपत्रक २०२२-२३

सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात ४ लाख ३ हजार ४२७ कोटी रुपये महसुली जमा अपेक्षित होती. महसुली जमेचे सुधारित अंदाज ४ लाख ३० हजार ९२४ कोटी रुपये निश्चित करण्यात आले आहेत. सन २०२२-२३ च्या एकूण खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज ४ लाख ९५ हजार ४०४ कोटी रुपये व सुधारित अंदाज ५ लाख २८ हजार २८५ कोटी रुपये असून, आपत्तीच्या काळात राज्यातील जनतेला केलेली भरीव मदत इत्यादी कारणांमुळे सन २०२२-२३ या वर्षाच्या खर्चाच्या सुधारित अंदाजात वाढ झाली आहे.

जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४

१८१. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत १५ हजार १५० कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. मागील वर्षांच्या तुलनेत ही तरतूद १ हजार ८१० कोटी रुपयांनी अधिक आहे.

## वार्षिक योजना

सन २०२३-२४ मध्ये कार्यक्रम खर्चाची रक्कम १ लाख ७२ हजार कोटी रुपये निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती उपयोजनेच्या १३ हजार ८२० कोटी रुपये, तर आदिवासी विकास उपयोजनेच्या १२ हजार ६५५ कोटी रुपये नियतव्ययाचा समावेश आहे.

## अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२४

सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये एकूण खर्चासाठी ५ लाख ४७ हजार ४५० कोटींची तरतूद केली आहे. सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये महसुली जमा ४ लाख ४९ हजार ५२२ कोटी रुपये व महसुली खर्च ४ लाख ६५ हजार ६४५ कोटी रुपये अंदाजित केला आहे. परिणामी १६ हजार १२२ कोटी रुपये महसुली तूट येत आहे.



## राजकोषीय तूट

राजकोषीय सुधारणांमध्ये राज्य नेहमीच अग्रेसर राहिले आहे. राजकोषीय

उत्तरदायित्त्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्यानुसार राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे आणि राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात शासन यशस्वी ठरले आहे. सन २०२३-२४ ची राजकोषीय तूट ९५ हजार ५०० कोटी ८० लाख रुपये आहे.

## जनभागीदारीचा अर्थसंकल्प

यंदाच्या अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे हा जनभागीदारी असलेला अर्थसंकल्प आहे. मी राज्यातील जनतेकडून त्यांच्या मनातील अर्थसंकल्पाविषयीच्या सूचना मागवल्या होत्या. मला सांगायला आनंद वाटतो की, सात दिवसांत सुमारे ४० हजार सूचना प्राप्त झाल्या. या सर्व सहभागींचे मी मनापासून आभार मानतो. सर्व सूचना काळजीपूर्वक तपासून त्यापैकी काही अर्थसंकल्पात समाविष्ट केल्या आहेत.

## महसूलाचा सुधारित अंदाज

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी राज्याचा स्वतःच्या कर महसुलाचा सुधारित अंदाज रुपये दोन लाख पंचाहत्तर हजार सातशे शहाऐंशी कोटी आहे. यामध्ये वस्तू व सेवाकर, मूल्यवर्धित कर, मुद्रांकशुल्क व नोंदणी फी, राज्य उत्पादन शुल्क या करांचा वाटा दोन लाख त्रेचाळीस हजार चारशे अकरा कोटी आहे.

## कर महसुलाचे अर्थसंकल्पीय उद्दिष्ट

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी राज्याचा स्वतःच्या कर महसुलाचे अर्थसंकल्पीय उद्दिष्ट रूपये दोन लाख अठ्ठ्याण्णव हजार एकशे एक्क्याऐंशी कोटी एवढे निश्चित करण्यात आले आहे. राज्य शासनातर्फे प्रस्तावित असलेल्या विविध आर्थिक उपाययोजनांमुळे हे उद्दिष्ट पूर्ण होईल याची मला खात्री आहे.

## महिलांना व्यवसाय करात सवलत

नोकरी करणाऱ्या महिलांना सध्या मासिक १० हजार रुपयांपेक्षा अधिक व्यवसाय वेतन असल्यास व्यवसाय कर



भरावा लागतो. महिलांची क्रयशक्ती वाढवण्यासाठी करात सवलत ही मर्यादा वाढवून २५ हजार रुपये करण्याचे प्रस्तावित करत आहे. त्यामुळे मासिक २५ हजार रुपयांपर्यंत वेतन असलेल्या महिलांना कोणताही व्यवसाय कर भरावा लागणार नाही.

## दिव्यांग व्यक्तींना व्यवसाय करातून सूट

व्यवसाय कर अधिनियमामध्ये 'दिव्यांग व्यक्तीची' व्याख्या दिव्यांग व्यक्तींना व्यवसाय हक्क अधिनियम २०१६ नुसार सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे. या



सुधारणेमुळे करातून सूट व्यवसायकर सुटीसाठी पात्र ठरणाऱ्या दिव्यांग व्यक्तींच्या संख्येत वाढ होईल. तसेच व्यवसाय करातून सूट देण्याची प्रक्रिया सोपी होईल.

## इंधनावरील मूल्यवर्धित करात सवलत

हवाई वाहतुकीला प्रोत्साहन आणि आर्थिक विकासाला गती देण्याच्या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका आणि रायगड जिल्हा या भौगोलिक क्षेत्रात विमान चालन चक्की इंधनावरील (ATF) मूल्यवर्धित कराचा दर मूल्यवर्धित २५ टक्क्यांवरून बंगलोर व गोव्याच्या समकक्ष १८ टक्के करण्याचे प्रस्तावित करत आहे.

## राज्यकर विभागाची अभय योजना

वस्तू व सेवा कर कायदा लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबवण्यात आलेल्या विविध कायद्यांच्या संदर्भात महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती व विलंब शुल्क अभय योजना यांच्या थकबाकीची तडजोड योजना २०२३ ही अभय योजना मी जाहीर करत आहे. या अभय योजनेचा कालावधी दिनांक १ मे २०२३ ते ३१ ऑक्टोबर २०२३ असेल. दिनांक १ मे २०२३ रोजी प्रलंबित असलेल्या थकबाकीसाठी ही योजना लागू राहील.

वैधानिक आदेशानुसार कोणत्याही वर्षासाठीची, व्यापाऱ्याची थकबाकी रुपये दोन लाखांपर्यंत असल्यास, सदर रक्कम त्या वर्षासाठी पूर्णपणे माफ करण्याचे प्रस्तावित आहे. या अभय योजनेचा लाभ लहान व्यापाऱ्यांना अंदाजे एक लाख प्रकरणात होईल.

कोणत्याही वैधानिक आदेशानुसार व्यापाऱ्यांची थकबाकी रुपये ५० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा प्रकरणात एकूण थकबाकीच्या २० टक्के रक्कम भरल्यास उर्वरित ८० टक्के रकमेस माफी देण्यात येईल. लहान व मध्यम व्यापाऱ्यांना याचा लाभ अंदाजे ८० हजार प्रकरणांत होईल.

तुकोबाराय म्हणायचे *स्वप्नींही दुःख कोणी न देखे डोळा....* हीच त्यांची रामराज्याची संकल्पना होती.

ज्ञानोबा माऊली म्हणतात....

*दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो । जो जे वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।*

या अर्थसंकल्पाचा हाच प्रासादिक संदेश आहे, तीच आमची प्रामाणिक भावना आहे. तशीच कृती राज्य सरकारकडून होईल.

**(दिनांक ९ मार्च २०२३ रोजी विधानसभेत मा. उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, तर विधानपरिषदेत शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी २०२३-२४ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला.)**

**शारीरिक, मानसिक, सामाजिक दृष्टीने व्यवस्थित आणि रोगमुक्त असण्याची अवस्था म्हणजे आरोग्य होय. अशी जागतिक आरोग्य संघटनेने केलेली व्याख्या आहे. १९७० ते १९८०चे दशक हे समतावादी आणि परिवर्तनवादी चळवळीचे दशक म्हणून ओळखले जाते. समाजातील काही वाईट प्रथा, मूल्ये, परंपरा बदलण्याचा हा काळ होता. सामाजिक चळवळीबाबत विश्लेषण करताना १९९० नंतर भारतीय अर्थकारणात महत्त्वाचे बदल झाले. वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी आदिवासी/भटक्या विमुक्तांच्या चळवळी, कष्टकऱ्यांच्या चळवळी चालू होत्या.**

# महिलांचे आरोग्य व शिक्षण

**डॉ. शुभांगी अहंकारी / डॉ. शशिकांत अहंकारी**

रशियामध्ये अलमाआटा या शहरात जागतिक आरोग्य संघटनेची एक परिषद झाली. या परिषदेत भारतासह जगातले १३४ देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. दोन हजार सालापर्यंत सर्वांसाठी आरोग्य हे उद्दिष्ट प्रत्येक देशांनी मान्य केले. विशेष म्हणजे या परिषदेत आरोग्याची व्याख्या करण्यात आली. चांगले आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे एवढेच नाही, तर शारीरिक मानसिक व सामाजिक, आध्यात्मिकदृष्ट्या तंदुरुस्त असणे म्हणजे आरोग्य. अशी जागतिक आरोग्य संघटनेने व्याख्या केली. त्यामुळे आरोग्याच्या प्रश्नाकडे बघण्याचा जगातील सर्व देशांचा दृष्टिकोन बदलला.

ग्रामीण आणि शहरी भागात त्या वेळी आरोग्य सेवेमध्ये खूप फरक होता. ग्रामीण भागात १,००,००० लोकसंख्येला एक प्राथमिक आरोग्य केंद्र होते आणि एक डॉक्टर. बाळंतपणासाठी दवाखान्याकडे जाण्यासाठी वाहनाची सोय होत नव्हती. अशा परिस्थितीत गरजू लोकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचणे खूप कठीण होते. ग्रामीण भागात तर मृत्यू हा उपचारापेक्षा स्वस्त होता.

## गरिबांना परवडणारा दवाखाना

वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षण संपवून ग्रामीण भागातील सर्वसामान्य गरीब लोकांना परवडणारा दवाखाना किंवा हॉस्पिटल काढावे, असा निर्णय आम्ही घेतला. या पार्श्वभूमीवर अणदूरसारख्या भागात जानकी रुग्णालय सुरू केले. सुरुवातीला केवळ १० खाटांचे पण सर्व सोयीयुक्त रुग्णालय सुरू केले. त्या दिवसापासून रोज नवनवे अनुभव यायला लागले. आरोग्य क्षेत्रातील बिकट परिस्थिती समोर येऊ लागली.

आम्ही पहिल्या मजल्यावर राहत होतो. पहाटे ५ वाजता दवाखान्यासमोर बैलगाडी उभी राहिली. बैलगाडीतून आलेल्या पेशंटची प्राथमिक तपासणी करून त्याला ऑपरेशन थिएटरच्या टेबलवर नेण्यात आले. डॉ. शुभांगी यांच्या दृष्टीने अशी पहिलीच केस होती. पेशंटची विचारपूस केल्यानंतर सखुबाई तिचे नाव असल्याचे समजले. सखुबाईचे गर्भाशय पूर्णपणे बाहेर आलेले होते हे असं-कसं झालं विचारल्यानंतर सखुबाई श्वास रोखलेल्या आवाजात सांगू लागली. राष्ट्रीय महामार्गाच्या बाजूच्या वस्तीमध्ये ती एका झोपडीमध्ये राहत होती. बाळंतपणाची तारीख जवळ आली होती. रात्री १२च्या सुमारास बाळंतपणाच्या कळा सुरू झाल्या. घरी फक्त नवरा होता. मदतीला त्याने शेजारी असलेल्या तिच्या बहिणीला बोलावले. घरी एक रॉकेलवर चालणारी छोटी चिमणी होती. त्या प्रकाशात बाळंतपण सुरू झाले. तासाभरात मूल बाहेर आले आणि रडायला लागले. तेवढ्यात चिमणीतील तेल संपले आणि सर्वत्र अंधार झाला. प्रकाश पडावा म्हणून चुलीमध्ये लहान लाकड पेटवली, अजून वार पडली नाही आणि पोट फुगलेलेच म्हणून त्या शेजारणीला वाटले की, अजून एक मूल पोटात आहे. तिने अजून एका शेजारणीला मदतीला बोलावले. हे सगळे चुलीतील लाकडाच्या मंद प्रकाशात चालू होते. त्या दोघीजणी जोरात कळ घे म्हणून ओरडत होत्या. शेवटी त्या दोन मदतनीसांपैकी एकजण तिच्या पोटावर उभे राहून जोर घ्यायला लावला. त्या कृतीने सखुबाईचे गर्भाशयच बाहेर आले. आवश्यक ते वैद्यकीय उपचार करून भूल देऊन ते गर्भाशय पूर्ववत बसवण्यात आले. सखुबाईच्या या प्रसंगाने आमची झोपच उडाली.



या एका घटनेमधून स्त्रियांचे आरोग्याचे प्रश्न किती विविध घटकांशी जोडलेले आहेत हे स्पष्ट झाले. एकंदरीतच समाजात असलेले अठराविश्व दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव, बुरसटलेले विचार, जुन्या परंपरा, घरपोच न मिळणारी आरोग्यसेवा. प्राथमिक आरोग्यकेंद्र असूनही, शासकीय सेवांचा अभाव, लिंगभाव असमानता यातून स्त्रियांच्या आजाराकडे दुय्यमपणे पाहण्याचा दृष्टिकोन या प्रकारामुळे स्त्रियांच्या आरोग्याचे सर्व विषय पुढे आले. सखुबाई चुकून जिवंत राहिली. ही घटना १९८५ च्या काळातील आहे. त्या वेळी जगातील मातामृत्यूचे प्रमाण एक लाख जन्मामागे ४२२ होते. यातील ५० टक्के मृत्यू

सहा देशांत होत होते. त्यामध्ये भारत देशही होता.

## स्त्री आरोग्याविषयी जागरूकता

८ मार्च हा 'जागतिक महिला दिन'. या दिवसाचे औचित्य साधून महिलांविषयी निरनिराळे उपक्रम, घोषणा तपासण्या शिबिरे यांचे आयोजन करण्यात येते. खरंतर हा दिवस स्वतःला निरखून पाहण्याचा स्वतः मध्ये डोकावण्याचा असतो. आपल्या शरीराकडे आपण किती आस्थेवाईकपणे पाहतो, किती जागरूक असतो हे पाहणे आवश्यक आहे. स्तनाचा कॅन्सर झाला म्हणून भीतीपोटी पुढील उपचार, तपासण्या करून न घेणे. आपल्या शरीरात होणारे बदल आपण वेळीच टिपतो का? त्याची नोंद घेतो का? जागृत स्त्रियांनी आपल्या शरीराचा आणि मनाचा कानोसा घेण्याची सवय प्रत्येक महिलेने करायलाच हवी. शारीरिक स्वच्छता, दरवाजा बंद न्हाणी घरे, संडास या सोयी महिलांसाठी घरी आवश्यक आहेत, याबद्दल समाजामध्ये जनजागृती होणे गरजेचे आहे. त्यांना आरोग्याचे महत्त्व समजून त्याप्रमाणे त्यांच्याकडून कृती घडून येते की नाही हेदेखील पाहणे गरजेचे आहे. मासिक पाळी येण्यापूर्वी व पाळी कायमची बंद होण्यापूर्वी स्त्रियांच्या शरीरात खूप बदल होत असतात. त्यापैकी किती महिलांना या विषयीचे ज्ञान असते? महिला दिनाच्या मेळाव्यात आम्ही जेव्हा अशा विषयांवर चर्चा सुरू करतो, तेव्हा वयात आलेल्या मुली स्त्रिया मनमोकळेपणाने आमच्याशी संवाद करतात. आरोग्याची तपासणी करताना आम्ही आवर्जून त्यांची नखे पाहतो. त्यामध्ये ८० टक्के महिला या रक्तक्षय म्हणजे ॲनिमियाच्या पेशंट असायच्या. ही परिस्थिती ४० वर्षांपूर्वीची आहे. आता हे प्रमाण खूप कमी आहे.

अशाच फुलवाडीच्या ६५ वर्षांच्या आजी माझ्या दवाखान्यात आल्या होत्या. त्यांच्या मायांगातून पांढरा पदर स्राव येत होता, त्याला घाण वास येत होता. आजीच्या पुढील तपासण्या कराव्या लागतील, असे सांगितल्यानंतर आजीने सरळसरळ नन्नाचा पाढा लावला. मी बाळंतीणसुद्धा एकट्याने घरात झाली आणि हे काय म्हातारपणात माझ्या नशिबी आले असे म्हणत त्यांनी पुढील तपासण्या करून घेण्यास नकार दिला. शेवटी त्यांना विश्वासात घेऊन समजावून सांगितल्यानंतर आजी तपासणीसाठी तयार झाल्या. तपासणीनंतर मी तर अक्षरशः उडालेच. कारण त्यांच्या मायांगामध्ये फुलकोबीसारखा गड्डा आल्याचे दिसत होते. तो अळ्यांचा समूह होता. त्यांना दवाखान्यात शारीरिक उपचार सुरू केले. कुठल्या जुनाट परंपरेचे जोखड आजीच्या मनावर होते म्हणून त्यांनी दवाखान्याची पायरी चढायला नकार दिला. स्त्री पुरुष असमानता, पुरुषप्रधान संस्कृती, विषमता यामुळे स्त्रिया नेहमीच आपल्याला दुय्यम स्थान देत आल्या आहेत. महिलांनी आरोग्याकडे नीट लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

## हॅलो मेडिकल फाऊंडेशन

आरोग्य सेवा बजावताना एक गोष्ट लक्षात आली की, ग्रामसुधारालाही खूप वाव आहे. आम्ही प्रत्येक गावात हॅलो फाउंडेशन वाचनालय सुरू केले. किशोरी मेळावे घेऊन किशोरी मुलींना प्रशिक्षण दिले. मुलींना सायकली दिल्या. त्यांच्या आयुष्यात महत्त्वाकांक्षा निर्माण झाल्या. हॅलो नर्सिंग स्कूल सुरू केले. मुली आता १२वीनंतर नर्सिंग कोर्स करून स्वतःच्या पायावर सन्मानाने उभ्या आहेत. मराठवाड्यासारख्या शेतीप्रधान मागास प्रदेशात जिथे पावसाचे प्रमाण अल्प आहे. अशा भागात स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्न अधिकच गंभीर. हॅलो मेडिकल फाऊंडेशनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील स्त्रियांना प्राथमिक उपचार कसे सुरू करायचे, वयाच्या चाळीशीनंतर आरोग्याची कशी काळजी घ्यायची, याबद्दल जनजागृतीचे कामही केले जाते. मुलींच्या शिक्षणासाठी प्रभावी प्रसार आणि प्रचार करण्याचे काम फाऊंडेशनमार्फत केले जाते.

## परिवर्तनाची प्रकिया

छोट्या गावांमध्ये सातवीपर्यंतच शाळा असते. पुढील वर्गासाठी जिल्ह्याच्या किंवा तालुकाच्या ठिकाणी जावे लागायचे. मुलींना शाळेसाठी तर संघर्ष करावा लागायचा. वयात आलेल्या मुलींना शिक्षणासाठी लांब पाठवायला पालक तयार नसायचे. त्याला कारणेही तशीच होती. खर्च, मुलींची सुरक्षितता, प्रवासाची सोय नाही. यामुळे मुलींना शाळेत पाठवले जायचे नाही. शिकून काय करायचे त्यापेक्षा लग्न केले की, आमच्या डोक्यावरील ओझे कमी होईल असा पालकांचा विचार असायचा. १५-१६ वर्षांच्या मुली बाळंतपणासाठी दवाखान्यात यायच्या. आधी आई-वडिलांची घाई आणि मग नवऱ्याची गडबड. ४० वर्षांपूर्वी बालविवाह मोठ्या प्रमाणात व्हायचे आणि मुलीला काही कळायच्या आत ती आई व्हायची. पूर्णपणे स्त्री व्हायच्या आत या कोवळ्या वयात उमलणारी कळी कोमेजून गेलेली असायची. वारंवार येणारे गरोदरपण, गर्भपात आणि बाळंतपण यातून त्यांच्या आयुष्याचा पोतच बदलून जायचा. लहान वयात लग्न झाल्यामुळे आपल्या लैंगिकतेविषयी पुरेसे ज्ञान या मुलींना नसायचे. गर्भधारणा, कुटुंबनियोजन बालविवाह बंदी या विषयी जनजागृती झाल्यामुळे याचे प्रमाणही कमी झाले आहे. २०२१ साली महाराष्ट्रात ४० टक्के बालविवाह झालेत.

## मुक्त अर्थव्यवस्था

मुक्त अर्थव्यवस्थेने भारतामध्ये खूप मोठे परिवर्तन घडून आले. जाहिरातीचे पेव फुटले आणि जीवनावश्यक गोष्टींपेक्षा आधुनिक राहणीसाठीचा खर्च वाढला. मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये एखाद्या देशाची अर्थव्यवस्था वस्तू व सेवांच्या तसेच उत्पादन घटकांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी जगातील इतर देशांना मुक्त असते आणि त्या देशाकडून आयात व निर्यात यांवर कोणत्याही प्रकारचे निर्बंध लावले जात नाहीत. या अर्थव्यवस्थेमुळे बाजारूकेंद्रित व्यापार मोठ्या प्रमाणात सुरू झाला. जगण्याच्या स्पर्धेत आपण काय जेवतो, आपण काय पितो? पाणी शुद्ध की अशुद्ध? शीतपेय चहा-कॉफीची व्यसने कोणती करतो? घरचे जेवण जेवतो, पोळी, भाजी, आमटी कोशिंबीर की फास्ट फूड? चिप्स खाणार आणि फिटनेस वर्ल्डमध्ये जिमला जाणार, बकाबका जेवणार का घटाघटा पाणी पिऊन ऑफिसला पळणार

लेट मार्क नको म्हणून सरळ गाडीने वेगात जाणार, वारेमाप खत घातलेले अन्न पदार्थ, टीन फूड यामुळे आरोग्य बिघडते. फास्ट फूडच्या अतिसेवनामुळे हृदय, रक्तवाहिनीसंबंधीचे रोग, उच्च रक्तदाब, नैराशाची संबंधित रोग, कोलेस्ट्राल कर्करोग असे दुष्परिणाम आरोग्यावर होतात. जंक फूडच्या अतिसेवनामुळे स्त्रियांच्या प्रजनन क्षमतेवरसुद्धा विपरित परिणाम होत आहे.

## कार्यकक्षांची व्याप्ती

पुरुषांच्या बरोबरीने महिला सर्वच क्षेत्रांत अग्रेसर झाल्या आहेत. त्याला सैन्यदलही अपवाद नाही. त्यामुळेच गेल्या काही वर्षात सैन्यदल, लष्कराच्या तिन्ही दलांमध्ये विविध पदांवर महिला कार्यरत आहेत. या सर्व क्षेत्रांकडे बघण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन जर समानतेचा असेल तरच तिच्यावर असणाऱ्या कामाचा व घरचा ताण कमी होईल. हा ताण कसा कमी करायचा, त्याचे व्यवस्थापन कसे करायचे यासाठी हॅलो मेडिकल फाऊंडेशनमार्फत प्रशिक्षण घेतले जाते. स्त्री-पुरुष समानता, लिंगभाव समानता या सर्व विषयांवर काम सुरू आहे. समाजातील स्त्रियांवर होणारे कौटुंबिक अन्याय, अत्याचार आणि त्यातून होणारी त्यांच्या आरोग्याची हेळसांडही कशी कमी करता येईल, याचा गंभीरपणे विचार करायला हवा.

नुकत्याच झालेल्या एका अभ्यासाचे निष्कर्ष असे सांगतात- जगभर जेवढ्या विवाहित स्त्रिया आहेत. त्यापैकी २/३ महिला या कौटुंबिक हिंसाचाराचा बळी पडत आहेत. यामध्ये हुंडा, मानपान, सोने नाणे याची सततची मागणी, बालविवाह आणि त्याचे तोटे, वंशाला दिवा म्हणून मुलगाच हवा इत्यादी पुरुषसत्ताक कुटुंब पद्धतीतून येणारा अहंकार, वर्चस्व, व्यसनाधीनता यातून कौटुंबिक हिंसाचार होतो. यातून हुंडाबळी, आत्महत्या, लैंगिक शोषण वाढते. याशिवाय मानसिक कुचंबणा, कुपोषण, धास्ती, संशय, स्वातंत्र्याचा अभाव आणि निर्णयप्रक्रियेत स्त्रियांना सामावून न घेणे कामाच्या ठिकाणी स्त्रियांचे होणारे शोषण ही गंभीर कारण आहेत.

## महिला एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये मूल्ये व विचारसरणी ही पुरुषसत्ताक असते व स्त्रियांवर विविध प्रकारे बंधने व नियंत्रणे ठेवणारी आहे. पुरुषांची पुरुषप्रधान मानसिकता बदलून स्त्री ही स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची एक माणूसच आहे हे पुरुषांनी

| | | |
|---|---|---|
| माता मृत्यूदर | १९८० मध्ये एक लाख बाळंत होणाऱ्या स्त्रियांमागे जागतिक पातळीवर ४२२ महिलांचे मृत्यू होत होते. भारतातही तसेच प्रमाण होते. | २०२० मध्ये आपल्या देशात हे प्रमाण १०० च्या पुढे आहे. |
| बालमृत्यू दर | १००० जन्मलेल्या मुलांपैकी १३० मुले पहिला वाढदिवस पाहू शकत नव्हती. | महाराष्ट्रामध्ये हाच दर २३ इतका आहे. |
| जन्म दर | १००० लोकांमध्ये २८.५ जन्मदर आहे. | १००० लोकांमध्ये १५ इतके प्रमाण आहे. |
| मृत्यूदर प्रमाण किती आहे. | १९८० मध्ये मृत्यूदर १००० लोकांमध्ये ८.३ आहे. | २०२० मध्ये ५.५ इतका आहे. |

स्वीकारले पाहिजे. या सगळ्या गोष्टींबाबत स्त्रियांची समज वाढवणे काळाची गरज बनली आहे. बदलते जीवनमान आणि स्त्रियांचे आरोग्य या विषयावर लेख लिहिताना आम्ही गेल्या ४० वर्षांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या ४० वर्षांमध्ये देशामध्ये विविध क्षेत्रात प्रगती झाली.

## शिक्षणातून आर्थिक उत्पादकता

कृषी, औद्योगिक, शिक्षण व आरोग्य क्षेत्रात शासनाने बजेट वाढवले आहे ही समाधानाची बाब म्हणावी लागेल. यामुळे सर्वसामान्य जनतेला रोजगाराच्या संधी मिळू लागल्या. जागतिक राजकारणात इतरांच्या बरोबरीने विकासाची तुलना होऊ लागली. रस्ते, इमारती, वीज इत्यादी पायाभूत सोयींकडे प्राधान्याने लक्ष दिले जाऊ लागले, याचा सकारात्मक परिणाम झाला. गावात राहणाऱ्या आठवी ते बारावी शिकलेल्या मुली गावातील ग्रामसभेतून निवडून येऊ लागल्या. महिला बचतगटाने निवडलेल्या महिलेला मूलभूत आरोग्याचे प्रशिक्षण मिळू लागले. गरीब दुर्लक्षित तसेच गरजू जनतेस विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय आरोग्य अभियान सुरू केले.

माता व बालमृत्यू दर कमी करणे, माता व बाळाचे लसीकरण करणे, आरोग्यसेवेचे सामाजिकीकरण करण्यासाठी समाजाचा सहभाग वाढणे आवश्यक आहे.

चंगळवादाचे प्रमाण वाढल्यामुळे बचत कमी आणि खर्च खूप वाढला. गरज नसलेल्या गोष्टींची खरेदी, उधळपट्टी, कर्जबाजारीपणा वाढला. जास्त गरजा, जास्त खर्च आणि जास्त उत्पादने यामुळे श्रीमंत-गरीब दरी वाढू लागली. या बदलेल्या जीवनमानाचा परिणाम म्हणून आरोग्य क्षेत्रातील कामही वाढले. त्यातील तुलना वर दिलेल्या तक्त्यावरून लक्षात येईल.

## महत्त्वपूर्ण उद्दिष्टे

आरोग्य हा माणसाचा मूलभूत हक्क आहे. प्रत्येक व्यक्तीला या सेवेची आवश्यकता असते. बदलत्या जीवनशैलीमुळे महिलांच्या आरोग्याचा प्रश्न फार गंभीर बनला आहे.

स्त्रियांना शिक्षणाच्या, रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात परिस्थितीतील विविधता लक्षात घेऊन महिलांच्या आरोग्य सेवेत सुधारणा करणे काळाची गरज आहे. बाळंतपणाच्या काळात मातांचे मृत्यू किंवा बाळंतपणानंतर होणारे मृत्यू कमी करण्यासाठी व्यापक व्यूहरचना तयार करणे आवश्यक आहे. यासाठी शासन आणि आरोग्यप्रणाली यांच्यात भक्कम सहकार्याची भिंत असेल तर महिलांच्या आरोग्य सेवेची आखणी करणे सुलभ होईल.

(अनुक्रमे लेखिका स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत. तसेच लेखक हे हॅलो मेडिकल फाऊंडेशनचे अध्यक्ष आहेत.)

स्त्री-पुरुष समानतेबद्दल आज जेवढी जागृती दिसते, तेवढी यापूर्वी कधीही नव्हती. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात असलेले स्त्रियांचे दुय्यमत्व संपुष्टात आणून स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न आज स्त्री चळवळीच्या माध्यमातून जसा चालवला जात आहे, तसाच तो सरकारी पातळीवरही चालवला जात आहे.

# महिला सक्षमीकरणाचा प्रवास

**प्रा. भारती पाटील**

७०च्या दशकात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर आमूलाग्र बदल होऊ लागले. १९७५ हे वर्ष संयुक्त राष्ट्रांनी 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून जाहीर केले. आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने भारतीय स्त्रियांचा पाश्चात्य स्त्रीमुक्तीवादी चळवळीशी व विचारांशी संपर्क आला. त्यातून अनेक स्त्री संघटना 'स्त्रीवादी' जाणिवा घेऊन उभ्या राहिल्या. याचाच परिपाक म्हणून सहाव्या योजनेत 'महिला कल्याण आणि विकास' यापेक्षा स्त्रियांचा सहभाग यावर भर देण्यात आला.

इथपर्यंतच्या काळात स्त्री प्रश्नाकडे ज्या दृष्टिकोनातून पाहिले जात होते, त्या विकासात्मक दृष्टिकोनाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य होते ते म्हणजे स्त्रियांचा स्त्री म्हणून जगताना येणाऱ्या व्यावहारिक अडचणींवर मात करणे व त्यात अधिक सुलभता आणणे. त्यासाठी महिला बालकल्याण खाते आकाराला आले. स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करून त्यांना शिक्षण देऊन त्यांचा विकास केला जावा, अशी त्यामागे भूमिका होती.

## स्त्रियांचे सक्षमीकरण

१९७५ नंतर हळूहळू काही बदल होऊ लागले. १९७५ ते १९८५ या महिला दशकाच्या कालखंडात मेक्सिको, कोपनहेगन, नैरोबी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदांनी स्त्री चळवळीला बळकटी दिली. स्त्री चळवळीने स्त्री प्रश्नांकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहावयास सुरुवात केली. हा दृष्टिकोन होता 'स्त्रियांचे सक्षमीकरण'. या दृष्टिकोनाचा प्रभाव शासनावर पाडण्यात स्त्री चळवळीला यश आले. परिणामी सातव्या योजनेत 'स्त्रियांचे सक्षमीकरण' ही संकल्पना पहिल्यांदाच मांडण्यात आली व पुढील दोन योजनांमध्ये त्याला बळकटी मिळाली. राष्ट्रीय महिला आयोग, बीजिंग व बीजिंग प्लस या परिषदांमधून स्त्रियांच्या सक्षमीकरणाच्या चर्चेला चालना मिळाली. (आता भारत सरकारने २००१ हे वर्ष स्त्रियांच्या सक्षमीकरणाचे वर्ष म्हणून जाहीर केले आहे.) या सर्व पार्श्वभूमीवर स्त्रियांचे सक्षमीकरण म्हणजे काय व ते कसे साध्य करता येईल, याचा विचार करणे संयुक्तिक ठरेल.



स्त्री सक्षम नाही, ती अबला आहे त्यामुळे तिला आता सक्षम केले पाहिजे, सबला केले पाहिजे हा विचार स्त्री सक्षमीकरणामागे नाही. या सृष्टीमध्ये जन्माला येतानाच स्त्री-पुरुष दोघेही सक्षम होते, आहेत, दोघांना बुद्धी आहे, कौशल्य संपादित करण्याची क्षमता आहे, दोघांमध्येही सद्सद्विवेक बुद्धी आहे. याचाच अर्थ असा की, स्त्री सक्षम आहे, सबला आहे, परंतु शतकानुशतकांच्या दुय्यमत्वांमुळे तिच्यात गौणत्व निर्माण झालेले आहे. आपण अबला, दुर्बल आहोत अशी भावना तिच्यामध्ये निर्माण झाली आणि समाजानेही तिला अबला ठरवले; परंतु हे मळभ दूर झाले, तिला तिच्या क्षमतांच्या, बुद्धीची, कौशल्यांची जाणीव करून दिली तर मात्र स्त्रीला आपल्या सक्षमतेची अनुभूती होऊ शकते. हे भारतातील हजारो स्त्रियांनी सिद्ध करून दाखवले आहे.

सक्षमीकरण म्हणजे अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये स्त्रियांना आपल्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनातील निर्णय घेण्याची क्षमता विकसित करता येईल, त्यांचा आत्मविश्वास वाढेल. उत्पादन साधनांवर त्यांचे नियंत्रण प्रस्थापित करता येईल. स्त्री-पुरुषांमधील भेदभावाची जाणीव त्यांच्यात विकसित होऊन एक व्यक्ती म्हणून स्त्रियांना स्व-अस्तित्वाची जाणीव होईल.

यासाठी सर्वात प्राथमिक गरज आहे ती स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याची.

आज भारतात बहुतांश स्त्रिया आर्थिकदृष्ट्या परावलंबी आहेत. बहुतेकांकडे अर्थार्जनाचे साधन नाही. घरात आणि शेतात स्त्रिया आपले श्रम खर्ची घालत असल्या तरी या श्रमाचे मूल्य केले जात नाही. घरातील काम तिचे असते; पण घर मात्र तिच्या मालकीचे नसते, तेच शेताच्याही बाबतीत. यातूनच जन्म होतो परित्यक्तांचा व हुंडाबळींचा. यासाठी आवश्यकता आहे ती संपत्तीमध्ये स्त्री आणि पुरुषांचा समान वाटा असण्याची, त्यातून सत्तेची फेरवाटणी काही प्रमाणात निश्चितच शक्य आहे.

## स्त्री शिक्षण प्रमाण वाढावे

केवळ आर्थिक स्वावलंबनातून सक्षमीकरण शक्य नाही म्हणून त्यासाठी दुसरी आवश्यकता आहे ती शिक्षणाची. भारतात निरक्षरांची संख्या जगाच्या एकूण निरक्षरांपैकी २९.६% आहे, त्यात ६०% स्त्रिया आहेत. प्राथमिक शाळेत मुलींच्या गळतीचे प्रमाण ५०% आहे. यावरून स्त्रियांच्या शिक्षणाचे विदारक चित्र पुढे येते. आज वाढत्या खासगीकरणामुळे महागाई, गरीब आणि विशेषतः मुली शिक्षणापासून वंचित राहणार आहेत. त्याला सामाजिक प्रथाही बऱ्याच जबाबदार आहेत.

## स्त्री–पुरुष समानतेची मूल्ये

शिक्षण कितीजणींपर्यंत पोहोचते याबरोबरच कोणत्या प्रकारचे शिक्षण त्यांना मिळते? त्यातून स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य विकसित होते का? हेही तितकेच महत्त्वाचे आहेत. शिक्षणातून शास्त्रीय दृष्टिकोन, बुद्धिप्रामाण्यवाद विकसित होत नसेल तर त्या शिक्षणाचा काय उपयोग? कारण अंधश्रद्धा, रूढी परंपरा, धर्म या सर्वांमुळे दुय्यमत्वाला अधिकच खतपाणी मिळते. स्त्री-पुरुषांची कामाची पारंपरिक वाटणी जपणारे, पारंपरिक मूल्यांना खतपाणी घालणारे घरकाम आईचे, बाहेरचे काम पुरुषाचे किंवा डॉक्टर, इंजिनीयर, पोस्टमन, कंडक्टर ही कामे प्रामुख्याने पुरुषांची, तर शिक्षिका, नर्स ही कामे स्त्रियांची किंवा मुले बंडखोर हट्टी असली तर चालतात. मुलींनी मात्र समजदार, संयमी असावे अशा प्रकारची मूल्ये जपणारे शिक्षण स्त्री-पुरुष समानता कशी प्रस्थापित करणार, त्यासाठी आवश्यकता आहे ती पाठ्यपुस्तके, अभ्यासक्रम यांची स्त्रीवादी दृष्टिकोनातून पुनर्मांडणी करण्याची, स्त्री-पुरुष समानतेची मुल्ये शिक्षणातून जोपासण्याची.

## सक्षमीकरणात स्त्रियांची भागीदारी वाढवी

सक्षमीकरणामध्ये सर्वात महत्त्वाचे आहे ते म्हणजे कौटुंबिक सत्तारचनेपासून सार्वजनिक सत्तारचनेतील सत्तेची विषम वाटणी संपुष्टात आणून सत्तेत स्त्री-पुरुषांची समान वाटणी निर्माण करणे. त्यासाठी



सार्वजनिक जीवनातील सत्तारचनांमध्ये म्हणजेच ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा, नगरपालिका, विधानसभा, संसद यामध्ये स्त्रियांची भागीदारी वाढवणे आवश्यक आहे. सरकारने राबवलेल्या स्त्रियांच्या राखीव जागांच्या धोरणामागे स्त्री सक्षमीकरणाचा हाच विचार असल्याचे दिसते; परंतु हे सक्षमीकरण सरकारपुरस्कृत असल्यामुळे सार्वजनिक सत्तारचनांमध्ये राखीव जागांनी स्त्रियांना जागा मिळवून दिली असली तरी त्यातून सत्तेच्या उतरंडीत मात्र बदल झाला नाही. कौटुंबिक स्तरावरील पुरुषसत्ता सार्वजनिक स्तरावर विस्तारली गेली.

## स्त्रीवादी जाणिवा विकसित करणे आवश्यक

स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी आणखी कशाची आवश्यकता आहे? स्त्रियांना खऱ्या अर्थाने सबल करण्यासाठी आवश्यकता आहे ती त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याची, संपत्तीत समान वाटा देण्याची, शिक्षण देण्याची, त्यांना संघटित करून त्यांच्या स्वातंत्र्याबद्दल व हक्काबद्दल त्यांना जागरूक करण्याची, मानसिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याची, त्यांच्यात आत्मविश्वास वाढवण्याची आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्त्री-पुरुषांची मानसिकता बदलण्याची, मूल्यव्यवस्था बदलण्याची, स्त्रीवादी जाणिवा विकसित करण्याची. जाणीव जागृती करणे ही एक व्यापक प्रक्रिया असून या दोघांना स्त्री-पुरुषांमध्ये असणाऱ्या भेदाचे, शोषणाचे व दमनाने आकलन करून देणे आवश्यक आहे. स्त्री-पुरुषांमधील भेद नैसर्गिक नसून तो समाजनिर्मित अधिक आहे हेही पटवून सांगणे आवश्यक आहे. यामध्ये स्त्रीवादी जाणिवा जागृत झालेल्या स्त्री संघटनांची, स्त्रीचळवळी भूमिका अतिशय महत्त्वाची आहे.

स्त्रीवादी जाणिवा जागृत झाल्या तरच स्त्रियांवरील घरकाम, बालसंगोपन, स्वयंपाक या कामांचा बोजा कमी होईल. कौटुंबिक जबाबदारीत, घरकामात पुरुषांची भागीदारी, पुढाकार वाढेल आणि परिणामी स्त्री-पुरुष दोघेही सार्वजनिक जीवनात समान भागीदारी करू शकतील. असा समाजाधिष्ठित समाज निर्माण करून मानवी जीवन अधिकाधिक शांततामय, समृद्ध व संपन्न करणे हेच आपले ध्येय असले पाहिजे.

आज भारताची जलद होणारी आर्थिक प्रगती पाहता लक्षात येते की, येत्या काही वर्षांमध्ये भारत महिला सक्षमीकरणाचे ध्येय साध्य करेल. शासनाने व देशातील जनतेने महिला सक्षमीकरणाची आवश्यकता समजून घ्यायला हवी व याविषयी जास्तीत जास्त लोकांमध्ये जनजागृती निर्माण करायला हवी. या सर्व गोष्टी व्यवस्थित पार पडल्या, तर येत्या काही वर्षातच भारतातील महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून अधिक प्रभावी कार्य करताना दिसतील.

**(लेखिका शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.)**

**उत्पादनवाढीच्या उद्देशाने आपण भरपूर उत्पादन देणाऱ्या जाती शोधून काढल्या आहेत. यामुळे उत्पन्न भरपूर होते; परंतु त्या उत्पन्नाची नैसर्गिक चव गेलेली असते आणि त्यामधील सत्त्वही कमी झालेले असते. रासायनिक खते व कीटकनाशके यांच्या अतिवापरामुळे त्याचा मानवी जीवनावरदेखील विपरित परिणाम होऊ लागला आहे; पण राहीबाई याला अपवाद ठरल्या आहेत. दुर्मीळ होत चाललेली बी-बियाणे, जुन्या गावठी पालेभाज्या, वेलवर्णीय भालेभाज्या यांचा दुर्मीळ साठा पुढील पिढीसाठी जतन करून ठेवण्याचे महत्त्वाचे काम बीजमाता राहीबाई पोपेरे करत आहेत.**

# पारंपरिक वाणांचे संवर्धक

**अक्षरा चोरमारे-जगताप**

शिक्षणापासून वंचित राहिलेले असे सगळेच लोक अशिक्षित असतात, असे म्हणता येत नाही. त्यांना फारतर निरक्षर म्हणता येईल. निरक्षर असूनही समाजाच्या जडणघडणीत अनेकांनी हातभार लावला. राहीबाई सोमा पोपेरे अशांपैकीच एक आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील कोंभाळणे (ता. अकोले) गावातील राहीबाई पोपेरे यांचे नाव महाराष्ट्रातच नव्हे, तर देश-विदेशात प्रसिद्ध झाले आहे. राहीबाईंनी शिकण्याचा प्रयत्नच केला नाही, असे नाही. रात्रशाळेतील तीन रात्री त्या शिकल्या. सही करता येण्यापुरते तरी शिकावे अशी त्यांची इच्छा होती आणि त्यासाठी त्या रात्रशाळेत दाखल झाल्या होत्या; पण रात्रशाळेत शिकवायला येणाऱ्या शिक्षकांना चौथ्या रात्री वाटेत वाघ दिसला. त्यावेळी त्यांनी जी धूम ठोकली, ते पुन्हा रात्रशाळेकडे फिरकले नाहीत. त्यामुळे राहीबाईंची शाळा सुटली.

राहीबाईंना शाळेत जाण्याचे भाग्य लाभले नाही; परंतु निसर्गाच्या शाळेत त्या मन लावून शिकल्या. निसर्गाशी समरस झाले की, निसर्ग भरभरून देत असतो. राहीबाई निसर्गाशी समरस झाल्या आणि निसर्गाने त्यांच्या जगण्याला दिशा दिली. लहानपणापासून त्यांना शेतीची आवड होती. त्यांची ही आवड छंदात रूपांतरित झाली आणि त्यातून साकारली बियाण्यांची बँक. त्यामुळे त्यांची 'बीजमाता राहीबाई' अशी ओळख निर्माण झाली.

## हायब्रीड बियाणे

हरितक्रांतीनंतर देशात हायब्रीड बियाण्यांचा पुरवठा मोठ्या प्रमाणात होऊ लागला. अधिक उत्पादन मिळत असल्याने शेतकरी हायब्रीड बियाण्यांकडे वळले. त्यामुळे पारंपरिक वाणांच्या वापराकडे दुर्लक्ष झाले. सर्रास सगळीकडे होणाऱ्या हायब्रीड बियाणे आणि रासायनिक खतांच्या वापरामुळे पिकांची गुणवत्ता कमी झाली, शिवाय चवीमध्येही फरक पडला. आरोग्याच्या समस्याही निर्माण होऊ लागल्या.


राहीबाई पोपेरे

एखाद्या ध्येयवादी व्यक्तीच्या हातून कोणतेही महत्त्वाचे काम निर्माण होते, तेव्हा त्यामागे काहीतरी पार्श्वभूमी असते. राहीबाई पोपेरे यांच्या आयुष्याला वळण मिळायला अशीच एक घटना कारणीभूत ठरली.

राहीबाई यांच्यासह एकूण आठ भावंडे. त्यात राहीबाईंचा पाचवा नंबर. सात वर्षांच्या असताना राहीबाईंचे मातृछत्र हरपले. वडिलांची परिस्थिती बेताचीच होती. चार-पाच एकर शेती होती; पण सगळी कोरडवाहू. त्यात नागणी, वरई, भात, उडीद, भुईमूग अशी पिके घेतली जायची. घरच्यांना खाण्यापुरते उत्पन्न व्हायचे. आदिवासी भाग असल्यामुळे मुलींची लग्ने लवकर करण्याची प्रथा होती. त्यानुसार १२व्या वर्षी राहीबाईंचे लग्न झाले. गावातल्या गावात त्यांचे सासर होते. सासरी शेती थोडी जास्त असली तरी कोरडवाहूच. साहजिकच अधिक उत्पादन मिळावे, अशी शेतकऱ्यांची इच्छा असायची. त्यासाठी नवीन बियाणे आले की ते पेरले जायचे. भाजीपालाही घरात हायब्रीडच येत होता.

## जुनं ते सोनं

काही वर्षांपूर्वी राहीबाईंचा लाडका नातू सतत आजारी पडू लागला. त्याची काळजी लागलेल्या राहीबाईंना प्रश्न पडला, आमच्या वेळी तर कोणी इतके आजारी पडत नव्हते मग आता काय बरे कारण असू शकेल? आधी त्या शेतात फारसे लक्ष घालत नव्हत्या. मुलंच शेती बघत होती; परंतु आता राहीबाईंनी घरात आणि शेतातही स्वतः लक्ष घालायला सुरुवात केली. त्यांचे वडील नेहमी म्हणायचे जुनं ते सोनं त्याचा अर्थ राहीबाईंनी नीटपणे समजून घेतला. मुलांना ठणकावून सांगितले- येथून पुढे आपल्या शेतात हायब्रीड बियाणे चालणार नाही. मुलांनी आईला समजावण्याचा प्रयत्न केला. हायब्रीडच्या वापराने कसे उत्पन्न जास्त मिळते हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण राहीबाई आपल्या निर्णयावर ठाम राहिल्या. मुलांनी मग आईचा मान राखून गावरान बियाणे वापरून शेती करायला सुरुवात केली.

या शेतीचे फायदे दिसून येऊ लागले. नातवाचा आजार दूर पळाला. घरातल्या इतर लोकांचे अधुनमधून येणारे आजारही कमी झाले. यातून राहीबाईंनी आपले काम अधिक लोकांपर्यंत न्यायचा विचार केला. त्यासाठी आधी बचतगटातील महिलांना माहिती दिली. बचतगटाच्या माध्यमातून इतर लोकांना, गावकऱ्यांना, नातेवाईकांना, सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून द्यायला सुरुवात केली. यात त्यांना साथ मिळाली ती 'बायफ' या संस्थेची. बायफ संस्थेशी सगळे बचतगट जोडलेले होते. बायफ संस्थेच्या सहकार्याने घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांनी

देशी बियाण्यांचा प्रसार व प्रचाराचे कार्य सुरू केले. त्यांच्या कार्याला एक दिशा मिळाली, त्यांना आपल्या कामाचा आवाका वाढवण्यास मदत झाली. त्यातूनच त्यांनी देशी बियाण्यांची बँक सुरू केली ती म्हणजे 'बीज बँक'. बीज बँकेतून त्यांनी गरजू शेतकऱ्यांना गावरान देशी वाणांचा पुरवठा केला.

## बायफ संस्था

राहीबाईंच्या बियाणे बँकेत ५४ पिकांचे ११६ जातींचे वाण जमा झाले. भाताच्या वीसेक जाती त्यांच्याकडे आहेत. ज्यात रायभोग, जिरवेल, वरंगळ, कोळपी, ढवळू भात, काळभात, आंबेमोहोर अशी त्या फटाफट नावे सांगतात. त्या एवढ्यावरच थांबत नाहीत तर, 'रायभोग इथं लावला तर एक किलोमीटरपर्यंत त्याचा सुवास पसरतो', 'गरोदर स्त्रियांना खोबरे-खारकांनी मिळतो तेवढा पौष्टिकपणा ढवळूभात देतो', 'आईला दूध कमी असेल तर याच भाताची पेज बाळाला देतात, अशी गुणवैशिष्ट्ये सांगतात.

रानभाज्यांच्या बियासुद्धा राहीबाई त्यांच्या बँकेमार्फत पुरवतात. चाई, माठ, तांदुळका, चंदनबटवा, पालक या रानभाज्यांबद्दल बोलताना राहीबाई आवर्जून सांगतात, 'आम्ही जुने लोक या रानभाज्या नुसत्या उकडून खायचो... आताची पिढी तर तेलात परतून खाते, पण तरी त्यांच्यात ताकद नाही.' राहीबाई बियाणे चांगले वाळवून राखेत ठेवतात. त्यानंतर ते राख लावलेले बियाणे कणगीत भरून ठेवले जाते. साधारणतः तीन वर्षे तरी हे बियाणे आरामात टिकते.

## कळसूबाई परिसर बियाणे संवर्धन समिती

कळसूबाई शिखराच्या परिसरातील जैवविविधता त्यांनी जतन केली. त्यासाठी 'कळसूबाई परिसर बियाणे संवर्धन समिती' स्थापन केली. त्यामार्फत भात, भाजीपाला पिकांच्या विविध जातींचे गावरान बियाण्यांचे जतन केले.

सुरुवातीच्या काळात राहीबाईंना अनेकांनी वेड्यात काढले. लोकांकडून त्यांना अनेक प्रकारची बोलणी ऐकावी लागली, पण त्यांनी मार्ग सोडला नाही. सुरुवातीला घरापुरते मर्यादित सुरू केलेले काम आता दहा गावचे लोक मिळून हे काम करतात आणि सगळ्यांनी मिळून तीनेकशे वाणांची जमवाजमाव केली आहे. नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या काही बियाण्यांच्या जातींचे त्यांनी संवर्धन केले. ज्यामुळे पुढच्या पिढ्यांनाही आपल्या मातीतले चांगले अन्न मिळू शकणार आहे.

'आपली काळी माती आपल्याला पोसते... पण हायब्रीड बियाण्यांसाठी रासायनिक खतांचा अतिवापर करून आपणच आपली माती नासवली आहे,' असे राहीबाई सांगतात. गावरान बियाण्याला फक्त पाणी आणि शेणखत किंवा गांडूळखत पुरेसे होते. आपल्या ताकदीवर ते वाढते. मनगटात बळ देते. हायब्रीड बियाण्यांचा वापर वाढल्यामुळे तांदूळ, गहू, भाज्या, औषधी वनस्पतींच्या असंख्य जाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. शिवाय आपली शारीरिक क्षमता कमी झाली आहे. वेगवेगळे आजार झाले आहेत. हायब्रीड बियाणे तयार करण्यासाठी १० वर्षे लागतात. पण नैसर्गिक गावरान बियाणे तयार व्हायला हजारो-लाखो वर्षे लागली. हा निसर्गांने दिलेला अनमोल ठेवा आहे... राहीबाई बोलायला लागल्या की, माहितीचा धबधबा वाहत असतो.

## तीन हजार महिलांना रोजगार

गावरान वाण शोधायचे, त्यांची लागवड करायची, त्यांच्या बिया काढून त्यांची साठवणूक करायची, त्यातील इतरांना पेरणीसाठी द्यायच्या, त्यांच्या माध्यमातून पुन्हा बियांचे संकलन करायचे. अशा पद्धतीने राहीबाईंच्या बीज बँकेचा विस्तार सुरू असतो. नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातील सुमारे चारशे एकर जमिनीवर राहीबाईंच्या प्रेरणेतून गावरान वाणांची शेती केली जाते. त्यांनी जपलेले बियाणे राज्यातील अनेक जिल्ह्यांत आणि परराज्यांतही पोहोचले आहे. वांगी, भेंडी, पेरू, आंबा, पालक, मेथी, वाटाणा आदींचे बियाणे त्यांनी काळजीपूर्वक जपले. सध्या तीन हजार महिलांसोबत त्या काम करतात. ठिकठिकाणाहून त्यांना व्याख्याने, प्रशिक्षणासाठी सतत निमंत्रणे येत असतात. हायब्रीड बियाण्यांच्या काळात देशी बियाणे कसे टिकवायचे, याचे प्रशिक्षणही राहीबाई आणि त्यांच्या बीज बँकेमार्फत दिले जाते. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर हे राहीबाईंचे काम पाहून प्रभावित झाले. एका कार्यक्रमात त्यांनी राहीबाईंचा उल्लेख 'मदर ऑफ सीड' असा केला. तेव्हापासून 'बीजमाता' म्हणून त्यांना ओळखले जाऊ लागले. अशाच एका कार्यक्रमात महाराष्ट्राचे तत्कालीन महसूलमंत्री आणि सध्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशी त्यांची भेट झाली. चंद्रकांत पाटील यांनी बीज बँकेसाठी नव्या इमारतीची घोषणा केली आणि ती प्रत्यक्षातही आली.

'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी', असे संत तुकारामांनी म्हटले आहे. त्याची शब्दशः प्रचिती राहीबाईंचे कार्य पाहिल्यानंतर येते.

(लेखिका या वृत्तनिवेदक म्हणून कार्यरत आहेत.)

### 'आदर्श शेतकरी' व 'नारीशक्ती' पुरस्कार



महाराष्ट्र सरकारच्या कृषी विभागाच्या 'आत्मा प्रकल्पां'तर्गत आदर्श शेतकरी पुरस्काराने राहीबाईंचा सन्मान करण्यात आला आहे. भारत सरकारच्या महिला आणि बालकल्याण विभागाच्यावतीने जागतिक महिला दिनी राहीबाईंना 'नारीशक्ती पुरस्कार' देऊन गौरवण्यात आले. ८ मार्च २०१८ रोजी राष्ट्रपती भवनात तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते हा पुरस्कार सोहळा झाला. बीबीसीने त्यांच्या कार्याची दखल घेतली असून, २०१८ सालातील १०० प्रभावशाली महिलांमध्ये त्यांचा समावेश केला आहे. भारत सरकारने प्रतिष्ठेच्या पद्मश्री सन्मानाने त्यांचा गौरव केला.

**कोल्हापूर जिल्ह्यातील पहिल्या महिला टेबल टेनिसपटू म्हणून आजही त्यांचे विशेष कौतुक केले जाते. ज्याप्रमाणे त्यांनी कष्ट, मेहनत जिद्दीने आपले ध्येय गाठले, त्याप्रमाणे त्या आजही लाखो मुलींसाठी प्रेरणादायी ठरत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नावलौकिक करणाऱ्या प्रतिभावान टेबल टेनिसपटू शैलजा साळोखे खेळाविषयी आजही तितक्याच आत्मविश्वासाने आणि तन्मयतेने बोलतात. नुकतीच त्यांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली आहेत. या निमित्ताने त्यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा..**

# प्रतिभावान टेबल टेनिसपटू

**वृषाली पाटील**

१९६० नंतर स्त्रीवाद जन्माला आला. त्यावेळी पुरुषाप्रमाणे स्त्रियांनाही समाज रचनेत अर्थपूर्ण स्थान प्राप्त झालेले नव्हते. ना स्त्रिया आपल्या मनासारखे वागू शकत होत्या ना खेळू शकत होत्या. अशा परिस्थितीमध्ये फक्त वडिलांच्या प्रोत्साहनामुळे शैलजा साळोखे हा खेळ खेळू लागल्या. मुळातच त्यांचे वडील हे उत्कृष्ट फुटबॉलपटू होते. लहानपणापासून त्यांचा खेळ पाहत त्या मोठ्या झाल्या. वडिलांच्यासारखे आपण ही उत्कृष्ट खेळाडू व्हावे असे त्यांना वाटायचे. या जाणिवेतूनच त्यांना या खेळाची आवड निर्माण झाली. त्या काळी मुलींना खेळण्यासाठी बाहेर पाठवले जात नसे. शाळेत असताना आझाद चौकातील रविवारपेठेतील घर ते ताराराणी विद्यालय असे एकूण ४-५ किलोमीटर त्यांना चालत यावे लागायचे. शैलजा व त्यांच्या तिन्ही बहिणींनी नियमित खेळ खेळावा, यासाठी त्यांचे वडील नेहमी आग्रही असायचे. शैलजा यांची खेळाविषयी असणारी आत्मीयता, सराव आणि जिद्द यामुळे वडिलांनी घरातच टेबल टेनिसचे टेबल तयार करून घेतले. खेळाचे बारकावे लक्षात यावे, यासाठी त्यांचे वडील नेहमी सरावासाठी आग्रही असायचे.

## ताराराणी शिक्षण संस्था

ताराराणी शिक्षण संस्थेचे संस्थापक व्ही. टी. पाटील यांनी शाळेतील मुलामुलींना खेळता यावे, यासाठी शाळेच्या लायब्ररीमध्ये लाकडी टेबल बनवून घेतले. यामुळे खेळ आणि शिक्षण या दोन्ही गोष्टी त्यांना करता आल्या. 'कोणत्याही खेळामध्ये सराव आणि सातत्य असेल, तर विजय आपलाच होतो,' असे मुख्याध्यापक श्री. अय्यर सर त्यांना नेहमी सांगायचे. त्यांच्या खेळावर सरांचे विशेष लक्ष असायचे. खेळातील बारीक चुका कशा टाळायच्या, समोरच्या प्रतिस्पर्धकाची नजर बघून वेगवेगळे शॉट्स



कसे मारायचे इ.चा सराव करून घेत असत. त्या वेळी खासबाग मैदानाजवळील राजारामियन क्लबमध्ये टेबल टेनिस आणि अन्य खेळ खेळण्यासाठी त्या काळातील नामवंत खेळाडू यायचे. या खेळाडूंचा खेळ पाहायला त्या आवर्जून जायच्या. त्या वेळी अशी संधी मिळणे खूप कठीण असायचे. टेबलची संख्या कमी असल्यामुळे एका टेबलवर ३६ खेळाडू खेळ खेळायचे. अशामध्ये त्यांच्यावर राऊंड यायला दीड-दोन तास वाट पाहावी लागायची.

## गुरु व मार्गदर्शक

बाबा भोसले यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे त्या इथपर्यंत पोहोचू शकले. त्यांच्या या यशामध्ये श्री.भोसले यांचा सिंहाचा वाटा आहे. खेळातील दर्जा टिकवून ठेवण्यासाठी राजारामियन क्लबमध्ये त्यांचा खेळाचा सराव सुरू झाला. खेळातील बारकावे लक्षात आल्यानंतर या खेळाविषयी त्यांची अजूनच रुची निर्माण झाली. त्यांच्या जडण-घडणीमध्ये वडिलांप्रमाणेच बाबा भोसले आणि उद्योजक मदनमोहन लोहिया यांचाही वाटा महत्त्वाचा आहे. त्या काळात मदनमोहन लोहिया हे कोल्हापुरात दरवर्षी टेबल टेनिसच्या किमान सहा-सात स्पर्धांचे आयोजन करत असत. या स्पर्धांमध्ये विविध राज्यांतील खेळाडू सहभागी व्हायचे. यामुळे राष्ट्रीय पातळीवरील खेळाडूंचा खेळ पाहणे ही त्यांच्यासाठी खूप मोठी गोष्ट असायची.

## खेळातील सातत्य

त्यांनी केलेल्या कष्टाचे कुठेतरी चीज होणार होते. शाळेत शिकत असताना आंतरशालेय क्रीडा स्पर्धांमधून शैलजा यांची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली. या स्पर्धा मणिपूर, आसामला होणार होत्या. पण इतक्या लांब मुलगी एकटी कशी जाणार? या विचारांनी त्यांची संधी हुकली. पण खेळामध्ये कुठेच खंड न पडू देता खेळाचा सराव त्यांनी सुरूच ठेवला होता.

मदनमोहन लोहिया यांना खेळ, संगीत, नाटक, सामाजिक कार्याची आवड होती. त्यांनी विविध खेळांचे सामने भरवले होते. १९६३ ते ६६च्या दरम्यान झालेल्या स्पर्धांमध्ये अनेक राज्यांचे खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धा आंतर जिल्हा स्पर्धा असल्या तरी अनेक राज्यातील खेळाडू या स्पर्धांत सहभागी झाले होते. खेळाडूंचा खेळ पाहण्याची आणि त्यांच्यासोबत खेळण्याची संधी त्यांना मिळाली. दिग्गजांचा खेळ पाहताना आपल्यातील क्षमता आणि कमतरता ओळखून खेळाचा दर्जा वाढवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी मदत झाली.

## पहिला परदेश दौरा

१९६२च्या भारत-चीन लढाईनंतर या दोन्ही देशांतील मैत्रीपूर्ण संबंध सुधारण्याच्या हेतूने १९७१ मध्ये 'मैत्री मोहिमे'वर चीनमधील पेकींगला (सध्याचे बीजिंग)

## कारकिर्द

- इंदूर (१९७४), अलाहाबाद (१९७६), उदयपूर ( १९७९ ) मध्ये झालेल्या स्पर्धेत राष्ट्रीय चॅम्पियनशिप.
- यू. एस. ए. कॅनडाला भेट दिलेल्या भारतीय महिला टेबल टेनिसच्या संघाचे नेतृत्व. महिला डबल्सला कांस्यपदक (१९७४-७५)
- ग्वेर्नसेसी (यु.के.) येथे कॉमनवेल्थ टुर्नामेंटमध्ये भारतीय महिला टेबल टेनिस संघाचे नेतृत्व. महिला एकेरीतही कांस्यपदक. महिला डबल्समध्ये कांस्यपदक (१९७७)
- डिनबर्ग (स्कॉटलंड) येथे झालेल्या कॉमनवेल्थ टेबल टेनिस स्पर्धांमध्ये सहभाग, महिला डबल्सला कांस्यपदक (१९७९)
- महाराष्ट्र गावराव पुरस्काराने सन्मानित (१९९०)
- जपानमधील आशियाई चॅम्पियनशिपमध्ये सहभागी झालेल्या भारतीय ज्युनियर मुले आणि मुलींच्या टेबल टेनिस संघाच्या प्रशिक्षक (१९८३)
- शिवाजी विद्यापीठ क्रीडा मंडळाच्या सदस्य (१९९८ ते आजपर्यंत)
- कोल्हापूर भूषण पुरस्कार २००३ ने सन्मानित
- सध्या टेबल टेनिसमधील खेळाडूंना प्रशिक्षण देण्याचे कार्य सुरू आहे.



भारताची टेबल टेनिसची टीम पाठवण्याचे निश्चित झाले. या टिममध्ये शैलजा यांचा सहभाग होता. त्यांचा हा पहिलाच परदेश दौरा होता. परदेशी आपल्या खेळाची चुणूक दाखवण्याची त्यांना संधी मिळाली होती. तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी हा दौरा यशस्वी होण्यासाठी काटेकोर नियोजन केले होते. ही स्पर्धा त्यांच्यासाठी खूप महत्त्वाची होती. या सामन्यात त्यांना चौथा क्रमांक पटकावून कांस्यपदक जिंकता आले. या स्पर्धेत यश मिळाल्यानंतर कोल्हापूरकरांनी त्यांच्या खेळाचे कौतुक केले.

## श्री शिवछत्रपती पुरस्कार

महाराष्ट्र शासनातर्फे क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राज्यातील गुणवान खेळाडूंना दिल्या जाणाऱ्या श्री शिवछत्रपती पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. टेबल टेनिसमध्ये तीन वेळा महिलांचे राज्यस्तरीय विजेतेपद मिळाले.

१९७२-७३ सालचे त्या वेळचे महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल अली यावर जंग यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार देण्यात आला. राज्य शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या या पुरस्कारामुळे त्यांचे मनोबल तर वाढलेच, त्याचबरोबर टेबल टेनिसमध्ये देशाचे नावलौकिक करण्याची जिद्द निर्माण झाली.

## अर्जुन पुरस्कार

खेळातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल १९७८ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यांच्या हस्ते अर्जुन पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच १९७४ मध्ये अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय स्पर्धेतही त्यांना भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. १९७५ मध्ये मेलबर्न येथे झालेल्या कॉमनवेल्थ स्पर्धेत त्यांना रौप्यपदक जिंकता आले. भारताला आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टेबल टेनिसमध्ये मिळालेले ते पहिले पदक. भारताला ऑल इंडिया चॅम्पियनशीप तीन वेळा मिळाली.

## पहिली सरकारी नोकरी

टेबल टेनिसमध्ये एव्हाना त्यांचे नाव चांगलेच परिचित झाले होते. दक्षिण मध्य रेल्वे विभागासाठी टेबल टेनिस खेळाडूंची आवश्यकता होती. यासाठी रेल्वेचे सरव्यवस्थापक स्टेशन मास्तरांसह घरी आले. वडिलांनी स्पर्धेसाठी परवानगी, सरावासाठी वेळ अशा बऱ्याचशा अटी त्यांच्यासमोर मांडल्या. या अटींवर त्यांना रेल्वेत नोकरी करण्याची संधी मिळाली. याच दरम्यान झेकोस्लोव्हाकीयामधील प्लाझान येथे १९७८ मध्ये झालेल्या जागतिक टेबल टेनिस स्पर्धेत भारतीय रेल्वे संघाचे नेतृत्व करण्याची संधी त्यांना मिळाली. या स्पर्धेत महिला संघाने सुवर्णपदक मिळवून विश्व विजेतेपद पटकावले. १९७९ मध्ये रेल्वे बोर्डाने 'इंडियन रेल्वे मिनिस्ट्री वॉर्ड'ने राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.

## अडचणींवर मात

टेबल टेनिसमध्ये अनेक सामन्यात यश मिळवत असताना बऱ्याच अडचणी आल्या. पण अडचणींवर मात करून जो पुढे स्वार होतो तोच यशस्वी होतो, हे त्यांना त्यांच्या वडिलांकडून शिकायला मिळाले होते. अडचणींना न जुमानता सरावात सातत्य ठेवले. त्यांच्या भावाच्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. यामुळे वडील पूर्णपणे खचून गेले. वडिलांना या दुखा:तून बाहेर काढणे गरजेचे होते. त्यांना मानसिक आधाराची गरज होती. दुःख बाजूला सारून प्रसंगाच्या १४व्या दिवशीच त्या वडिलांसह टेबल टेनिसच्या स्पर्धेसाठी बाहेर पडल्या. केरळमधील मुन्नार येथे झालेल्या या दक्षिण विभागीय स्पर्धेत पहिला क्रमांक मिळवला. अशा परिस्थितीतही मानसिक स्थैर्य ढळू न देता खंबीरपणे त्या खेळ खेळल्या.

## खेळाडूंना आवाहन

खेळाचा नियमित सराव करा, मन शांत ठेवून ध्येयाच्या दिशेने वाटचाल करा, स्वत:शी प्रामाणिक राहा, ध्येय गाठायची जिद्द असेल तर अपार कष्ट करा, दिवसातून कमीत कमी ४ ते ६ तास सराव करा. प्रचंड मेहनत आणि इच्छाशक्तीच्या बळावर अनेक अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करता येतात. परिश्रम आणि जिद्दीने कोणतेही ध्येय गाठता येते त्यासाठी झोकून द्या, सर्वस्व पणाला लावा, आयुष्यात कितीही संकटे आली तरी न डगमगता धैर्याने सामोरे जा, विजयश्री मिळेपर्यंत प्रयत्नात सातत्य ठेवा, यश तुमच्याच हाती, असे त्यांनी खेळाडूंना 'लोकराज्य'च्या माध्यमातून संदेश दिला आहे.

**माहिती अधिकारी,**
**जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर.**

**महिला सक्षमीकरण हे ध्येय नजरेसमोर ठेवून पुरोगामी महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या पार्श्वभूमीवर दिनांक २४ फेब्रुवारी १९७५ रोजी महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) ची स्थापना करण्यात आली. महिला सशक्तीकरणातील तज्ज्ञता लक्षात घेऊन सन २००३ मध्ये महाराष्ट्र शासनाने या महामंडळाला महिला विकासाची शिखर संस्था म्हणून जाहीर केले.**

# महिलांचा सर्वांगीण विकास

**कुसुम बाळसराफ**

राज्यातील ३५ ग्रामीण जिल्ह्यांतील १०,४९५ गावांत व मुंबईसह महाराष्ट्रातील २५९ शहरांत महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) कार्यरत आहे. महामंडळाचे कामकाज हे जिल्हास्तरावर असणाऱ्या जिल्हा कार्यालयातून चालते, महामंडळाची ३५ जिल्हा कार्यालये असून ती तालुका आणि गावस्तरावर जोडली गेली आहेत. माविमचे मुख्य कार्यालय मुंबईत बांद्रा येथे आहे. विविध शासकीय व खासगी बँकांशी सामंजस्य करार करून सुमारे रुपये ६,६४० कोटींपेक्षा अधिक कर्जे महिलांना उपलब्ध करून दिली आहेत.

स्वयंसाहाय्य बचतगट हे महिला सक्षमीकरणासाठीचे सक्षम असे माध्यम आहे. स्वयंसाहाय्य बचतगटामुळे महिलांना एक व्यासपीठ मिळते. यामुळे महिलांना आपल्या सुप्त गुणांना विकसित करण्याची संधी प्राप्त होते.

### स्वयंसाहाय्य बचतगटाची चळवळ

महामंडळाने ग्रामीण व शहरी भागात बचतगटांचे संघ (फेडरेशन) म्हणजेच स्वयंसाहाय्य बचतगटांच्या संस्थांची उभारणी केली आहे, ज्याला माविम 'लोक संचालित साधन केंद्र' असे संबोधते. माविमने आजवर ग्रामीण भागात २४८ फेडरेशनची बांधणी केली आहे. त्याचा मुख्य उद्देश म्हणजे स्वयंसाहाय्य बचतगटाची चळवळ निरंतर चालावी, तसेच गटांच्या बदलत्या गरजांनुसार गटांना मार्गदर्शन व सातत्यपूर्वक सहकार्य (हॅण्डहोल्डिंग सपोर्ट) केले जावे. माविमप्रेरित सर्व फेडरेशन्स नोंदणीकृत असून २१० फेडरेशन ही स्वबळावर कार्यरत आहेत. आज ही फेडरेशनस् शासनाच्या योजना शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

स्वयंसाहाय्य बचतगटातील महिलांनी तयार केलेली उत्पादने ही चांगल्या प्रतीची/गुणवत्तेची असतात, परंतु अनेकदा त्यांची पॅकिंग, लेबलिंग, किंमत यासोबतच मार्केटचा प्रश्न असतो. यासाठी माविम पॅकिंग, लेबलिंग, किंमत यावर विशेष लक्ष देत आहे. यासाठी प्रशिक्षण, तज्ज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन दिले जाते. माविमने स्वतःचे ई-बिझनेससारखे सॉफ्टवेअर तयार केले असून एकाच वेळी मोठ्या प्रमाणात माल विक्रीसाठी ॲमेझॉन, फ्लिपकार्टसारख्या वेगवेगळ्या भागीदारांसोबत भागीदारी केली जात आहे.

कोविड काळातही महामंडळाने सामाजिक, अन्न व आर्थिक सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य केले आहे. २०२० मध्ये कोविडच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या आवाहनानंतर माविमने मुख्यमंत्री निधी फंडास ११ लाख ३५ हजार रुपये केवळ १ रुपयाच्या लोकसहभागातून जमा केले.



### महिला विकास हाच केंद्रबिंदू

माविमने वेगवेगळ्या विभागांसोबत समन्वय साधत कृतीसंगम (कॉन्व्हर्जन्स) करून त्या-त्या विभागाच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवल्या आहेत. योजना राबवताना लाभार्थ्यांचा निधीस्वरूपात लोकसहभाग असावा या संकल्पनेची अंमलबजावणी माविमने प्रत्यक्षात करून उपक्रम यशस्वी केला आहे. या माध्यमातूनच ७.६० लाख इतक्या महिला विविध प्रकारचे व्यवसाय करत आहेत.

महिला विकास हा महामंडळाचा केंद्रबिंदू असला तरी महिलेच्या माध्यमातून कुटुंबाचा विकास ही महामंडळाची महत्त्वाची भूमिका आहे. महिला सक्षमीकरण प्रक्रियेत आरोग्य, महिलांचे हक्क व अधिकार महत्त्वाची भूमिका बजावत असतात. म्हणूनच महामंडळ 'घर दोघांचे' या अभियानांतर्गत मालमत्तेमध्ये महिलांचा अधिकार यावर विशेष काम करत आहे. महिलांमध्ये कायदेविषयक जनजागृतीसाठी 'कायदा साथी'सारखी संकल्पना राबवण्यात येत आहे. तसेच महिलांचे आरोग्य तपासणी व हिमोग्लोबीन तपासणीचे आयोजन, परसबाग सारख्या उपक्रमाला जोडूनच ॲनिमियामुक्त गाव मोहीम, जैविक परसबाग लागवड, तिरंगा थाळीसारखे विविध उपक्रम राबवले जात आहेत.

## स्वयंसाहाय्य बचतगटांवर आधारित उपक्रम/योजना

### नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प

राज्यातील १० लाखांहून अधिक गरीब व गरजू महिलांना आर्थिक दृष्टीने सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र शासन व आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी साहाय्यित नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प जानेवारी २०२१ पासून राबवण्यात येत आहे.

महिला केंद्रित बाजारपेठ विकसित करणे, सेंटर ऑफ एक्सलन्स म्हणून विकसित होण्याकरिता नियोजन आणि प्रयत्न करणे असा एकूणच या प्रकल्पात उद्योजकता विकासावर विशेष भर देण्यात येणार आहे.

### तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस

समाजातील अतिगरीब महिलांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांना विकासाच्या मुख्य प्रक्रियेमध्ये आणणे, तसेच शाश्वत विकासाचा मार्ग अवलंबण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाच्या साहाय्याने तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस हा नवीन कार्यक्रम १ फेब्रुवारी २०१९ रोजी सुरू केला आहे. २०२० पासून हा कार्यक्रम राज्यातील मानव विकास मिशनअंतर्गत समाविष्ट निवडक १२५ तालुक्यात राबवण्यात येत आहे.

अल्पसंख्याक विकास विभागाने, अल्पसंख्याक महिला सक्षमीकरण कार्यक्रम फेज १ व फेज २ अशा दोन टप्प्यांत सुरू केला आहे. प्रथम टप्प्यातील १० जिल्ह्यांत राबवलेल्या प्रायोगिक कार्यक्रमाचे महत्त्व लक्षात घेऊन दुसऱ्या टप्प्यात अल्पसंख्याक विभागाने नवीन १० जिल्ह्यांसाठी एकूण २८०० गट निर्मितीचे नवीन कार्यक्रम मंजूर केले आहेत.

### केंद्र शासन पुरस्कृत दीनदयाळ उपाध्याय अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान

या प्रकल्पात शहरातील गरीब व गरजू महिलांना बचतगटात सामावून घेणे, त्यांना उद्योग व्यवसाय उभे करण्याकरिता बँक कर्जाशी जोडून देणे व त्याला संस्थात्मक स्वरूप देणे, यासाठी माविम संसाधन संस्था म्हणून महत्त्वाची भूमिका करत आहे.

### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

या अभियानांतर्गत ठाणे (भिवंडी, शहापूर), सोलापूर (माळशिरस, मोहोळ) व गोंदिया (सालेकसा, तिरोडा) या तीन जिल्ह्यांमध्ये एकूण ६ तालुक्यांकरिता ३ वर्षांसाठी तांत्रिक तज्ज्ञ व अंमलबजावणी संस्था म्हणून माविमची निवड करण्यात आली आहे.

**वॉश -** वॉटर डॉट ऑर्गनायझेशन या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या मदतीने महिला विकास महामंडळ (माविम) यांच्यामार्फत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये 'वॉश' हा उपक्रम राबवण्यात येतो. यामध्ये महिलांना शौचालय बांधण्यासाठी कर्ज घेण्यास आणि स्वच्छ पाण्याची तरतूद करण्यास प्रोत्साहन देण्यात येते.

स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहांची उपलब्धता आणि वापर करण्यासाठी वस्तीपातळीवर कुटुंबांना प्रेरित करणे व त्यासाठी अर्थसाहाय्य तसेच तांत्रिक मदत देणे हा या कार्यक्रमाचा गाभा आहे.

वॉटर डॉट ऑर्गनायझेशन या आंतरराष्ट्रीय संस्थेसोबत २०१७-१८ पासून महिलांचे आरोग्य व स्वच्छता या विषयावर व्यापक पद्धतीने काम सुरू आहे. शौचालय बांधणी, घरामध्ये न्हाणीघर बांधणे, शौचालय दुरुस्ती, शौचालय नूतनीकरण, स्पेशल नीड शौचालय (दिव्यांग व्यक्ती, गरोदर, वृद्ध व्यक्ती, दुर्घटनाग्रस्त अपंग व्यक्तीकरिता), घरापर्यंत पाईपलाइनने पाण्याची सुविधा, पाण्याची साठवणूक करण्यासाठी टाकीची बांधणी व पाणी शुद्धीकरणसाठी वॉटर फिल्टर्स इ. विविध वॉश प्रॉडक्ट्सचा प्रचार व प्रसार करण्यावर काम सुरू आहे.

आतापर्यंत एकूण १.६२ लाख महिलांनी स्वच्छतागृह, न्हाणीघर किंवा पाण्याचे उपक्रम राबवण्यासाठी कर्जे घेतली आहेत. व त्याची परतफेड ही ९९% आहे.

यासोबतच महामंडळ (स्मार्ट), (मॅग्नेट) यांसारख्या जागतिक बँक आणि आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने राबवण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या इतर महत्त्वपूर्ण प्रकल्पात माविम भागीदार संस्था म्हणून कार्यरत आहे. या प्रकल्पाच्या व नव तेजस्विनी प्रकल्पात माविम शेतकरी उत्पादक संस्थासारखी संकल्पना संपूर्ण महाराष्ट्रात राबवत आहे.

### लोकांचा कृतिशील सहभाग

माविम या संस्थेच्या कामाचे वैशिष्ट्य म्हणजे गावागावात व शहरांच्या वस्त्यांत खऱ्या अर्थाने लोकांचा कृतिशील सहभाग घेऊन त्यांना वाटाड्या म्हणून मार्ग दाखवण्यात महामंडळ यशस्वी झाले आहे. वस्तीतील सीएमआरसीसारख्या संस्था अथवा महिलांच्या आयुष्यातील प्रत्येक निर्णय त्यांचे त्यांना घ्यायला प्रवृत्त करताना खऱ्या अर्थाने सक्षमीकरणाची मूल्ये त्या सहजी आत्मसात करताना दिसतात.

इंटरनेट बँकिंग, पेमेंट गेट वें चा वापर, किंवा स्मार्ट फोन हाताळणे असेल या गोष्टी सहजपणे करू लागल्या आहेत. ग्रामीण आणि शहरीपणाची दरी कमी होताना दिसत आहे. ग्रामीण स्त्रियांचा आत्मविश्वास आणि सक्षमीकरणाची समज ही शहरी स्त्रियांपेक्षा तसूभरही कमी दिसत नाही. त्यांच्या क्षमतांची त्यांना जाणीव तर आहेच; पण त्यांचा वापर करण्याचे धाडस आणि कौशल्य ही त्या वापरताना दिसत आहेत. घरातल्या आर्थिक आणि कौटुंबिक जबाबदाऱ्याही त्या उत्तम प्रकारे पार पाडताना दिसत आहेत.

**(लेखिका महिला आर्थिक विकास महामंडळाच्या जनसंपर्क अधिकारी आहेत.)**

**केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अमरावती येथील पल्लवी देवीदास चिंचखेडे यांनी आपल्या जिद्द व परिश्रमाच्या बळावर यश मिळवले आहे. पल्लवी सध्या भारतीय महसूल सेवा (आयआरएस) या कॅडरअंतर्गत फरिदाबाद (हरियाणा) येथे 'इंडियन पोस्ट ॲण्ड टेलिकम्युनिकेशन अकाऊंट्स ॲण्ड फायनान्स सर्व्हिसेस' अंतर्गत प्रशिक्षण घेत आहेत. त्यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना उमेदवारांनी सातत्यपूर्ण अभ्यास आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवून स्पर्धा परीक्षेत यश मिळवता येते, हे अधोरेखित केले आहे.**

# सातत्यपूर्ण अभ्यासाने यश

पल्लवी चिंचखेडे यांचे वडील रंगकाम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात. आई शिवणकाम करून कुटुंबाला हातभार लावते. अशा बिकट परिस्थितीतून पल्लवीने खेचून आणलेल्या विजयश्रीचे सर्वत्र कौतुक होत आहे. पल्लवी यांची बहीण एका बँकेमध्ये अधिकारी म्हणून कार्यरत असून लहान भाऊ शिक्षण घेत आहे.

पल्लवी यांनी शालेय शिक्षण आनंद प्राथमिक शाळा, अमरावती येथून पूर्ण केले. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण अमरावती येथील विद्याभारती महाविद्यालय व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.टेक केले. विशेष म्हणजे त्यांनी दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्णपणे मराठी माध्यमातून घेतले. तरीही त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची मुलाखत इंग्रजीतून दिली. शिक्षण सुरू असतानाच त्यांना खासगी कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. 'प्रशासकीय अधिकारी' होऊन देशसेवा करावी, या भावनेने प्रेरित होऊन त्यांनी खासगी कंपनीच्या नोकरीचा राजीनामा देऊन दिल्ली गाठली. तेथे युपीएससीचा अभ्यास सुरू केला आणि त्यांना त्यामध्ये यश मिळाले.



पल्लवी देवीदास चिंचखेडे

## शिष्यवृत्तीचा लाभ

घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे नोकरीतून प्राप्त झालेल्या मिळकतीतून दिल्ली येथे स्वत:चा उदरनिर्वाह केला. तेथे एक वर्ष खासगी शिकवणी वर्ग लावले. दुसऱ्या वर्षी त्यांना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (बार्टी) शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षेसाठी त्यांना ५० हजार रुपये, तसेच मुख्य परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर मुलाखतीसाठी २५ हजार रुपये बार्टीतर्फे देण्यात आले. या शिष्यवृत्तीमुळे त्यांना मोठी मदत झाली.

## प्रशिक्षण आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेची तयारी करताना त्यांनी नागपूर येथील महाराष्ट्र शासनामार्फत चालवले जाणारे प्रि-आयएएस ट्रेनिंग सेंटर येथे निवासी शिकवणी वर्गात एक वर्ष प्रशिक्षण घेतले. या काळात त्यांना छात्रवृत्ती मिळाली. येथील ग्रंथालयातील दुर्मीळ संदर्भ पुस्तकांची चांगली मदत झाली. तसेच येथे विषयतज्ज्ञांमार्फत वेळोवेळी आयोजित करण्यात येणाऱ्या व्याख्यानांमुळे अवघड विषयांचे आकलन होण्यास मदत झाली. तसेच दिल्ली येथे महाराष्ट्र सदनमार्फत आयोजित करण्यात आलेल्या 'मॉक इंटरव्ह्यू'चा प्रत्यक्ष मुलाखतीसाठी फायदा झाल्याचे त्यांनी सांगितले.

## संदर्भग्रंथ आणि अध्ययन

पल्लवी यांच्या शालेय जीवनामध्ये 'आयएएस' अधिकारी यांचा अमरावती येथे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाने प्रभावित होऊन आपणही 'आयएएस अधिकारी' व्हायचे आणि समाज हितासाठी कार्य करायचे असे त्यांनी ठरवले. इतरांशी तुलना न करता आपल्या मागील कामगिरीपेक्षा पुढील कामगिरी सरस ठरावी, यासाठी त्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित केले. सुरुवातीला बरेच जणांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा अवघड असल्याचे सांगितले; परंतु योग्य मार्गदर्शन, उत्तम संदर्भग्रंथ, मूळ पुस्तकांचे अध्ययन आणि इच्छाशक्तीमुळे या परीक्षेत यश संपादन करणे अवघड नाही, हा त्यांचा स्वानुभव आहे. २०१७ पासून या परीक्षेची तयारी करत आहे.




खासगी नोकरी करताना अभ्यासाला पुरेसा वेळ देऊ शकत नसल्यामुळे ती नोकरी सोडून त्यांनी पूर्णवेळ अभ्यासावर लक्ष केंद्रित केले.

### वेळेचे नियोजन

शालेय ते महाविद्यालयीन शिक्षणामध्ये त्यांनी नियोजित अभ्यासक्रमाला प्रथम प्राधान्य दिले. शालेय शिक्षण हे तुमच्या भवितव्याचा पाया असतो. या काळातील शिक्षण प्रामाणिकपणे पूर्ण करणे गरजेचे आहे. शालेय अभ्यासक्रमासोबतच त्यांना लहानपणापासून अवांतर वाचनाची आवड आहे. सुरुवातीला बालसाहित्य, पौराणिक साहित्य नंतर साहित्यात मैलाचे दगड ठरलेल्या प्रथितयश लेखकांची पुस्तके, इंग्रजी साहित्यासह अनुवादित पुस्तके वाचनाची आवड पल्लवी यांनी जोपासली. वाचनाने भाषाशैली सुधारतेच शिवाय अभ्यास करताना एखादा संदर्भ चटकन कळतो, असे त्यांचे म्हणणे आहे.



अभ्यास करताना त्यांनी घड्याळाचे काटे पाहून अभ्यास केला नाही. एखादा विषय निवडून तो किती कालावधीत व किती टप्प्यात पूर्ण करायचा याचे मायक्रोप्लॅनिंग केले. प्रत्येक दिवसात किती अभ्यास पूर्ण व्हायला हवा, याचे ध्येय निश्चित केले. स्वतःवर अभ्यासाचे निर्बंध घालून दिल्यामुळे ठरावीक कालावधीत त्या प्रत्येक विषय पूर्ण करू शकल्या.



### छात्रवृत्तीचा लाभ

पल्लवी यांच्यासमोर घरची बेताची परिस्थिती ही मुख्य अडचण होती. या काळात त्यांना बार्टीमार्फत शिष्यवृत्ती मिळाली. तसेच नागपूर येथे महाराष्ट्र शासनामार्फत चालवले जाणारे प्रि-आयएएस ट्रेनिंग सेंटर येथील निवासी शिकवणी वर्गात प्रशिक्षण घेतले. या काळात छात्रवृत्ती मिळाली. याचा लाभ मिळाल्यामुळे त्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकल्या.

### सकारात्मक वृत्ती ठेवा

स्पर्धा परीक्षेची तयारी करताना आपल्या आवडीचे क्षेत्र निवडून आपले ध्येय निश्चित करावे. एकाचवेळी विविध परीक्षांचा अभ्यास करून स्वतःला विचलित करू नका. स्वतःची टिपणे काढा. बाजारात तयार साहित्यावर विसंबून राहू नका. समाज माध्यमांचा अगदी जुजबी वापर करावा. सकारात्मक वृत्ती बाळगा. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना स्वयंप्रेरित असणे अत्यंत गरजेचे आहे. अविरत प्रयत्न आवश्यक आहे. यासाठी तुम्हीच तुमचे परीक्षक व्हा. बदलांचा स्वीकार करण्याची मानसिकता ठेवा. संदर्भग्रंथांचे वाचन वाढवा. दैनंदिन वृत्तपत्रातील महत्त्वाच्या घडामोडींच्या नोंदी घ्या. अनावश्यक वेळ कुठेही खर्च होणार नाही याची दक्षता घ्या. स्पर्धा परीक्षेची तयारी करताना इतरांशी स्वतःची तुलना करू नका. कालपेक्षा आज आपली काय प्रगती झाली, याबाबत स्वतःशी संवाद साधा. परीक्षा देताना आव्हानांचा स्वीकार आनंदाने आणि सकारात्मकतेने करा. स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतरही रोजची आव्हाने संपत नाहीत. यासाठी केवळ स्पर्धेपुरतेच नाही, तर यशस्वी आयुष्य जगण्यासाठी शरीरासह मनाचीही मशागत करा. प्रबळ इच्छाशक्ती, चौफेर वाचन आणि सातत्यपूर्ण अभ्यास केल्यास ही परीक्षा अवघड नाही, असा मोलाचा सल्ला पल्लवी यांनी दिला.

**शब्दांकन : अपर्णा यावलकर,**
माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती

**लोकराज्य या प्रकाशनाची मालकी व अन्य माहिती, यासाठी द्यावे लागणारे निवेदन**
**तक्ता - ४ नियम ८ वा**

| | |
|---|---|
| १) प्रकाशन ठिकाण | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ |
| २) प्रकाशन काल | : मासिक |
| ३) मुद्रकाचे नाव | : अनिल आलूरकर |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| ४) प्रकाशकाचे नाव | : अनिल आलूरकर |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ |
| ५) संपादकाचे नाव | : जयश्री भोज |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ |

मी अनिल आलूरकर असे जाहीर करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

**(अनिल आलूरकर)**
**मुद्रक व प्रकाशक**

**राज्यातील प्रत्येक नोकरीकरिता इच्छुक उमेदवाराला रोजगार मिळवून देणे, प्रत्येक युवक-युवती, महिला, विद्यार्थी यांना कौशल्य प्रशिक्षण देणे, नवनवीन संकल्पनांना जन्म देणाऱ्या स्टार्टअप्सना प्रोत्साहन आणि चालना देणे, उद्योगांमधील बदलत्या तंत्रज्ञानास अनुसरून आयटीआयमधील अभ्यासक्रमांचे तसेच आयटीआयचे आधुनिकीकरण करणे यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाने पुढाकार घेतला आहे.**



# कौशल्याबरोबर रोजगार

**इर्शाद बागवान**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागामार्फत राबवण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांद्वारे राज्यात विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योग यामध्ये डिसेंबर २०२२ मध्ये ४६ हजार १५४ बेरोजगार उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यात आला.

महास्वयं वेबपोर्टल, ऑनलाइन रोजगार मेळावे आदी विविध उपक्रमांद्वारे राज्यात नोकरीसाठी इच्छुक उमेदवार आणि विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योग यांची सांगड घालून रोजगार उपलब्ध करून देण्यात येतो. बेरोजगार उमेदवार आणि उद्योजक यांच्यामध्ये सांगड घालण्यासाठी विभागाने https://rojgar.mahaswayam.gov.in हे वेबपोर्टल सुरू केले आहे. या वेबपोर्टलवर बेरोजगार उमेदवार आपले शिक्षण, कौशल्ये, अनुभव आदी माहितीसह नोंदणी करतात. त्याचबरोबर कुशल उमेदवारांच्या शोधात असलेल्या कंपन्या, उद्योजक, कॉर्पोरेट्स हे सुद्धा या वेबपोर्टलवर नोंदणी करून त्यांना हवे असलेले कुशल उमेदवार शोधू शकतात. नोकरीइच्छुक उमेदवारांनी या वेबपोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. विभागामार्फत जिल्ह्यांमध्ये वेळोवेळी ऑनलाइन रोजगार मेळाव्यांचेही आयोजन करण्यात येते.




## नोंदणीकृत उद्योगांमध्ये नोकरीची संधी


विभागाकडे तसेच महास्वयं वेबपोर्टलवर आतापर्यंत १ लाख १ हजार ३३० इतक्या सार्वजनिक व खासगी उद्योजकांनी नोंदणी केली आहे. यापैकी अनेक उद्योजक आवश्यकतेनुसार त्यांच्याकडील रिक्त पदांची भरती महास्वयंम वेबपोर्टल तसेच कौशल्य विकास विभागाचे ऑनलाइन मेळावे आदी उपक्रमांमधून वेळोवेळी करतात. त्यामुळे नोकरीइच्छुक उमेदवारांना कौशल्य विकास विभागाच्या उपक्रमांमधून नोकरी मिळवण्यासाठी चांगले व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

मुंबईमध्ये नुकतेच एलफिन्स्टन टेक्निकल हायस्कूल, भायखळा, बोरिवली, गोरेगाव, जुहू, पालघर आणि कल्याण येथे रोजगार मेळावे घेण्यात आले. एलफिन्स्टन येथील मेळाव्यात विविध कंपन्या, उद्योग यामध्ये ८ हजार ४४८, भायखळा येथील मेळाव्यात ८ हजार ६०८, तर कल्याण येथील मेळाव्यात १३ हजार १०९ पदे उपलब्ध करून देण्यात आली. हजारो विद्यार्थ्यांनी या मेळाव्यात सहभाग घेऊन नोकरीसाठी विविध कंपन्यांकडे मुलाखती दिल्या. या मेळाव्यात अगदी पाचवी पास उमेदवारापासून बीई, एमबीए अशा विविध पदवीप्राप्त उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली. पाचवी पास विद्यार्थ्यांसाठी डिलिव्हरी एक्झिक्युटिव्हच्या कामासाठी ३ हजार पदे उपलब्ध करून देण्यात आली. होमकेअर नर्ससाठी एका कंपनीने २०० पदांसाठी मुलाखती घेतल्या.

## रोजगार मेळाव्यांसाठी भरीव तरतूद

उद्योग, कारखाने, खासगी आस्थापना, कॉर्पोरेट संस्था यांमधील रोजगार भरतीसाठी वेळोवेळी रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येते. यासाठी भरीव आर्थिक

## कौशल्य विकासावर भर



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युवकांमधील नवसंकल्पनांना चालना देण्यासाठी कौशल्य विकासाची सुरुवात केली. राज्यामध्येही त्यानंतर स्वतंत्र कौशल्य विकास विभाग सुरू करण्यात आला. मागील काही वर्षांत आपला देश विकासविषयक विविध क्षेत्रात यशस्वी वाटचाल करत आहे. देशामध्ये युवकांमधील नवनवीन संकल्पनांवर आधारित स्टार्टअप्स, युनिकॉर्न्स यांना चालना देण्यात येत आहे. महाराष्ट्र ही देशाची स्टार्टअप कॅपिटल आहे. देशात नव्याने सुरू झालेल्या ४२ युनिकॉर्नपैकी ११ युनिकॉर्न महाराष्ट्रातील आहेत. रजिस्टर्ड स्टार्टअप्समधील सर्वाधिक स्टार्टअप्स महाराष्ट्रातील आहेत. स्टार्टअप्स आणि युनिकॉर्न्सना चालना देण्यासाठी राज्यात विविध सवलती, योजना यांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यातील अगदी दुर्गम भागातील युवक-युवतींकडूनही स्टार्टअप्स विकसित केले जात आहेत. राज्यात आयटीआयच्या अभ्यासक्रमामध्ये कालानुरूप बदल करण्यात येत असून त्यांचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. आयटीआयमध्ये अनेक विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांना उद्योजकतेची जोड देणे, आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे याअनुषंगाने बदल करण्यात येतील. महिला, विद्यार्थी यांच्या कौशल्य विकासावरही भर देण्यात येत आहे. राज्यातील प्रत्येक नोकरीइच्छुकाला रोजगार मिळावा यावर तसेच महिला, युवक, विद्यार्थी यांच्या कौशल्य विकासावर भर देण्यात येत आहे.

**- मंगल प्रभात लोढा,** मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग

तरतूद करण्यात आली असून विभागीय तसेच जिल्हास्तरावरील प्रत्येक मेळाव्यासाठी ५ लाख रुपयांपर्यंत खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. आतापर्यंत विभागीय स्तरावरील रोजगार मेळाव्यासाठी १ लाख रुपये, तर जिल्हास्तरावरील रोजगार मेळाव्यासाठी ४० ते ६० हजार रुपयांपर्यंत खर्च करण्याची मर्यादा होती.

## शालेय विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण

बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, शालेय शिक्षण विभाग आणि बृहन्मुंबई महापालिका यांच्यामध्ये नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार करण्यात आला.

बृहन्मुंबई महापालिकेच्या निवडक शाळांमधील वय वर्षे १५ वरील मुलांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रामध्ये कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येईल. हा उपक्रम प्रायोगिक तत्त्वावर एकूण १ हजार १४६ शाळांपैकी टप्प्याटप्प्याने २४९ शाळांमधील नववी ते दहावीतील ४१ हजार ७७४ इतक्या विद्यार्थ्यांकरिता सुरू करण्याचे उद्दिष्ट आहे. त्याचबरोबर टप्प्याटप्प्याने सहावी ते आठवीतील ९६ हजार ९२२ विद्यार्थ्यांनाही या प्रशिक्षणाचा फायदा देता येईल असा मानस आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना कौशल्य विकासविषयक प्रशिक्षण प्रदान करण्यात येणार आहे. जागतिकीकरण आणि संगणकीकरणामुळे तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. हे बदल आत्मसात करून भविष्यातील तांत्रिक बदलांना अनुकूल ठरणारी पिढी घडवणे आवश्यक आहे. सद्यःस्थितीत रोजगार उपयोगी ठरणारे प्रशिक्षण घेणे गरजेचे झाले आहे. अशा परिस्थितीत युवकांमध्ये कौशल्य प्रशिक्षणाप्रती आवड निर्माण होण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर हा कार्यक्रम राबवण्यात येईल. नवीन शैक्षणिक वर्षापासून महापालिकांमधील निवडक शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने हा उपक्रम सुरू करण्यात येईल.



## महिलांसाठी प्रशिक्षण

मुंबई उपनगर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व रेवती रॉय फाऊंडेशन यांच्यामार्फत महिलांसाठी गॅस स्टेशन, पेट्रोल पंप सेवक या अभिनव अभ्यासक्रमाचा नुकताच प्रारंभ करण्यात आला. यातून प्रशिक्षण घेतलेल्या महिलांना थेट गॅस स्टेशन, पेट्रोल पंप येथे रोजगार उपलब्ध होईल. या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत १०० महिला लाभार्थींना प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षणाचा कालावधी ७ दिवसांचा असून संस्थेमार्फत ९० दिवसांचे ऑन जॉब ट्रेनिंगही देण्यात येईल. प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर

प्रशिक्षणार्थींना मासिक १२ ते १५ हजार रुपये वेतनावर भारत सरकारच्या अखत्यारीतील पेट्रोलियम कंपन्यांच्या गॅस स्टेशन, पेट्रोल पंप येथे नियुक्त करण्यात येईल.

## १ लाख २१ हजार रोजगारांसाठी करार

राज्यातील युवक-युवतींना रोजगाराची उपलब्धता व्हावी, यासाठी राज्यातील ४४ नामांकित उद्योजक, कॉर्पोरेट संस्था, औद्योगिक संघटना, प्लेसमेंट एजन्सिज यांच्यासमवेत सामंजस्य करार करण्यात आले. या करारामार्फत राज्यातील १ लाख २१ हजार युवक, युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, शिक्षण मंत्री दीपक केसरकर, कौशल्य विकास विभागाच्या प्रधान सचिव मनीषा वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.

## मॉडेल आयटीआय

जागतिक बँकेच्या तांत्रिक आणि आर्थिक सहकार्यातून राज्यातील कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागात विविध प्रकल्प, उपक्रम राबवण्याचे प्रस्तावित आहे. या प्रकल्पांतर्गत प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान १ मॉडेल आयटीआय आणि राज्यात मुलींसाठी १७ मॉडेल आयटीआय असे एकूण ५३ मॉडेल आयटीआय निर्माण करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर सर्व सुविधांनी युक्त असे जागतिक स्किल सेंटर उभारण्यात येणार आहे. एकात्मिक कौशल्य भवन उभारण्याचेही प्रस्तावित करण्यात आले आहे.

मागील काही वर्षांपासून आयटीआयच्या विविध अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत असून अधिकाधिक विद्यार्थी कौशल्याधारित प्रशिक्षण घेऊन रोजगार किंवा स्वयंरोजगार करत आहेत. आता उद्योगांमधील बदलते नवनवे तंत्रज्ञान आणि त्या अनुषंगाने आयटीआयच्या अभ्यासक्रमांमध्ये आवश्यक बदल करण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाने पुढाकार घेतला असून, यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडून 'सुचवा तुमच्या आवडीचे कौशल्य अभ्यासक्रम' ही राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात आली. याअंतर्गत वेगळ्या हटके संकल्पना सुचवणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात येणार आहेत. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला आहे.



अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील मुलामुलींसाठी मुंबई येथे विभागस्तरीय उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) सुरू होत असून यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत मुंबई उपनगर जिल्ह्यात चेंबूर येथे नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. संविधान दिनी या इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. या आयटीआयमध्ये वीजतंत्री, तारतंत्री, मेकॅनिक, ऑटो इलेक्ट्रिकल अॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स, इंटेरिअर डिझाईन अॅण्ड डेकोरेशन, प्रशीतन व वातानुकूलित टेक्निशियन, ड्रॉफ्ट्समन ऑर्किटेचर, लेदर गुड्स मेकर, फूटवेअर मेकर, आयओटी टेक्निशियन अशा १० व्यवसाय अभ्यासक्रमांच्या प्रत्येकी २ तुकड्या ४४० प्रशिक्षणार्थ्यांकरिता सुरू करण्यात येणार आहेत. या व्यवसायातील प्रवेश शैक्षणिक वर्ष २०२३- २४ पासून डी. जी. नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त करून सुरू करण्यात येणार आहेत.

## कौशल्य विद्यापीठ स्थापन

कौशल्य विकासाच्या कार्यक्रमाला अधिक बळकटी देण्यासाठी राज्यात महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. या विद्यापीठात नवनवीन अभ्यासक्रम सुरू होत आहेत. यामध्ये प्रामुख्याने आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सिक्युरिटी, मशीन लर्निंग, बिझनेस इंटेलिजन्स आणि इनोव्हेशन, बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (बीबीए), न्यू व्हेंचर मॅनेजमेंटमधील टेक्नॉलॉजी डोमेनमधील अभ्यासक्रम यांचा समावेश आहे. अशा विविध अभ्यासक्रमांसह विद्यापीठाचा शैक्षणिक प्रारंभ करण्यात आला आहे.

विद्यापीठ आणि रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडिया (आरएआय) यांच्या दरम्यान बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (बीबीए) या अभ्यासक्रमासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना या उपक्रमाद्वारे बिझनेस आणि रिटेलचे आवश्यक ज्ञान आणि उद्योगाचा अनुभव मिळेल.

## शासनामध्ये नवनवीन संकल्पना

राज्य शासनाच्या विविध विभागात नवनवीन संकल्पनांचा वापर करण्याच्या अनुषंगाने स्टार्टअप सप्ताह उपक्रम दरवर्षी राबवण्यात येतो. यंदाच्या सप्ताहात देशभरातील स्टार्टअप्स सहभागी झाले होते. यामधील निवडक उत्कृष्ट स्टार्टअप्सना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या विजेत्यांना शासनाच्या विविध विभागांमध्ये काम करण्यासाठी प्रत्येकी १५ लाख रुपयांचे कार्यादेश देण्यात येतील. याशिवाय राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये नुकतीच महाराष्ट्र स्टार्टअप आणि नावीन्यता यात्रा संपन्न झाली. यामधील उत्कृष्ट स्टार्टअप्सना सन्मानित करण्यात आले. कृषी, शिक्षण, गव्हर्नन्स, पर्यावरण, ई-कॉमर्स, रोबोटिक्स, स्मार्ट इन्फ्रा आणि मोबिलिटी, शाश्वतता, आरोग्य आदी क्षेत्रातील स्टार्टअप्स युवक-युवतींनी सादर केले. प्रथम विजेत्या तसेच सर्वोत्तम महिला स्टार्टअप्सना प्रत्येकी १ लाख रुपयांचे, तर द्वितीय विजेत्या स्टार्टअप्सना ७५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**जागतिक स्तरावर वातावरणीय बदलामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. अग्नी, जल, वायू, आकाश आणि पृथ्वी या पाच पंचमहाभूतांच्या रक्षणाची जबाबदारी सर्वसामान्य लोकांना होणे आवश्यक आहे. वैश्विक पर्यावरण संवर्धनासाठी श्री क्षेत्र सिद्धगिरी महासंस्थानाच्या वतीने २० ते २६ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत कणेरी मठ येथे सुमंगलम् पंचमहाभूत लोकोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी हा महोत्सव अत्यंत उपयुक्त ठरला आहे. या महोत्सवाचा थोडक्यात आढावा...**

# पंचमहाभूत लोकोत्सव

**सुनील सोनटक्के**

सध्या जागतिक तापमानवाढ आणि बदलत्या हवामानामुळे होणाऱ्या दुष्परिणामांना आपल्या सर्वांना सामोरे जावे लागत आहे. महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने आपलं राज्य, देश व जागतिक स्तरावर पर्यावरण संरक्षणाची जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी कणेरी मठ येथे घेण्यात आलेला सुमंगलम् पंचमहाभूत लोकोत्सव हा अत्यंत उपयुक्त ठरला आहे. पर्यावरण संरक्षणासाठी पूर्णपणे शासनावर अवलंबून न राहता प्रत्येक व्यक्तीने पंचमहाभूतांच्या संरक्षणासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

वातावरणातील बदल रोखण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक देश, संघटना एकत्रित येऊन प्रयत्न करत आहेत. जल, वायू, ध्वनी प्रदूषणाचे गंभीर परिणाम होत आहेत. सध्याचे बदललेले निसर्गचक्र सर्वांसाठीच चिंतादायक ठरत आहे. निसर्गचक्र व्यवस्थित चालण्यासाठी पर्यावरण संरक्षण होणे काळाची गरज आहे.

## पर्यावरणपूरक जीवनशैली

संयुक्त राष्ट्राच्या २६व्या हवामान बदल परिषदेला संबोधित करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मिशन लाईफ (पर्यावरणासाठी जीवनशैली) स्वीकारण्याचे आवाहन संपूर्ण जगाला केले आहे. जोपर्यंत लोकांची जीवनशैली पर्यावरणपूरक होत नाही, तोपर्यंत पर्यावरणाचा धोका कायम असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले होते. आज संपूर्ण जग अमेरिकन व पाश्चिमात्य जीवनशैलीचा अंगीकार करत आहे. या जीवनशैलीमध्ये माणूस स्वतःला निसर्गापासून वेगळा समजतो. तसेच पृथ्वीवर उपलब्ध असलेली सर्व संसाधने केवळ आपल्या उपभोगासाठी आहेत, ही वृत्ती माणसाला अधिक बळकटी देते. अशा सर्व परिस्थितीत माणसाची आधुनिक जीवनशैली पर्यावरणपूरक बनवणे हे फार कठीण आहे.

ज्या पंचमहाभूत तत्त्वांपासून हे निसर्गचक्र बनलेले आहे, त्याविषयी जनजागृती करणे, त्याप्रमाणेच निसर्ग आणि मानव हे दोन भिन्न नसून एकच आहेत निसर्गाची हानी म्हणजे पर्यावरणाची हानी. पर्यावरणाला हानी पोहोचवणाऱ्या जीवनशैलीत बदल करण्यासाठी 'सुमंगलम् पंचमहाभूत लोकोत्सव' हा या प्रक्रियेचा पहिला टप्पा आहे.



## लोकोत्सवाचा मुख्य उद्देश

श्री क्षेत्र सिद्धेश्वर संस्थानने पर्यावरण जनजागृतीचे फार मोठे काम होती घेतले आहे. भारतीय परंपरा, जीवनशैली, ग्रामीण समाजजीवन इ.मध्ये असणाऱ्या पंचमहाभौतिक सिद्धांतांना पुस्तक, चित्रपट, मूर्तिकला यांची माहिती संकलित करणे, तसेच ग्रामीण समाजाला वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आधुनिक कार्यपद्धतीचे आकलन व्हावे, हा या लोकोत्सवाचा मुख्य उद्देश आहे.

## पंचमहाभूतांचे संतुलित प्रमाण

पृथ्वी, आकाश, जल, अग्नी, वायू आणि आकाश असे पंचमहाभूतांचे प्रमाण ठरलेले आहे. जागतिक तापमानवाढ (ग्लोबल वॉर्मिंग), दुष्काळ, पावसाची अनियमितता यामुळे निसर्गचक्रातील बदल मोठ्या प्रमाणात झाला आहे. पर्यावरणाचा समतोल राहण्यासाठी पंचमहाभूतांचे जे मूळ स्वरूप आणि प्रमाण होते ते बदलत गेल्याने पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. पर्यावरणाच्या संतुलनासाठी आपल्या सर्वांना सजग होणे गरजेचे आहे.

## पंचगंगेची महाआरती

पंचगंगा नदीच्या घाटावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, श्री काडसिद्धेश्वर स्वामी व मान्यवरांच्या हस्ते महाआरती करून या लोकोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी भव्य शोभायात्राही या वेळी काढण्यात आली होती.

## सेंद्रिय शेती अभियान

सेंद्रिय शेतीमध्ये खर्च कमी उत्पादन जास्त आहे. राज्यात पर्यावरणपूरक अशा सेंद्रिय शेतीचे प्रमाण वाढण्यासाठी प्रयत्न केले आहेत. राज्य शासनाने २५ लाख हेक्टरवर सेंद्रिय शेती करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. रासायनिक खतांना जशी

सबसिडी दिली जाते, तशी सेंद्रिय शेती आणि खतांकरिता राज्य शासन प्रयत्न करत आहे.

## पर्यावरण संरक्षण चळवळ

भारत हा कृषिप्रधान देश आहे. नदीला, मातीला माय मानणारी आपली संस्कृती असून या संस्कृतीचे जतन आणि रक्षण करणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. सुमंगलम् पंचमहाभूत लोकोत्सवातून पर्यावरण व संस्कृती रक्षणाची चळवळ पुन्हा जोमाने सुरू होण्यास नक्की मदत होणार आहे. भविष्यात सेंद्रिय खतांचा वापर वाढवणे गरजेचे आहे. नैसर्गिक शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी शासनाकडून आवश्यक उपाययोजना केल्या आहेत. या महोत्सवामुळे पर्यावरण संरक्षणाचा संदेश घरोघरी जाण्यास मदत होणार आहे. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर ३३ लाख झाडे लावण्याचे राज्य शासनाचे नियोजन आहे.

> अध्यात्म, शास्त्र आणि नैसर्गिक तत्त्व यांची सांगड घालून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी हा लोकोत्सव फायद्याचा ठरणार आहे. या लोकोत्सवातून पर्यावरण चळवळ उभी राहील.
>
> **- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

## अपारंपरिक ऊर्जा स्रोत

अपारंपरिक ऊर्जा स्रोतामध्ये ग्रीन हायड्रोजन, सोलार एनर्जी, सूर्यप्रकाश, वारा लाटा, भूगर्भीय उष्णता यांचा समावेश होतो. पर्यावरणाचे संरक्षण व प्रदूषणमुक्तीसाठी अपारंपरिक ऊर्जा स्रोतातून ऊर्जा उत्पादन वाढवण्यावर शासनाने भर दिला आहे. पर्यावरण रक्षणासाठी शासनाकडून वेगवेगळ्या स्तरावर प्रयत्न केले जात आहेत.

## पंचमहाभूतांचे महत्त्व

'जाणूया पंचमहाभूतांचे महत्त्व जपूया त्यांचे अस्तित्व' हा संदेश जगभर पसरवण्याचे काम काडसिद्धेश्वर स्वामी करत आहेत. 'पर्यावरण रक्षणाची स्वत:पासून सुरुवात करूया, निसर्गाची हानी थांबवूया व पर्यावरण रक्षण हाच परमार्थ समजूया'. आकाश, वायू, अग्नी, जल, पृथ्वी या पंचमहाभूतांचा मानवाकडून होणारा दुरुपयोग आणि त्यांच्या संरक्षणासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती दालनांमधून देण्यात आली होती. भारतीय संस्कृतीच्या अनुषंगाने पंचमहाभूत तत्त्वे खूप महत्त्वाची आहेत.

## दृष्टिक्षेपात लोकोत्सव

- महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश व गुजरात इ. राज्यातील लोकांचा सहभाग
- विविध सांप्रदायाचे संत-महात्मा योगांचा सहभाग
- व्यावसायिकांचे संमेलन व भागीदारी
- सामाजिक, सांस्कृतिक, आणि शैक्षणिक संस्थांचा सहभाग
- युवा, महिला, शेतकरी, उद्योजक यांच्यासह सर्वांचा सक्रिय सहभाग
- पंचमहाभूतांचे सर्व पाच तत्त्वांसह आरोग्य आणि रिसायकलिंग विषयावर गॅलरी प्रदर्शन
- स्वास्थ्य, शिक्षा, कृषी, उद्योग इ.ची माहिती
- कृषी पद्धतीमध्ये वेगवेगळी पिके, देशी बियाणे यांचे प्रत्यक्ष प्रदर्शन
- जैविक खत, जैविक कीड नियंत्रक व लघु आणि कृषी उपकरणांचे प्रदर्शन
- देशी प्रजातीच्या गाई, म्हशी, बकऱ्या, घोडे, गाढव, कुत्रे व मांजर इ. पशूंचे प्रदर्शन
- पारंपरिक जीवन प्रदर्शनात भारताची प्राचीन गुरुकूल व्यवस्था

## पशू प्रदर्शन

या महोत्सवात पशुप्रदर्शनासोबतच गाढवांचे प्रदर्शन भरवण्यात आलेले होते. देशाच्या विविध भागातून आलेल्या गाढवांचे प्रदर्शन येथे आलेल्या हजारो लाखो नागरिकांसाठी आकर्षणाचे केंद्र होते. देशात कदाचित प्रथमच असे गाढवांचे प्रदर्शन भरवण्यात आलेले होते.

## विविध लोकोपयोगी स्टॉल

या महोत्सवात हजारो स्टॉल्स लावले होते. त्यामध्ये शासनाच्या विविध विभागांच्या महत्त्वपूर्ण लोककल्याणकारी योजनांची माहिती देणारे तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या अधिनस्त असलेल्या महिला बचतगटांचेही स्टॉल उभारले होते.

## पंचमहाभूतांचे भव्य दालन

पंचमहाभूतांची निर्मिती, त्यांचे उपयोग, मानवाकडून पंचमहाभूतांचा होणारा दुरुपयोग आणि त्यांच्या संरक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या उपाययोजनांची माहिती दालनांमध्ये देण्यात आली होती. त्रिमिती मॉडेल, माहितीपत्रक, ध्वनी व प्रकाश व्यवस्थेच्या माध्यमातून पंचमहाभूतांचे महत्त्व अत्यंत उत्कृष्टपणे दाखवण्यात आले होते.

## ५२ समित्यांची स्थापना

लोकोत्सव यशस्वी होण्यासाठी जिल्हा प्रशासनाने ५२ समित्यांची स्थापना केली होती. या समितीमध्ये संबंधित विभागाचे विभागप्रमुख तसेच त्यांच्या अधिनस्त अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करून श्री सिध्दगिरी महासंस्थान यांचे प्रतिनिधी प्रत्येक समितीवर नियुक्त करण्यात आले होते.

## ३० लाख नागरिकांचा सक्रिय सहभाग

सुमंगलम् पंचमहाभूत लोकोत्सवात पर्यावरण संवर्धनाचा जागर झाला. यामध्ये सर्व नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. या लोकोत्सवाला महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, गुजरात या राज्यातून व परदेशातूनही नागरिकांनी उपस्थिती लावली होती.

पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी कणेरी मठ येथे घेण्यात आलेला सुमंगलम् पंचमहाभूत महोत्सव खऱ्या अर्थाने महत्त्वपूर्ण ठरल्याचे हे द्योतक आहे.

जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर.

**महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराजांची यंदा ३९३वी जयंती साजरी झाली. या निमित्ताने पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील जुन्नर शहरात शिवजयंती महोत्सवाचे आयोजन केले होते. शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने पुन्हा एकदा हिंदवी स्वराज्याची भावना आणि आपले वैभव, लोकसंस्कृती, ऐतिहासिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाकडून केला गेला. शिवनेरी, रायगड, सिंधुदुर्ग यांसारख्या महत्त्वाच्या गडकिल्ल्यांकडे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी राज्य शासन विशेष प्रयत्न करत आहे.**

# हिंदवी स्वराज्य महोत्सव

**संध्या गरवारे–खंडारे**

पर्यटन विभागामार्फत राज्यातील महत्त्वाच्या उपक्रमांचे पर्यटन वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. पर्यटन वाढीसाठी राज्य शासनाकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत. यंदाच्या पर्यटन वेळापत्रकांतर्गत 'शिवजयंती महोत्सव' २०२३ चे आयोजन पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील जुन्नर शहरात केले होते. वर्षभर शिवाजी महाराजांचा इतिहास, त्यांचे विचार, त्यांचे पराक्रम जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न तसेच हिंदवी स्वराज्याची भावना सतत जागृत ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. या महोत्सवात राज्यभरातील शिवप्रेमी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळामुळे शिवनेरी किल्ल्यास महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये वेगळेच अन् अढळ स्थान आहे.

## शिवकालीन गाव महोत्सव

शिवकालीन गाव हे या महोत्सवाचे खास आकर्षण ठरले होते. बोलक्या गावाप्रमाणे घराच्या खिडक्या, दरवाजे, घरासमोरील अंगण अगदी हुबेहुब बोलके गाव दाखवण्याचा प्रयत्न या सोहळ्यात करण्यात आला होता. या वेळी जवळपास एख लाख शिवप्रेमी सहभागी झाले होते. शिवकालीन खेडे आणि त्या वेळची लोकांची जीवनपद्धती कशी होती हे नव्या पिढीला समजावे या उद्देशाने उत्सवाचे आयोजन केले होते. यामध्ये शिवकालीन गवताची घरे, लोहारकाम, कैकाडी, कुंभारकाम इत्यादी व्यवसायदेखील उभे करण्यात आले होते.

या वेळी 'शिवजन्मभूमी जुन्नर' हा सेल्फी पॉइंट आणि शिवकालीन बाजारपेठ लोकांच्या आकर्षण बिंदू ठरला. आदिवासी तारपा नृत्य, वासुदेव गोंधळी परंपरा, दांडपट्टा, तलवारबाजी आदींचे सादरीकरण ही या वेळी करण्यात आले. जिल्हा प्रशासन पुणे यांच्या वतीने जुन्नर येथे ३०० महिला बचतगटांचे स्टॉल्स लावण्यात आले होते. महिला बचतगटांनी उत्पादित केलेले मसाले, विविध धान्यांची पीठे विविध गृहपयोगी वस्तूंचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या वेळी http://www.hindaviswarajya.info/ या संकेतस्थळाचे अनावरणदेखील करण्यात आले.



दरवर्षी आपण आपल्या राजाचा आशीर्वाद घेण्याकरिता शिवनेरीवर येतो. 'शिवनेरी' येथे शिवप्रभूंचे दर्शन घ्यायला कोणालाही कसलाही अडथळा, बंदी नसेल. शिवजन्मोत्सवाचे अधिक चांगल्या आणि उत्तम प्रकारे आयोजन करण्यात येईल. गडकिल्ल्यांचा इतिहास जपण्याचे काम शासन पूर्ण जबाबदारीने करेल. किल्ले शिवनेरीच्या किल्ल्याच्या विकासासाठी राज्य शासनाचा पूर्ण पाठिंबा असणार आहे.

**- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**



## मान्यवरांची उपस्थिती

शिवनेरी गडावर जन्मोत्सवाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यटनमंत्री मंगल प्रभात लोढा, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, छत्रपती संभाजीराजे भोसले, आमदार प्रवीण दरेकर, अतुल बेनके यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. 'अतिथी देवो भव' या संस्कृतीचे जतन करत गडावर महिला वर्गाच्या वतीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मान्यवर यांचे कुंकू

तिलक करून स्वागत करण्यात आले. या मान्यवरांच्या हस्ते या सोहळ्याचे उद्घाटन पार पडले. सनई, चौघडा, ढोल-ताशाचा आवाज आणि युवतींनी सादर केलेल्या खास कलाविष्कारातून घुमलेल्या आवाजाने शिवनेरी गडाचा निनाद जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सवानिमित्त खास सजावट केलेला पाळणा अधिक लक्षवेधी ठरला.

## विक्रमी उपस्थिती

महाराष्ट्र शासनाचा पर्यटन विभाग आणि जिल्हा प्रशासन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने १८ ते २० फेब्रुवारी दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, त्यांनी उभारलेले गडकोट किल्ले, त्यांचा इतिहास या निमित्ताने पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या सोहळ्यामधून होत आहे. या सोहळ्याला जवळपास एक लाख शिवप्रेमी उपस्थित होते. लक्षवेधी ठरलेल्या या सोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील मोठ्या संख्येने शिवप्रेमी सहभागी झाले होते. शिवप्रेमींच्या उपस्थितीने या सोहळ्याचा आनंद द्विगुणित झाला. अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने शिवप्रेमींनी सोहळ्यामध्ये हजेरी लावली. त्यामुळे गडाला एक देखणे रूप प्राप्त झाले होते.

## शिवकालीन शस्त्रकला

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी जोपासलेल्या शिवकालीन कलेला ऐतिहासिक महत्त्व आहे. शिवकालीन शस्त्रकला ही नामांकित शस्त्रकला आहे. शिवकाळात शस्त्रांना अनन्यसाधारण महत्त्व होते. तलवारबाजी, ढाल-कुकरी, वाघनखे, दांडपट्टा चालवणे, चमकदार तलवारी फिरवून महिलांनी जनसमुदायांचे लक्ष वेधून घेतले. तसेच सहभागी शिवप्रेमींनी शिवकालीन संस्कृतीला उजाळा देत नृत्यविष्कारही सादर केले. या माध्यमातून अनेक युवांना शिवकालीन शस्त्र आणि कलेचे दर्शन घडले. वडज (ता. जुन्नर) धरणाच्या जलाशयालगतच्या मैदानावर अद्ययावत सोयी सुविधायुक्त वातानुकूलित ३० तंबू असलेली टेंट सिटी उभारण्यात आली होती.

## 'जाणता राजा' : एक अनोखा अनुभव

अष्टपैलू, आदर्श राज्यकर्ता, थोर सेनानी, लोकहितदक्ष, धर्माभिमानी आणि चारित्र्यसंपन्न असा जाणता राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. महोत्सवाच्या दरम्यान 'जाणता राजा' या नाटकाचे आयोजन करण्यात आले होते. या नाटकातून हिंदवी स्वराज्य निर्माण करण्यापर्यंतचा सर्व इतिहास अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने दाखवण्यात आला. सुप्रसिद्ध गायक, अशोक हांडे दिग्दर्शित 'मराठी बाणा' कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकून घेतली. या कार्यक्रमातून महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन डोळ्यासमोर उभे केले. या निमित्ताने महाराष्ट्राचा सांस्कृतिक, ऐतिहासिक वारसा पुन्हा प्रेक्षकांना अनुभवता आला.

## शिवनेरीच्या विकासासाठी १०० कोटी

शिवनेरी किल्ल्याचा आणि परिसराचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा पर्यटन विभाग प्रयत्नशील आहे. शिवनेरी महोत्सवादरम्यान शिवनेरी किल्ल्याच्या विकासासाठी १०० कोटी रूपये देणार असल्याची घोषणा या वेळी करण्यात आली. शिवनेरीच्या विकासासाठी आतापर्यंत २०१४ ते २०१९ पर्यंत 'पर्यटन धोरण'- २०१६ अंतर्गत १० कोटी १५ लाख रुपये दिले आहेत. राज्य सरकारने या परिसरातील कृषी पर्यटन केंद्राना नोंदणी प्रमाणपत्रही प्राप्त करून दिली आहेत. जुन्नर तालुका हा २१ मार्च २०१८ मध्ये विशेष पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित केलेला आहे. पर्यटन धोरण २०१६ अंतर्गत विशेष पर्यटन क्षेत्रांना खास सवलतीही देण्यात आल्या आहेत. किल्ल्याच्या पायथ्यालगत पोहोच रस्ता, पर्यटकांसाठी माहिती केंद्र, पार्किंग, माहिती फलक, स्वच्छतागृह, श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनपटावर आधारित माहिती केंद्र, लाईट आणि शो, कठड्याची दुरुस्ती या कामांना प्राधान्य देण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. पर्यटनाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यांना खूप महत्त्व आहे. ऐतिहासिक स्थळांना पर्यटक मोठ्या प्रमाणात भेटी देत असतात हे लक्षात घेऊन कायमस्वरूपी 'टेंट सिटी' आणि 'शिवकालीन गाव'देखील उभारण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे.

## भविष्यकालीन योजना

नव्या पिढीपर्यंत गडकिल्ले आणि इतिहास पोहोचावा यासाठी शाळा व महाविद्यालयांच्या सहली आयोजित करणे, एनसीसी, एनएसएस आणि एमसीसीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची शिबिरे गडकिल्ल्यावर आयोजित करणे, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या मदतीने वनसंवर्धन करणे, स्थानिक ठिकाणी निवास न्याहारी योजनांना प्रोत्साहन देणे, राज्यातील किल्ल्यांची आंतरराज्य आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी करणे यांसारख्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

## वर्षभर बृहद् कार्यक्रम

यंदा जून महिन्यात शिवराज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यासंदर्भात महाराष्ट्र राज्यात बृहद् असे कार्यक्रम राज्य सरकारने हाती घेतले असून, एक वर्ष सातत्याने शिवछत्रपतींचा इतिहास, विचार आणि शिवकालीन वैभव जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम सरकारच्या माध्यमातून पर्यटन विभाग करणार आहे.



छत्रपती शिवराय होते, म्हणून आपण स्वातंत्र्य उपभोगत आहोत, मानाने जगतो आहोत. शासनाने सर्व जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून दरवर्षी तीन टक्के निधी गडकिल्ल्यांच्या संवर्धनासाठी राखून ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे. किल्ल्यांच्या वेगळ्या निधीव्यतिरिक्त हा निधी असल्याने संवर्धनासाठी निधीची कमतरता नसेल. शिव जन्मस्थानाच्या दर्शनाबाबत योग्य नियोजन करण्यात येईल.

**- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

विभागीय संपर्क अधिकारी

**राज्य शासन विविध प्रकल्पांना आणि योजनांना निधी मंजूर करत कामांना गती देत आहे. महसूल परिषदेचे उद्घाटन, गृहनिर्माण प्रकल्पाचे भूमिपूजन, वेब पोर्टलचे उद्घाटन, तृतीयपंथीयांसाठी विशेष कक्ष, वॉटर टॅक्सी सेवाचा शुभारंभ, कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन यासह विविध पुरस्कारांच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. तसेच विविध समितींच्या बैठका, मंत्रिमंडळातील सदस्यांनी विविध विभागांचा आढावा घेत राज्याच्या विकासाला चालना दिली आहे. याविषयी थोडक्यात आढावा..**

# पाऊल पडते पुढे

## ‘वंदे भारत’ एक्स्प्रेस : विकासाचे प्रतीक

रेल्वे वाहतूक ही भारताचा गतिमान विकास आणि सुखकर प्रवास यांचे प्रतिबिंब आहे. आपल्या देशाला जोडण्यात भारतीय रेल्वेची मध्यवर्ती भूमिका राहिली असून ‘वंदे भारत’ एक्स्प्रेस ही भारताच्या विकासाचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्थानकावर मुंबई ते सोलापूर आणि मुंबई ते साईनगर शिर्डी शहरांदरम्यान धावणाऱ्या ‘वंदे भारत’ एक्स्प्रेस या वेगवान रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ केले. तसेच प्रधानमंत्री यांच्या हस्ते पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणाऱ्या प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आले. याअंतर्गत सांताक्रूझ-चेंबूर जोडरस्त्यावरील वाकोला ते कुर्ला व एमटीएनएल ते एलबीएस उड्डाणपूल उन्नत मार्गाचे आणि मालाडमधील कुरार गाव भुयारी मार्ग प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी आयोजित कार्यक्रमास विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार प्रवीण दरेकर, आमदार आशिष शेलार, आमदार राम कदम यांच्यासह लोकप्रतिनिधी, संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



मुंबई ते सोलापूर आणि मुंबई ते साईनगर शिर्डी शहरांदरम्यान धावणाऱ्या वंदे भारत एक्स्प्रेस या वेगवान रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी मान्यवर.



**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

## ‘अलजमिया-तूस-सफिया’ अरेबिक शैक्षणिक संस्थेच्या इमारतीचे लोकार्पण

युवा पिढीला पुढे नेणारी धोरणे शासनाकडून राबवली जात आहेत. कोणत्याही समाजघटकातील विद्यार्थी शिक्षणात मागे पडू नये, यासाठी शिक्षण धोरणात बदल करून मातृभाषेतून शिक्षणाला महत्त्व दिले जात आहे, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले.

अंधेरी - मरोळ येथील ‘अलजमिया-तूस - सफिया’ अरेबिक शैक्षणिक संस्थेच्या उद्घाटनप्रसंगी प्रधानमंत्री श्री. मोदी बोलत होते. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, ‘अलजमिया-तूस-सफिया’चे कुलगुरू डॉ. सय्यदन मुफद्दल सैफउद्दीन, दाऊदी बोहरा समाजाचे शहजादा अलि असगर

कलीमऊद्दीन, शहजादा कियदजोहर इज इज्जुद्दीन, दाऊदी बोहरा समाजाचे नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## सामंजस्य कराराचे नूतनीकरण

भारत आणि जपान यांच्यातील संबंध पूर्वापार आहेत. ते अधिकाधिक दृढ होण्यास या करारामुळे मदतच होणार आहे. महाराष्ट्रात पायाभूत सुविधांचे आणि वैविध्यपूर्ण असे प्रकल्प सुरू आहेत. या सर्वच क्षेत्रात जपानने सहकार्याचा हात पुढे केलेला आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. जपान-भारत आणि महाराष्ट्र आणि वाकायामा हे नाते एक आदर्श ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

गेट वे ऑफ इंडिया येथे महाराष्ट्र शासन आणि जपानचे वाकायामा प्रांत यांच्यात सामंजस्य कराराचे नूतनीकरण करण्यात आले. या कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या वेळी विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वाकायामाचे गव्हर्नर किशीमोटो शुहेही, पर्यटनमंत्री मंगल प्रभात लोढा, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी-शर्मा, पर्यटन संचालक बी. एन. पाटील, जपानचे ४५ जणांचे शिष्टमंडळ, अधिकारी, नागरिक उपस्थित होते. या वेळी सुमो व महाराष्ट्रीयन कुस्तीची प्रात्यक्षिके खेळाडूंनी सादर केली. यानिमित्त गेट वे ऑफ इंडिया येथे लेझर शोचेदेखील आयोजन करण्यात आले होते.

## शिखर समितीची निधीला मंजुरी

नागपूर जिल्ह्यातील कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानमध्ये तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून विकास कामे सुरू आहेत. यापूर्वीच दोन टप्प्यांना शासनाने मान्यता दिली असून या आराखड्यातील २१४ कोटी रुपयांच्या तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली आहे.

श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय शिखर समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन, आमदार चंद्रशेखर बावनकुळे, आशिष जयस्वाल, टेकचंद सावरकर, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, ग्रामविकास विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, नगरविकास विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी आदी उपस्थित होते.

## साहित्य संमेलनाचे उद्घाटन

जगण्याचे बळ देणारे साहित्यिक हे मुळात सामाजिक नेते असतात. जगण्याच्या तळमळीतून साहित्य आणि राजकीय नेतृत्व निर्माण होते. समाजाला दिशा देणाऱ्या या दोन्हींचे उगमस्थान साहित्यच आहे. त्यामुळे साहित्य क्षेत्रातील दिग्गजांच्या मार्गदर्शनाचा व सूचनांचा राज्य शासन कायम आदर करत आल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वर्धा येथे ९६व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी केले.

विदर्भ साहित्य संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त येथील आचार्य विनोबा भावे सभामंडपात प्राचार्य राम शेवाळकर व्यासपीठावर आयोजित या संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते. संमेलनाध्यक्ष न्या. नरेंद्र चपळगावकर, शालेय शिक्षण तथा मराठी भाषामंत्री दीपक केसरकर, पूर्वाध्यक्ष भारत सासणे, स्वागताध्यक्ष, माजी खासदार दत्ता मेघे, साहित्य अकादमीचे माजी अध्यक्ष पद्मश्री डॉ. विश्वनाथ प्रसाद तिवारी, प्रसिद्ध हिंदी कवी डॉ. कुमार विश्वास, डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष तथा आयोजन समितीचे कार्याध्यक्ष प्रदीप दाते आदी उपस्थित होते.

## फुटबॉल करंडक स्पर्धा : लोगो अनावरण

जर्मनीतील एफ. सी. बायर्न म्युनिक फुटबॉल क्लबबरोबर राज्याने केलेल्या सामंजस्य करारामुळे राज्यातील फुटबॉल खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उज्ज्वल कामगिरी करतील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.



मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात एफ. सी. बायर्न महाराष्ट्र करंडक फुटबॉल स्पर्धेच्या बोधचिन्हाचे (लोगो) अनावरण मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी क्रीडा व युवक कल्याणमंत्री गिरीश महाजन, आमदार चंद्रकांत पाटील, क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, एफ. सी. बायर्न म्युनिक फुटबॉल क्लबचे व्यवस्थापकीय संचालक मॅक्समिलन हशके, उपसचिव सुनील हांजे उपस्थित होते.

## महाराष्ट्र भूषण पुरस्काराची घोषणा

ज्येष्ठ समाजसेवक आणि निरूपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांना वर्ष २०२२ च्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. महाराष्ट्र भूषण निवड समितीने केलेल्या शिफारशीवर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिक्कामोर्तब केले असून त्यांनी रेवदंडा येथे आप्पासाहेबांची भेटही घेतली.

१४ मे १९४६ रोजी जन्मलेले पद्मश्री डॉ. दत्तात्रेय तथा आप्पासाहेब धर्माधिकारी गेली ३० वर्ष निरूपण करत असून अंधश्रद्धा निर्मूलन, बालमनावर संस्कार करण्यासाठी त्यांनी विशेष बालसंस्कार बैठक सुरू केल्या आणि आदिवासी वाडी, वस्त्यांवर व्यसनमुक्तीचे मोठे कार्यही केले.

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे अनेक प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवले जातात. अलीकडच्या काळात संस्थेने सर्वाधिक प्रमाणात वृक्षारोपण केले. त्याशिवाय वृक्षसंवर्धन, तलाव व स्वच्छता अभियान, रक्तदान शिबिराचे आयोजनही नियमितरीत्या करण्यात येते. गणेशोत्सव व नवरात्रौत्सवानंतर निर्माल्यातून खतनिर्मिती करून एक पर्यावरणपूरक संदेशही त्यांनी समाजाला दिला आहे. आप्पासाहेब धर्माधिकारी हे 'स्वच्छता दूत' म्हणूनही ओळखले जातात.

रायगड जिल्ह्यातील रेवदंडामध्ये आप्पासाहेबांचे प्राथमिक ते माध्यमिक शिक्षण झाले. बालपणापासून त्यांना कीर्तन, भजन, आध्यात्मिक वाचन याची आवड होती. याशिवाय त्यांना मैदानी खेळ व पोहणेही आवडायचे. तळागाळातील प्रत्येक मनुष्यासाठी, समाजाच्या सेवेसाठी आप्पासाहेबांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले आहे. या कार्याची सुरुवात त्यांचे वडील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी १९४३ सालापासून केली होती आणि आज तेच कार्य, तेवढ्याच जोमाने, तत्परतेने जगभर पोहोचवण्याचे कार्य आप्पासाहेब धर्माधिकारी करत आहेत.

## आरोग्याच्या महायज्ञाचा शुभारंभ

राज्यात ३६६ ठिकाणी रक्तदान शिबिरे, १८०० शाळांध्ये विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी, जागरूक पालक सुदृढ बालक अभियानाचा समावेश आहे. एवढ्या मोठ्या संख्येने राज्यात एकाच दिवशी आरोग्याचा महायज्ञ पहिल्यांदाच होत असल्याचे सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या योजनेच्या विस्ताराची घोषणादेखील केली. राज्यातील सगळ्या घटकांचे आरोग्य उत्तम राहावे, यासाठी हे सारे उपक्रम, मोहिमा आपण हाती घेतल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

आरोग्य विभागाच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या विविध आरोग्य शिबिरांचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून झाले, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ. तानाजी सावंत, रोजगार हमी योजनामंत्री संदीपान भुमरे, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, आयुक्त धीरजकुमार, संचालक डॉ. विजय कंदेवाड यांच्यासह राज्यभरातील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आदी उपस्थित होते.

## सेवाध्वजाचे अनावरण

देशातील कोट्यवधी बंजारा समाज बांधवांचे प्रमुख तीर्थक्षेत्र असलेल्या श्रीक्षेत्र पोहरादेवी येथील नंगारा वस्तुसंग्रहालय परिसरात संत सेवालाल महाराज यांचा २१ फूट उंच पंचधातूच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण आणि १३५ फूट उंच धवल रंगाच्या सेवाध्वजाची स्थापना रिमोट कंट्रोलद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आली. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न व औषध प्रशासनमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, खासदार भावना गवळी, आमदार राजेंद्र पाटणी, आमदार ॲड. निलय नाईक, जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, विभागीय आयुक्त डॉ. दिलीप पांढरपट्टे, बंजारा समाजाचे धर्मगुरू महंत बाबुसिंग महाराज, महंत कबीरदास महाराज, महंत शेखर महाराज आदी मान्यवर उपस्थित होते.

## महामंडळाच्या भागभांडवलात वाढ

राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाच्या भागभांडवलात वाढ झाल्याने आता दिव्यांगांना कर्ज वाटप पूर्ववत होईल, अशी ग्वाही देतानाच दिव्यांग बांधव कोणत्याही योजनेपासून वंचित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.



सह्याद्री राज्य अतिथिगृह येथे महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाची बैठक झाली. त्या वेळी मुख्यमंत्री बोलत होते. अन्न व औषध प्रशासन मंत्री संजय राठोड, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, दिव्यांग विकास विभागाचे सचिव अभय महाजन, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अभय करगुटकर, महाव्यवस्थापक युवराज पवार आदी या वेळी उपस्थित होते.

## शिक्षकांची पदे लवकरच भरणार

शिक्षकांच्या जुन्या निवृत्तिवेतन योजनेबाबत कायदेशीर, आर्थिक बाबी तपासून सकारात्मक मध्यमार्ग काढू तसेच शिक्षकांची सुमारे ३० हजार पदे लवकर भरली जातील, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.



वेंगुर्ला येथे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या १७ व्या त्रैवार्षिक राज्य महाअधिवेशनाचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या वेळी उद्योग मंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण व मराठी भाषामंत्री दीपक केसरकर, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती राज्याध्यक्ष उदय शिंदे, माजी आमदार राजन तेली, जिल्हाधिकारी के. मंजुलक्ष्मी, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रजित नायर आदी

उपस्थित होते.

## राज्यस्तरीय समिती स्थापन करणार

जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीबाबत एक राज्यस्तरीय समिती स्थापन करून सकारात्मक पद्धतीने योग्य निर्णय लवकरात लवकर घेतला जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

येथील चंपक मैदानावर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचा शिक्षक मेळावा आयोजित करण्यात आला होता, त्याप्रसंगी ते बोलत होते. या वेळी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, उद्योगमंत्री तथा रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, आमदार योगेश कदम, शिक्षक महासंघाचे नेते संभाजीराव थोरात, राज्याध्यक्ष अंबादास वाजे उपस्थित होते.

## महसूल परिषदेचे उद्घाटन

महसूल विभाग कालानुरूप आपल्या यंत्रणेत बदल करून अत्याधुनिक साधनांचा वापर करत आहे. येत्या काळात महसूल विभागाच्या बळकटीकरणासाठी सकारात्मक निर्णय घेऊन हा विभाग अधिक लोकाभिमुख करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोणी येथे केले. जनतेची कामे अधिक पारदर्शक व गतिमान होण्यासाठी अधिकाऱ्यांनी जनतेशी थेट संवाद साधावा, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी या वेळी व्यक्त केली.

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने लोणी येथे आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय महसूल परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या वेळी व्यासपीठावर महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे, खासदार सदाशिव लोखंडे, खासदार डॉ. सुजय विखे पाटील, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील आदी उपस्थित होते.

## मराठीमध्ये विश्वाची भाषा बनण्याचे गुण

जगाच्या कानाकोपऱ्यातील मराठी जनांना एका धाग्यात जोडण्याचे काम माय मराठी करते. जी भाषा सर्वांना जोडते, सामावून घेते, माणुसकी शिकवते तीच भाषा खऱ्या अर्थाने विश्वाची भाषा बनते. हे सर्व गुण मराठी भाषेत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ध्वनिचित्रमुद्रित संदेशाद्वारे शुभेच्छा देताना केले.



ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. मराठी भाषा विभागातर्फे या वर्षी हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी ध्वनिचित्रमुद्रित संदेशाच्या माध्यमातून ते बोलत होते. या वेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मराठी भाषामंत्री दीपक केसरकर, साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीधर दीक्षित, मराठी भाषा विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## शिवसृष्टी : 'सरकारवाडा'चे लोकार्पण

शिवसृष्टीची उभारणी हे अप्रतिम आणि अद्भूत कार्य आहे. लोकांना प्रेरणा देण्यासाठी ही शिवसृष्टी उभारण्यात येत असल्याने शिवसृष्टी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

पद्मविभूषण कै. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या संकल्पनेतून आणि महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानतर्फे नऱ्हे आंबेगाव येथे साकारत असलेल्या शिवसृष्टीचा पहिला टप्पा 'सरकारवाडा'चे लोकार्पण केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, पर्यटनमंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार शिवेंद्रराजे भोसले, नाना जाधव, डॉ. प्रवीण दबडगाव, महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानचे विश्वस्त जगदीश कदम आदी उपस्थित होते.

## गृहनिर्माण प्रकल्पाचे भूमिपूजन

स्मार्ट सिटींच्या उभारणीद्वारे लोकांचे जीवनमान उंचावण्यावर भर देण्यात येत असून मुंबईतील भेंडीबाजारसारख्या गजबजलेल्या भागात आकारास येत असलेला सैफी बुऱ्हानी अपलिफ्टमेंट ट्रस्टचा गृहनिर्माण प्रकल्प नागरी पुनरुत्थान घडवणारा असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



**देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री

भेंडी बाजार येथे सैफी बुऱ्हानी अपलिफ्टमेंट ट्रस्टच्या गृहनिर्माण प्रकल्प सेक्टर-४ च्या भूमिपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस, दाऊदी बोहरा समुदायाचे जागतिक आध्यात्मिक नेते डॉ. सय्यदना मुफद्दल सैफुद्दीन, आमदार अमीन पटेल व मान्यवरांच्या हस्ते प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले.

## जीएसटी करप्रणाली : मंत्रिगटाची बैठक

जीएसटी करप्रणाली ही संघराज्यांतील परस्पर सहकार्याचे एक उत्तम उदाहरण आहे. 'जीएसटी'चा कणा असलेली 'आयटी' प्रणालीही आता स्थिरावत असून तंत्रज्ञानाच्या सुयोग्य वापराद्वारे करचुकवेगिरी रोखण्यावर भर देण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिगटाने विविध सूचनांना मान्यता दिली.

'जीएसटी' प्रणाली सुधारणा मंत्री गटाची तिसरी बैठक सह्याद्री राज्य अतिथिगृह येथे झाली. या वेळी हरियाणाचे उपमुख्यमंत्री दुष्यंत चौटाला, तमिळनाडूचे वित्त मंत्री डॉ. पलानीवेल थैगा राजन, 'जीएसटी'चे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीष सिन्हा, केंद्रीय सचिव ऋत्विक पांडे, 'सीबीआयसी' पॉलिसी विंगचे प्रधान आयुक्त संजय मंगल, अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, राज्य कर आयुक्त राजीव कुमार मित्तल, सचिव शैला ए आणि विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आंध्र प्रदेशचे वित्तमंत्री बुगना राजेंद्र नाथ, दिल्लीचे वित्तमंत्री मनीष सिसोदिया, ओरिसाचे वित्तमंत्री निरंजन पुजारी हे दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

## योजना 'मिशन मोड' वर राबवाव्यात

नवीन तंत्रज्ञानाचा वापर करत महसुली कामकाज जलद व पारदर्शी करण्यात यावे. जलयुक्त शिवार, घरकुल व मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनांच्या अंमलबजावणींना प्राधान्य देत त्या 'मिशन मोड'वर राबवाव्यात, अशा सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महसूल प्रशासनाला दिल्या.

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने लोणी येथे आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय महसूल परिषदेचा समारोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. त्या वेळी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. या वेळी व्यासपीठावर महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार डॉ. सुजय विखे-पाटील, आमदार बबनराव पाचपुते, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे-पाटील उपस्थित होते.

## 'आरे' वसाहतीचा कायापालट

'आरे' दुग्धवसाहतीतील पडीक जमिनी वापरात आणून त्याद्वारे शासनाला उत्पन्न मिळेल यासंदर्भात उपाययोजना कराव्यात. आरे वसाहतीचा कायापालट करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश महसूल, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकासमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले.

गोरेगाव येथील आरे दुग्ध वसाहतीसंदर्भात मंत्रालयात आढावा बैठक घेण्यात आली. त्या वेळी मंत्री विखे-पाटील बोलत होते. बैठकीला विभागाचे प्रधान सचिव जगदीश गुप्ता, आयुक्त श्रीकांत शिपूरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुभाष दळवी यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

## १५ वर्षांचा प्रलंबित प्रश्न सोडवला

भारतीय लष्कर, नौदल व वायुदल या तीनही भारतीय सैन्य दलाच्या पुणे येथील लोहगावस्थित सिव्हिल डिफेन्स गृहरचना संस्थेचा प्रलंबित प्रश्न अखेर मार्गी लावण्यात आला आहे. या संस्थेच्या मागण्या राज्य शासनाने मान्य केल्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी स्पष्ट केले आहे. याबाबत शासन निर्णय जाहीर करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे एकंदरीतच १५ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सैनिकांच्या मागण्यांबाबतचा प्रश्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मंत्री श्री. विखे-पाटील यांनी अत्यंत कौशल्याने सोडवला आहे.

केंद्र शासनाच्या तीनही संरक्षण दलातील अधिकारी व कर्मचारी यांच्या डिफेन्स पर्सनल को.ऑप. हाऊसिंग सोसायटीला २००३ मध्ये घरे बांधण्यासाठी पुणे जिल्ह्यातील लोहगाव तालुक्यात हवेली येथे १८ हजार ६०० चौ.मी. जमीन वाटप करण्यात आले होते. या संस्थेच्या माध्यमातून राज्य शासनाकडे काही महत्त्वपूर्ण गोष्टींसाठी पाठपुरावा सुरू होता. त्यानुसार या गृहनिर्माण संस्थेच्या बांधकामाच्या जागेचा वापर, बांधकामास मुदतवाढ अशा आनुषंगिक मागण्याबाबत सकारात्मक विचार करून सरकारने लोहगावस्थित सिव्हिल डिफेन्स गृहरचना संस्थेचा प्रलंबित प्रश्न अखेर मार्गी लावला आहे. देशाची अहोरात्र सेवा करणाऱ्या



**राधाकृष्ण विखे-पाटील**
मंत्री, महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास

सैनिकांचा १५ वर्षांचा संघर्ष या निर्णयामुळे अखेर संपुष्टात आला आहे. डिफेन्स पर्सनल को.ऑप. हाऊसिंग सोसायटीच्या नावातही बदल करून सिव्हिल डिफेन्स गृहरचना संस्था मर्यादित असे करण्यात आले आहे. विशेष म्हणजे पूर्वी केवळ २०० निवासी क्षमता असलेल्या या जागेवर महानगरपालिकेच्या माध्यमातून ४०० निवासी क्षमतेपर्यंत वाढवता येण्याच्या आराखड्यास तत्त्वतः मंजुरीही मिळणार आहे.

## मच्छिमार बांधवांना सक्षम करणार

सागरी व भूजल क्षेत्रातील मच्छिमारांना व्यावसायिक व आर्थिकदृष्ट्या बळ देण्यासाठी शासन संपूर्ण सहकार्य करेल; यासाठी लहान मच्छिमारांना व रापणकारांना अत्यंत सुलभ पद्धतीने अनुदान देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती राज्याचे मत्स्यव्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे.

तयार जाळी खरेदी व बिगर यांत्रिकी नौका बांधणीच्या अनुदानात लक्षणीय वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने

घेतला असून, राज्यातील सागरी क्षेत्रामध्ये परंपरागत पद्धतीने मासेमारी करणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या लहान मच्छिमारांना व रापणकारांना मोठा दिलासा मिळणार आहे. यासंदर्भात मच्छिमार संघटनांनी केलेल्या मागणीचा मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी विचार करून हा निर्णय घेतला आहे.



**सुधीर मुनगंटीवार**
मंत्री, वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय

१३ वर्षांनंतर प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात मासेमारी करणाऱ्या बांधवांना दिलासा मिळाला आहे. आता, सागरी मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील मासेमारी करणाऱ्या नौकांवर वापरण्यात येणाऱ्या नॉयलॉन व मोनोफिलामेंट जाळी खरेदीवर ५० टक्क्यांपर्यंत व रापण संघाच्या प्रत्येक सभासदाला रापणीच्या तयार जाळ्यांवर तयार जाळ्याच्या किमतीच्या ५० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्यात येईल.

मासेमारी व्यवसायामध्ये मच्छिमारांना विविध साधनसामग्रीचा उपयोग सुलभतेने करता यावा, त्यांचे जीवन सुलभ सुखकारक व्हावे, यासाठी शासनाने हे हितकारक निर्णय घेतले असून शासन मच्छिमारांना वेळोवेळी सहकार्य करेल, अशी ग्वाही मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी दिली आहे.

## प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेसाठी निधी

मत्स्यसंपदा साठवणूक करणे व वितरण करणे यासाठी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना राबवण्यात येत आहे. प्रथमच या योजनेसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २० हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असल्याची माहिती केंद्रीय मत्स्यव्यवसाय मंत्री परशोत्तम रूपाला यांनी दिली.

पालघर जिल्ह्यातील सातपाटी येथे महा-मत्स्य अभियानांतर्गत सागर परिक्रमा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी श्री. रूपाला बोलत होते. वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार, खासदार राजेंद्र गावित, आमदार श्रीनिवास वनगा तसेच मच्छिमार बांधव उपस्थित होते.

## वन औद्योगिक विकास महामंडळ सुरू

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) राज्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासात मोठी भर घातली आहे. याच धर्तीवर आता वन औद्योगिक विकास महामंडळ (एफआयडीसी) सुरू करण्यात येईल, अशी घोषणा वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली. या माध्यमातून वन आधारित उद्योगांना चालना देण्यात येणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

वन विकास महामंडळाच्या नागपूर येथे झालेल्या विभागीय क्रीडा स्पर्धेच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर वन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विकास गुप्ता, मुख्य महाव्यवस्थापक संजीव गौर, मुख्य वनसंरक्षक रंगनाथ नाईकडे, प्रादेशिक व्यवस्थापक सुमित कुमार, विभागीय व्यवस्थापक ए. आर. प्रवीण, नागपूरचे उपवनसंरक्षक भरतसिंह हाडा आदी उपस्थित होते.

## दिव्यांग विद्यापीठ स्थापनेसाठी समिती गठीत करण्यात यावी

राज्यात दिव्यांग विद्यापीठ स्थापन



**चंद्रकांत पाटील**
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये

करण्यासाठी समिती गठीत करण्यात यावी, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी दिले.

अमरावती जिल्ह्यात दिव्यांग विद्यापीठ स्थापन करण्यासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी आमदार बच्चू कडू, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उपसचिव अजित बाविस्कर, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## वेब पोर्टलचे उद्‌घाटन

महाराष्ट्रातील विद्यापिठांतर्गत नामांकित संस्थांमधून राबवण्यात येणाऱ्या नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमांची माहिती परदेशातील विद्यार्थ्यांना व्हावी आणि त्यांची प्रवेश नोंदणी प्रक्रिया सुलभ व्हावी, म्हणून राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत www.mahacet.org हे वेब पोर्टल विकसित करण्यात आले आहे.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते या वेबपोर्टलचे उद्‌घाटन सिंहगड शासकीय निवासस्थान मुंबई येथे करण्यात आले. या वेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त महेंद्र ब. वारभुवन, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## तृतीयपंथीयांसाठी विशेष कक्ष

तृतीयपंथी हा देखील समाजाचा एक घटक आहे. ‘सबका साथ, सबका विकास’ संकल्पनेच्या माध्यमातून या घटकातील लोकांच्या समस्या सोडवण्यावर भर देण्यात येत आहे. महाराष्ट्रातला नाही तर देशातला पहिला तृतीयपंथीयांसाठी विशेष कक्ष मुंबईतील जी. टी. रुग्णालयात कार्यान्वित झाला असल्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी.समूह रुग्णालये संलग्नित गोकुळदास तेजपाल रुग्णालय येथे तृतीयपंथीयांसाठी विशेष कक्ष आणि



**गिरीश महाजन**
मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज,
वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण

व्यसनोपचार केंद्राचे ई-उद्‌घाटन वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त राजीव निवतकर, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, सर. ज. जी. रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे, डॉ. भालचंद्र चिखलकर, गौरी सावंत, सलमा खान आदी उपस्थित होते. याच कार्यक्रमादरम्यान तृतीयपंथीयांसाठी विशेष कक्षाबाबतच्या मार्गदर्शन सूचना पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले.

## फुटबॉल करंडक स्पर्धेचे उद्‌घाटन

जर्मनीतील एफ. सी. बायर्न म्युनिक क्लब यांच्याशी झालेल्या सामंजस्य करारानुसार राज्यात एफ. सी. बायर्न महाराष्ट्र फुटबॉल करंडक स्पर्धा सुरू झाली. जगात सर्वाधिक प्रमाणात खेळला जाणारा खेळ फुटबॉल असून, राज्यात फुटबॉल खेळाचे प्रमाण वाढवून आंतरराष्ट्रीय स्तरावरील फुटबॉल खेळाडू तयार होण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल, असे प्रतिपादन क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीश महाजन यांनी केले.

कुपरेज येथील मैदानात मुंबई शहर अंतर्गत एफ. सी. बायर्न महाराष्ट्र फुटबॉल करंडक स्पर्धेचे उद्‌घाटन मंत्री श्री. महाजन यांनी केले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी एफ. सी. बायर्न म्युनिक फुटबॉल क्लबचे व्यवस्थापकीय संचालक मॅक्सिमिलन हशके उपस्थित होते.

## वॉटर टॅक्सी सेवेचा शुभारंभ

बेलापूर ते गेटवे ऑफ इंडिया वॉटर टॅक्सी सेवेचा बंदरे विकासमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते बेलापूर येथे शुभारंभ झाला. या उपक्रमाच्या माध्यमातून रोजगार निर्मितीसह पर्यटकांच्या सुविधा मार्गी लागणार असल्याचे बंदरे विकास मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

मंत्री श्री. भुसे यांनी नयनतारा शिपिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या बोटीतून बेलापूर ते गेटवे ऑफ इंडियापर्यंत प्रवास



**दादाजी भुसे**
मंत्री, बंदरे आणि खनिकर्म

केला. त्यानंतर त्यांनी माध्यमाशी संवाद साधला. या वेळी आमदार मंदा म्हात्रे, बंदरे विकास विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, मुख्य कार्यकारी अधिकारी अजित सैनी, नयनतारा कंपनीचे रोहित सिन्हा यांच्यासह विभागाचे अधिकारी आदी या वेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विभागाच्या पाठीशी असून अशा प्रकल्पांच्या माध्यमातून रस्त्यावरच्या वाहतूक समस्येतून मुक्तता मिळणार असल्याचे मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले. भविष्यात प्रवाशांना आणखी व्यवस्था उभारण्याकरिता ठाणेजवळील 'रॉक क्रिक'चा काही भाग तोडल्यास पालघर, वसई, ठाणे, बेलापूर अशी प्रवासी जल वाहतूक उपलब्ध होईल. अशा वेगवेगळ्या योजनांना विभागाच्या वतीने गती देण्यात येत आहे, असे मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले.

## सेंटर ऑफ एक्सलन्स उभारणार

बीज गुणन केंद्र इसारवाडी या औरंगाबाद येथील प्रक्षेत्राचे फळ रोपवाटिकेत रूपांतर करून सीट्रस इस्टेट व सेंटर ऑफ एक्सलन्स २२.५० हेक्टर क्षेत्रात तयार करण्यात येणार आहे. या माध्यमातून विविध उपक्रम राबवणार असल्याची माहिती फलोत्पादन व रोहयोमंत्री संदीपान भुमरे यांनी दिली.

सीट्रस इस्टेट व सेंटर ऑफ एक्सलन्स पैठणच्या कार्यवाहीबाबत मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मंत्री श्री. भुमरे बोलत होते. या वेळी फलोत्पादन विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, फलोत्पादन विभागाचे संचालक डॉ. कैलास मोते यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

एकूण क्षेत्रापैकी ४.५० हेक्टर क्षेत्रावर सेंटर ऑफ एक्सलन्स व उर्वरित १८.०० हेक्टर क्षेत्रावर सीट्रस इस्टेट इसारवाडी होणार असून, ४३ कोटी ७९ लाख, ७ हजार ७०० रुपये खर्च करण्यात येणार असल्याचे मंत्री श्री. भुमरे यांनी सांगितले.

## कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सकारात्मक

'रोहयो' अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी शासन सकारात्मक आहे, असे रोहयोमंत्री संदीपान भुमरे यांनी सांगितले.



**संदीपान भुमरे**
मंत्री, रोजगार हमी योजना, फलोत्पादन

राज्यातील रोहयो अंतर्गत कार्यरत असलेल्या ३५०० कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात त्यांच्या प्रतिनिधींसोबत मंत्रालयात बैठक घेण्यात आली. या वेळी मंत्री श्री. भुमरे बोलत होते. याप्रसंगी आमदार विनोद अग्रवाल, संजय गायकवाड,

संजय बनसोडे, महेंद्र दळवी, अपर मुख्य सचिव नंदकुमार, यांच्यासह कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्यातील 'रोहयो'अंतर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासंदर्भात शासन सकारात्मक आहे. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात कर्मचाऱ्यांचा प्रतिनिधी असलेली समिती स्थापन करून त्यावर तातडीने अहवाल मागवण्यात येईल. मानधन वाढ तसेच इतर मागण्यांसंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येणार असल्याचे मंत्री श्री. भुमरे यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींना सांगितले. तसेच राज्यभर सुरू असलेला संप मागे घेण्याचे आवाहन मंत्री श्री. भुमरे यांनी या वेळी केले.

## परकीय गुंतवणुकीसाठी उद्योजकांना सहकार्य

महाराष्ट्र हे उद्योगस्नेही राज्य असून परकीय गुंतवणुकीसाठी उद्योजकांना सर्वतोपरी सहकार्य करण्याची राज्य शासनाची भूमिका असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

जर्मनीच्या शिष्टमंडळासमवेत उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच मुंबई येथे द्विपक्षीय चर्चा झाली. या वेळी त्यांनी जर्मनीच्या शिष्टमंडळाचे स्वागत केले.



**उदय सामंत**
मंत्री, उद्योग

जर्मनी आणि भारताचे द्विपक्षीय संबंध अत्यंत सौहार्दपूर्ण असे राहिलेले आहेत. जर्मनी हा युरोपातील भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदारी असणारा देश आहे. भारताचे व्यापारी संबंध असलेल्या जगातील पहिल्या दहा देशांमध्ये जर्मनीचे नाव आहे. सध्या भारतात १७०० पेक्षा जास्त जर्मन कंपन्या कार्यरत असून यातील ५० टक्के कंपन्या महाराष्ट्रात आहेत. तसेच भारताच्या २१३ कंपन्या जर्मनीमध्ये कार्यरत आहेत. पुणे हे राज्यातील व्यापाराचे प्रमुख केंद्रांपैकी एक असून जर्मन कंपन्यांचा प्राधान्यक्रम पुणे शहराला असल्याची माहिती श्री. सामंत यांनी दिली.

या वेळी बाडेन-व्युर्टेंबर्ग'स्टेट मिनिस्टर डॉ. फ्लोरियन स्टेगमन, मेंबर ऑफ स्टेट पार्लमेंट टोबियस वोगट, सासचा बिंदर, प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, जर्मनीच्या शिष्टमंडळाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## 'आंबा बोर्ड' स्थापन करणार

आंब्याला हमीभाव मिळावा आणि आंबा बागायतदारांच्या मागण्या, समस्या सोडवण्यासाठी काजू बोर्डाच्या धर्तीवर स्वतंत्र 'आंबा बोर्ड' स्थापन करण्याचा निर्णय उद्योगमंत्री तथा रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत घेण्यात आला. आंबा उत्पादकांना हमीभाव देण्याबरोबरच विविध मागण्या या बोर्डाच्या माध्यमातून सोडवण्यासाठी समिती नेमून या समितीवर दोन बागायतदार प्रतिनिधी नेमण्याचाही निर्णय या वेळी घेण्यात आला.

रत्नागिरी जिल्ह्यातील विविध प्रश्नांबाबत पालकमंत्री श्री. सामंत यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी बैठक झाली. या बैठकीला आमदार योगेश कदम, आमदार शेखर निकम, माजी आमदार सदानंद चव्हाण, अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, अपर मुख्य सचिव नितीन करीर, प्रधान सचिव पराग जैन, वित्त विभागाच्या सचिव शैला ए., वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर, आंबा बागायतदार संघटनेचे उपाध्यक्ष प्रकाश साळवी, कुणबी समाजोन्नती संघ, मुंबईचे अध्यक्ष भूषण बरे आदी पदाधिकारी, नाम फाऊंडेशनचे मंदार पाटेकर, चिपळूण बचाव समितीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## मराठी भाषा विभागाचे पुरस्कार जाहीर

मराठी भाषा विभागाने सन २०२२ चे पुरस्कार जाहीर केले असून, याबाबतची घोषणा मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर यांनी केली. यात विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कारासह इतर सहा पुरस्कार जाहीर केले.

सन २०२२चा विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार प्रा. चंद्रकुमार नलगे यांना जाहीर करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप ५ लाख रुपये रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे. प्रा. नलगे यांनी कथा कादंबरी, एकांकिका, चित्रपट लेखन इत्यादी विविध प्रकारात लेखन केले. त्यांच्या प्रकाशित ग्रंथाची संख्या ९० आहे. तर वयाची ज्येष्ठता ८७ वर्ष. त्यांना यापूर्वी विविध पुरस्कार, आदर्श शिक्षक तसेच राज्य शासनाचे अनेक पुरस्कार मिळाले आहेत.



**दीपक केसरकर**
मंत्री, शालेय शिक्षण, मराठी भाषा

श्री. पु. भागवत पुरस्कार २०२२ ग्रंथाली प्रकाशनला जाहीर झाला आहे. ३ लाख रुपये रोख, मानचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. प्रकाशित ग्रंथांची संख्या १ हजार २४०, सतत ४८ वर्ष कार्यरत असलेल्या ग्रंथालीने विविध विषयात प्रकाशने, पुस्तक प्रदर्शने, ग्रंथ चर्चा, वाचक चळवळ इत्यादी उपक्रम राबवले आहेत.

डॉ. अशोक रा. केळकर, मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार २०२२ (व्यक्तींसाठी) दिला जाणारा पुरस्कार डॉ. विठ्ठल वाघ यांना जाहीर करण्यात आला. २ लाख रुपये रोख, मानचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. विठ्ठल वाघ

यांनी वऱ्हाडी म्हणी, वऱ्हाडी बोलीचे संशोधन, देश-विदेशात काव्यवाचनातून समाजप्रबोधनाचे कार्यक्रम, कविता, कादंबऱ्या, संशोधन अशा विविध साहित्य प्रकारात लेखन केले आहे.

कविवर्य मंगेश पाडगांवकर, मराठी भाषा संवर्धक पुरस्कार २०२२ (व्यक्तींसाठी) श्री. द. ता. भोसले यांना जाहीर झाला. २ लाख रुपये रोख, मानचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. ग्रामीण बोलीचा शब्दकोश, लोपलेल्या सुवर्णमुद्रा ही बोली भाषेवरील महत्त्वाची पुस्तके, खेड्यातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी २५ हून अधिक वर्ष ते कार्यरत आहेत.

डॉ. अशोक रा. केळकर, मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार २०२२ (संस्थेसाठी) दिला जाणारा पुरस्कार महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांना जाहीर झाला आहे. २ लाख रुपये रोख, मानचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. संस्थेची स्थापना १९०६, मराठी भाषा आणि साहित्य यांच्या विकास व प्रचारासाठी कार्यरत, विविध साहित्य प्रकारातील ४० हून अधिक पुरस्कार या संस्थेद्वारे प्रदान करण्यात येतात. लेखन कार्यशाळासारखे उपक्रम संस्थेमार्फत राबवण्यात येतात.

कविवर्य मंगेश पाडगावकर, मराठी भाषा संवर्धक पुरस्कार २०२२ (संस्थेसाठी) हा पुरस्कार कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी यांना जाहीर झाला आहे. २ लाख रुपये रोख, मानचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. संस्थेची स्थापना १९९९, मराठी भाषा साहित्य संस्कृतीसाठी कार्यरत साहित्य संमेलने, लेखक वाचक संवाद लेखन कार्यशाळा असे विविध उपक्रम संस्थेमार्फत राबवण्यात येतात.

## कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन

बालकांना शिक्षणासोबतच आवश्यक कौशल्य विकसित होण्यासाठी कौशल्य विकास विभाग आणि महिला व बालविकास विभाग प्रयत्नशील आहे. मुंबई येथील चिल्ड्रन एड सोसायटीचे डोंगरी येथील निरीक्षण गृह व मानखुर्द येथील बालगृह येथे नव्याने सुरू केलेल्या कौशल्य विकास केंद्राच्या धर्तीवर राज्यातील बाल सुधारगृहांमध्ये कौशल्यपूर्ण शिक्षणाचे केंद्र सुरू करणार आहोत. त्याचबरोबर भव्यता फाऊंडेशनच्या सहकार्याने डोंगरी व मानखुर्द येथील मुलांना त्यांचा कल लक्षात घेऊन मानखुर्द आणि डोंगरी येथील मुलांसाठी कौशल्य प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहेत, अशी माहिती कौशल्य, रोजगार व उद्योजकता आणि महिला व बालविकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली.

डोंगरी, उमरखाडी येथील चिल्ड्रन एड सोसायटीमध्ये कौशल्य विकास केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी मंत्री श्री. लोढा बोलत होते. या वेळी बालविकास पुणेचे विभागीय उपायुक्त राहुल मोरे, महिला व बालविकास कोकण विभागाचे उपायुक्त बापूराव भवाने, भव्यता फाऊंडेशनचे संस्थापक तथा अध्यक्ष कुलीन मणियार, प्रशिक्षक वृंदा कोटक, सई अंबुकर उपस्थित होते.



**मंगल प्रभात लोढा**
मंत्री, पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता, महिला व बालविकास.

## प्रशिक्षण संस्थांसाठी हेल्पलाईन

कोकण विभागातील कौशल्य प्रशिक्षण प्रदान करणाऱ्या नोंदणीकृत प्रशिक्षण संस्थांसमवेत कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी संवाद साधला. कौशल्य विकास विभागामार्फत नोंदणीकृत असलेल्या या प्रशिक्षण संस्था आणि विभागामध्ये समन्वय साधणे, अडीअडचणी दूर करणे यासाठी यापुढील काळात दर दोन महिन्यांनी या संस्थांचा जनता दरबार घेण्यात येईल, असे मंत्री श्री. लोढा यांनी सांगितले. तसेच संस्थांना येणाऱ्या अडीअडचणी थेट मंत्री कार्यालयस्तरावर सोडवण्यासाठी हेल्पलाईन क्रमांकही या वेळी जाहीर करण्यात आला. राज्यातील गरजू तरूणांना दर्जेदार कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही मंत्री श्री. लोढा यांनी या वेळी केले.

एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल येथे झालेल्या या बैठकीस कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाच्या प्रधान सचिव मनीषा वर्मा, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामास्वामी एन., अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सोनवणे, एनएसडीसीच्या अधिकारी श्रीमती शताब्दी यांच्यासह महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीचे अधिकारी, कोकण विभागातील विविध कौशल्य प्रशिक्षण संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## आयटीआयमध्ये स्किल सेंटर सुरू

पालघर जिल्ह्यातील पालघर, जव्हार, मोखाडा, वाणगाव व तलासरी येथील आयटीआयमध्ये विविध कमी कालावधीच्या अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देणाऱ्या स्किल सेंटरचा राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. आदिवासी उमेदवारांकरिता जव्हार येथे प्रस्तावित असलेले नवीन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता प्रशिक्षण मार्गदर्शन केंद्र लवकरच सुरू करण्यात येईल, असेही मंत्री श्री. लोढा यांनी या वेळी जाहीर केले.



या वेळी खासदार राजेंद्र गावित, सहसंचालक किशोर खटावकर, मेळाव्याचे समन्वयक प्रदीप दुर्गे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी दयानंद सिडाम, कौशल्य विकासचे अधिकारी शालिक पवार, संध्या साळुंखे आदी उपस्थित होते.

**टीम लोकराज्य**

राज्य मंत्रिमंडळाच्या १४ आणि २२ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या बैठकीत शालेय शिक्षण, अन्न व नागरी पुरवठा, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, जलसंपदा आदी विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...




# मंत्रिमंडळात ठरले !

## शाळांचा सर्वांगीण विकास

राज्यातील ८४६ शाळांचा सर्वांगीण विकास करणाऱ्या पीएम श्री योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. देशभरात पहिल्या टप्प्यात १५ हजारांहून अधिक शाळा उच्च दर्जाचे गुणात्मक शिक्षण देणाऱ्या सर्वोत्कृष्ट शाळा म्हणून विकसित करण्यात येणार असून, यात राज्यातील ८४६ शाळांचा समावेश करण्यात येईल.

'पीएम श्री योजने'त सहभागी होण्यासाठी राज्य शासनाने केंद्रासमवेत सामंजस्य करार केला आहे. या करारानुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० राज्यात लागू करण्यात येईल. पीएम श्री योजनेत केंद्राचा ६० टक्के हिस्सा असेल. प्रत्येक शाळेसाठी १ कोटी ८८ लाख एवढी तरतूद ५ वर्षांसाठी करण्यात येईल. या शाळांसाठी ५ वर्षांकरिता केंद्राचा हिस्सा ९५५ कोटी ९८ लाख राहणार असून राज्याचा ४० टक्के हिस्सा प्रति शाळा ७५ लाख प्रमाणे ६३४ कोटी ५० लाख खर्च अपेक्षित आहे. या योजनेतील दुसऱ्या टप्प्यात ४०८ गट, २८ महानगरपालिका आणि ३८३ नगरपालिका व नगरपरिषदा यांमधून पीएम श्री शाळांची निवड केली जाईल.

या शाळांमधून अनुभवात्मक पद्धतीने आनंददायी शिक्षण देण्यात येईल. विद्यार्थ्यांची वैचारिक समज आणि वास्तविक जीवनातील त्याचा ज्ञानाचा वापर आणि योग्यतेवर आधारित मूल्यांकन करण्यात येईल. या शाळांमध्ये माजी विद्यार्थ्यांनादेखील सहभागी करून घेऊन विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन व शैक्षणिक मदत करण्यात येईल. काही कारणांमुळे विद्यार्थ्यांची शाळेतून गळती झाल्यास त्यांना पुन्हा प्रवेश देऊन अशा मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यात येईल.



या शाळांचा विकास प्रामुख्याने पुढील ६ प्रमुख आधारस्तंभांवर केला जाईल. अभ्यासक्रम, अध्यापन शास्त्र व मूल्यमापन; प्रवेश आणि पायाभूत सुविधा; मानव संसाधन आणि शालेय नेतृत्व; समावेशक पद्धती आणि लाभार्थी समाधान; व्यवस्थापन, देखरेख आणि प्रशासन. या योजनेची अंमलबजावणी राज्य स्तरावरून शालेय शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समिती, जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती आणि महापालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समित्यांमार्फत केली जाईल. राज्य प्रकल्प संचालक हे राज्य अंमलबजावणी समितीचे अध्यक्ष असतील.

## धान उत्पादकांना प्रोत्साहन

राज्यातील धान उत्पादकांना प्रती हेक्टरी १५ हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम देण्यासाठी १ हजार कोटी रुपये इतक्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. याचा लाभ अंदाजे ५ लाख शेतकऱ्यांना होईल.

या संदर्भात नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनातदेखील मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती. २०२२-२३ या खरीप पणन हंगामात केंद्र शासनाने मंजूर केलेल्या हमी भावाव्यतिरिक्त नोंदणीकृत शेतकऱ्यांना धान लागवडीखालील जमिनीनुसार प्रतिहेक्टरी १५ हजार रुपये या प्रमाणे प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येईल. ही रक्कम २ हेक्टर मर्यादेत देण्यात येईल.

मागील म्हणजे २०२१-२२ खरीप हंगामात १ कोटी ३३ लाख ७९ हजार ८९२ क्विंटल धान खरेदी झाली होती; पण या हंगामात धानाकरिता प्रोत्साहनपर रक्कम जाहीर करण्यात आली नव्हती. या पूर्वीच्या खरीप हंगामामध्ये धान उत्पादकांना प्रतिक्विंटल ७०० रुपये अशी रक्कम प्रोत्साहनपर म्हणून देण्यात आली आहे.



मात्र ही रक्कम प्रतिक्विंटल देण्यात येत असल्यामुळे काही अडचणी येत होत्या. ज्या शेतकऱ्यांकडे ५० क्विंटलपेक्षा कमी धान उत्पादन आहे अशांच्या नावे ५० क्विंटल मर्यादेपर्यंत जास्तीची धान खरेदी करण्याचे प्रसंग घडले. तसेच शेजारील राज्याचे धान महाराष्ट्रात विक्रीकरिता आणल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या.

यंदा २०२२-२३ योजनेकरिता सुमारे ५ लाख शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून एकूण ६ लाख हेक्टरपेक्षा जास्त जमिनीवर धान उत्पादन झाले आहे.

### अधिनियमास मान्यता

महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण अधिनियमास मान्यता देण्याचा त्याचप्रमाणे मुख्य सचिवांच्या उच्चस्तरीय समितीमार्फत औषधी, वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

यासाठीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष मुख्यमंत्री हे असतील. या प्राधिकरणात भाप्रसे दर्जाचा मुख्य कार्यकारी अधिकारी, आरोग्य सहसंचालक दर्जाचा जनरल मॅनेजर, सहसचिव दर्जाचा जनरल मॅनेजर, उपसंचालक दर्जाचे असिस्टंट जनरल मॅनेंजर (तांत्रिक) तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य प्रशासकीय अधिकारी अशी एकूण १४ पदे असतील.

प्राधिकरणाच्या स्तरावर कंत्राटी पद्धतीने कंत्राटी कर्मचारी देखील नेमण्यात येतील. ज्या बाबींची खरेदी करायची आहे त्याला एकत्रितरीत्या प्रशासकीय विभागाच्या स्तरावर मान्यता देण्यात येऊन निधी उपलब्धतेनुसार खरेदी करण्यात येईल व संबंधित आरोग्य संस्थांना मागणीप्रमाणे पुरवठा करण्यात येईल. हे प्राधिकरण सुरू करण्यासाठी ६५ कोटी १९ लाख ५८ हजार रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

### तंत्रशास्त्र, तंत्रज्ञान विद्यापीठांच्या कुलगुरू निवड पद्धतीत सुधारणा

रायगड जिल्ह्यातील लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र आणि पुणे येथील महाराष्ट्र सीओईपी विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या निवड पद्धतीमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार या विद्यापीठांच्या अधिनियमात सुधारणा करण्यात येईल.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्णय व महाधिवक्ता यांच्या अभिप्रायानुसार विविध अकृषि विद्यापीठांमधील कुलगुरूपदांच्या निवडीच्या पद्धतीत यापूर्वीच बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार लोणेरे आणि पुणे येथील तंत्रज्ञान विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या निवड पद्धतीत सुधारणा करण्यात येईल.

### पैनगंगा नदीवरील कामांना गती

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत पैनगंगा नदीवरील ११ बॅरेजेसच्या कामांना गती देण्यासाठी सुमारे ७८७ कोटी रुपये सुधारित खर्चास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे वाशिम



तालुक्यातील ५ हजार ५५४ हेक्टर, हिंगोली जिल्ह्यातील २ हजार १३६ हेक्टर असे एकूण ७ हजार ६९० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पाची साठवणूक क्षमता ३३.२७ दलघमी इतकी असून २६.३४ दलघमी इतका उपयुक्त पाणीसाठा आहे.

### कामांना अधिक गती

पुणे जिल्ह्यातील तुळापूर आणि वढू बुद्रुक येथे छत्रपती संभाजी महाराज समाधी स्थळ, जेजुरी तीर्थक्षेत्र तसेच वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम विकास आराखड्यांचे मंत्रिमंडळ बैठकीत सादरीकरण करण्यात आले. या वेळी या कामांना अधिक गती देण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

### राज्यपालांचा अभिनंदन ठराव

तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे अभिनंदन करण्याचा ठराव राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मांडण्यात आला. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी हा ठराव मांडला. राज्याच्या हिताचे निर्णय घेण्यात शासनाला मार्गदर्शन केल्याबद्दल राज्यपालांचे अभिनंदन करण्यात आले.

### कॉपीमुक्त अभियानाची अंमलबजावणी

राज्यात १० वी व १२ वीच्या परीक्षा केंद्रांवर होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी पूर्ण राज्यात कॉपीमुक्त अभियान राबवण्यात येणार आहे. यासंदर्भात कॉपीमुक्त अभियानाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय झाला. प्रारंभी उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी यांनी यासंदर्भात सादरीकरण केले.

या अभियानात राज्याचा नोडल अधिकारी म्हणून शिक्षण आयुक्त यांना व प्रत्येक जिल्हाधिकारी यांना तसेच समन्वयक अधिकारी म्हणून माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना नियुक्त करण्यात आले आहे. तसेच कॉपीमुक्त अभियान राबवण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व जिल्हा प्रशासनाने एकत्रित

काम करावे. यासंदर्भात जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रित पत्रकार परिषद घेऊन जनजागृती करावी. परीक्षेला प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होण्याच्या प्रत्यक्ष वेळेपूर्वी अर्धा तास अगोदर हजर राहण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात. संवेदनशील समजल्या जाणाऱ्या परीक्षा केंद्रांवर शक्यतेनुसार चित्रीकरण करण्यात यावे, असे ठरले.

**जनजागृती मोहीम -** शिक्षक, मुख्याध्यापक, शैक्षणिक संस्थांचे प्रमुख यांच्या कार्यशाळा आयोजित करणे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची जिल्हा दक्षता समिती नियुक्त करणे. माध्यमांद्वारे शाळा आणि पालकांशी संवाद साधणे यातून जनजागृती करण्यात येणार आहे.

**पोलीस बंदोबस्त -** याशिवाय पोलीस बंदोबस्तावरही भर देण्यात येणार आहे. ५० मीटरच्या आत अनधिकृत व्यक्तींना प्रवेश नाही. अतिसंवेदनशील, संवेदनशील, सर्वसाधारण असे परीक्षा केंद्रांचे वर्गीकरण करण्यात यावे. कलम १४४ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश देण्यात यावेत. ५० मीटरच्या आतील सर्व झेरॉक्स दुकाने बंद ठेवावीत.

## शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा

गुढीपाडवा तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनानिमित्त शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयांत आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय घेण्यात आला. याचा लाभ १ कोटी ६३ लाख शिधा पत्रिकाधारकांना होईल. यापूर्वी दिवाळीत हा आनंदाचा शिधा देण्यात आला होता.

अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब तसेच औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व आणि नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर आणि १ लिटर पामतेल असा आनंदाचा शिधा गुढीपाडव्यापासून पुढील १ महिन्याच्या कालावधीसाठी ई-पॉसद्वारे १०० रुपये प्रतिसंच असा सवलतीच्या दरात दिला जाईल. ई-पॉसची व्यवस्था नसलेल्या ठिकाणी ऑफलाइन पद्धतीने हा शिधा दिला जाईल.

हा आनंदाचा शिधा देण्याकरिता आवश्यक शिधा जिन्नसांची खरेदी करण्याकरिता 'महाटेंडर्स' या ऑनलाइन पोर्टलद्वारे २१ दिवसांऐवजी १५ दिवसांच्या कालावधीत निविदा प्रक्रिया राबवण्यास मान्यता देण्यात आली आहे. २०२२ मध्ये दिवाळी सणानिमित्त शिधाजिन्नस खरेदीसाठी पार पडलेल्या निविदा प्रक्रियेत २७९ प्रतिसंच या दरानुसार ४५५ कोटी ९४ लाख आणि इतर अनुषांगिक खर्चासाठी १७ कोटी ६४ लाख अशा ४७३ कोटी ५८ लाख इतक्या खर्चासदेखील मान्यता देण्यात आली.

## ऊर्ध्व प्रवरा प्रकल्पाच्या कामास गती

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यामधील ऊर्ध्व प्रवरा प्रकल्पाच्या कामास गती देण्यासाठी ५१७७.३८ कोटींच्या खर्चास सुधारित मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे ६८ हजार हेक्टर जमिनीला सिंचनाचा थेट लाभ होणार आहे.

प्रवरा नदीवर निळवंडे गावाच्या वरील बाजूस हे दगडी धरण बांधण्यात येत असून धरणातून डावा कालवा सुरू होऊन तो ८५ किलोमीटर लांब आहे. नदीच्या उजव्या तीराने जाणारा कालवा ९७ किलोमीटर आहे. या दोन्ही कालव्यातून ६८ हजार हेक्टर सिंचन होणे अपेक्षित आहे. २०२७ पर्यंत या प्रकल्पाचे कालव्यासह संपूर्ण बांधकाम पूर्ण करण्यात येणार आहे. हा प्रकल्प पूर्ण होताच अकोले, संगमनेर, राहुरी, राहाता, कोपरगाव तसेच नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील अवर्षण प्रवण भागातील १८२ गावांना सिंचनाचा लाभ होईल.

**– टीम लोकराज्य**

## एमएचटी–सीईटी/जेईई/एनईईटी २०२५ योजना

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्गीय, भटक्या जाती विमुक्त जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून एमएचटी-सीईटी/जेईई/एनईईटी-२०२५ (MHT-CET/JEE/NEET) करिता पूर्व प्रशिक्षण या योजनेंतर्गत अर्ज मागवण्यात येत आहे. महाज्योतीमार्फत एमएचटी-सीईटी/जेईई/एनईईटी परीक्षा पूर्व प्रशिक्षण ऑनलाइन पद्धतीने देण्यात येते. तसेच ऑनलाइन प्रशिक्षणासाठी महाज्योतीतर्फे विद्यार्थ्यांना मोफत टॅब व ६ जीबी / दिवस इंटरनेट डाटा पुरवण्यात येणार असल्याचे प्रकल्प व्यवस्थापक महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर यांनी माहिती दिली आहे.

**योजनेच्या लाभासाठी पात्रता :**

- उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा/असावी.
- उमेदवार हा इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्ग यापैकी असावा/असावी.
- उमेदवार हा नॉन-क्रिमिलेअर उत्पन्न गटातील असावा/असावी.
- जे विद्यार्थी सन २०२३ मध्ये १० वी ची परीक्षा देत आहेत, ते विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र असून त्या विद्यार्थ्यांनी अर्ज करताना १० वी चे प्रवेशपत्र व ९ वी ची गुणपत्रिका जोडावी.
- विद्यार्थी हा विज्ञान शाखेत प्रवेश घेणारा असावा. ज्या बाबतची कागदपत्रे त्याने भविष्यात सूचनांनुसार अपलोड करणे आवश्यक आहे.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे :**

● ९ वी ची गुणपत्रिका, ● १० वी परीक्षेचे ओळखपत्र, ● आधार कार्ड, ● रहिवासी दाखला, ● जातीचे प्रमाणपत्र, ● वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र.

**अर्ज कसा करावा :-** महाज्योतीच्या www.mahajyoti.org.in संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील Application for MHT-CET JEE / NEET 2025 Training यावर जाऊन ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावा. अर्जासोबत 'ब'मध्ये नमूद कागदपत्रे स्वाक्षांकित करून स्पष्ट दिसतील, असे स्कॅन करून ऑनलाइन अर्ज ३१ मार्च २०२३ पर्यंत अपलोड करावेत.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | G20



**श्री. नरेंद्र मोदी**
मा. प्रधानमंत्री

# निर्णय वेगवान
# #महाराष्ट्र गतिमान



## गतिमान प्रवासाचे प्रमुख टप्पे

- शेतकऱ्यांना ७५०० कोटी रुपयांची मदत
- १७ सिंचन प्रकल्पांसाठी २९,७३१ कोटी रुपये
- समृद्धी महामार्गाचा पहिला टप्पा खुला
- ७५,००० सरकारी नोकरभरतीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम
- रस्ते / मेट्रो / रेल्वे प्रकल्पांसह पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती
- पेट्रोल-डिझेलवर दिलासा, आनंदाचा शिधा, स्वातंत्र्यसैनिकांचे अनुदान दुप्पट, बालसंगोपन अनुदानात वाढ, तेंदूपत्ता मजुरीत वाढ, बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास असे लोकहितैषी निर्णय



गेल्या सहा महिन्यात राज्याचा जलद आणि सर्वांगीण कायापालट करण्याच्या दृष्टीने सर्वच क्षेत्रात वेगवान निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली जात आहे. याचाच परिणाम म्हणून नवा गतिमान महाराष्ट्र घडताना दिसून येत आहे.

**श्री. देवेंद्र फडणवीस**
मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**श्री. एकनाथ शिंदे**
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

www.mahasamvad.in /MahaDGIPR
/MaharashtraDGIPR महाराष्ट्र शासन

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन**

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.
- निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / **TO**

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी-८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई - ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : जयश्री भोज